अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

दक्षिण आफ्रिकेचा सलग दुसरा विजय

● इंग्लंडचा केला पराभव

सेंटलुसिया : गतविजेत्या इंग्लंडला ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेच्या सुपर ८ गटातील दुसऱ्या सामन्यात विजयाने थोडक्यात हुलकावणी दिली. २०व्या षटकात एडन मार्करमने घेतलेला परतीला झेल सामन्याला कटालणी देणारा ठरला.

इंग्लंडला विजयासाठी १८ चेंडूंत २५ धावांची गरज असताना कागिसो रबाडाने सेट फलंदाज लिएम लिव्हिंगस्टोनला माघारी पाठवून हॅरी ब्रूकसोबतची ७८ धावांची भागीदारी तोडली. त्यानंतर यानसेन व एनरिच नॉर्खियाने अखेरच्या दोन षटकांत सामना खेचून आणला. क्विंटन डी कॉकने ३८ चेंडूंत ४ चौकार व ४ षटकारासह ६५ धावा केल्या. क्विंटन व रिझा हेंड्रिक्स (१९) यांनी पहिल्या विकेटसाठी ९.५ षटकांत ८६ धावा जोडल्या. सहा धावानंतर क्विंटन माघारी परतला आणि इंग्लंडच्या गोलंदाजांना पुनरागमन करण्याची संधी मिळाली. हेनरिच क्लासेन (८) दुर्देवीरित्या रन आऊट झाला. कर्णधार एडन मार्करम (१) हाही आदिल राशीदच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. डेव्हिड मिलर खेळपट्टीवर उभा राहिला आणि त्याने २८ चेंडूंत ४ चौकार व २ षटकारांसह ४३ धावांची खेळी केली.

www.surajyadigital.com । शनिवार, दि. २२ जून २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २६३ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

घारीला फटाक्यांचा शक्तीशाली स्फोट

● सारा परिसर कानठळ्यांनी हादरला
● 'वटसावित्री'मुळे मोठा अनर्थ टळला

✔ सुराज्य/बार्शी

बार्शी तालुक्यातील घारी शिवारातील एका फटाके कारखान्यात शुक्रवारी सकाळी दहा वाजता शक्तीशाली स्फोट झाला.एकामागून एक अशा मोठ्या आवाजाने घारी गावाच्या ६ किमी परिसरात कानठळ्या बसल्या. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट पाहून घारी गावाच्या परिसरात एकच खळबळ उडाली. या कारखान्यात १० ते १५ महिला मजूर दररोज काम करत असतात पण शुक्रवारी वटसावित्रीच्या पौर्णिमेमुळे सुटी देण्यात आली होती. त्यामुळे सुदैवाने मोठा अनर्थ टळला. बार्शी तालुक्यात फटाक्यांच्या स्फोटांची मालिका वर्षानुवर्षे सुरूच असल्याने बार्शीकरांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

घारी शिवारातील वेलकम फायर वर्क्स येथे शुक्रवारी सुमारास ही घटना घडली. स्फोट प्रकरणी जबाबदार धरून कारखान्याचा मालक इब्बुस मुसाभाई मुलाणी याच्यावर याप्रकरणी पांगरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. घारी ते शिराळे जाणाऱ्या रोडवरील मुलाणीच्या मालकीच्या शेती गट नं ११९ मध्ये वेलकम फायर वर्क्स नावाचा शोभेची दारू फटाके उत्पादन, साठा व विक्रीचा कारखाना आहे. याच परिसरातील गावातील सुमारे १५ कामगार येथे कामाला असत. कारखाना शुक्रवारी बंद होता.

कारखान्यात शोभेची दारू फटाके बनविण्यासाठी वापरण्यात येणारे पदार्थ पोटॅशियम नायट्रेट, कोळसा, ॲल्युमिनीयम पावडर, गंधक हे सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वेगळे ठेवणे आवश्यक असताना सदरचे पदार्थ एकाच जागी ठेवले. तसेच तेथे फटाके तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल अस्ताव्यस्त पडलेला होता.

आगीची घटना समजताच परिसरातील लोकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली. गावचे पोलीस पाटील संतोष फिरके यांनी पांगरी पोलिसांना घटनेची माहिती दिली. अग्निशमन विभागाला माहिती कळताच बार्शीहून अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पाण्याचा फवारा करत आग तत्काळ आटोक्यात आणली. घटनास्थळी पोलीस उपअधीक्षक जालिंदर नालकूल, सपोनि हेमंत काटकर, जगदाळे, ढेरे आदींनी भेट दिली. तसेच फोरेन्सिकचे पथकानेही घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान, पोलीस जिंदास काकडे यांनी फिर्याद दिली आहे. त्यामध्ये, इब्बूस मुलाणी याने जिल्हाधिकारी यांनी वेळोवेळी निर्गमित आदेशाचे व नियमांचे उल्लंघन करून त्याच्या मालकीच्या फटाक्याच्या कारखान्यामध्ये लोकांच्या जीवितास धोका होईल असे निष्काळजीपणे व हयगयीने शोभेच्या दारूची साठवणूक करून तसेच आग, स्फोटक व ज्वालाग्राही पदार्थ यांच्याबाबत हयगयीचे वर्तन करून तसेच त्या ठिकाणी कच्चा माल अस्ताव्यस्त ठेवल्यामुळे आग लागून तेथे स्फोट घडण्यास कारणीभूत झाल्याचे म्हटले आहे. त्याच्यावर भादंवि तसेच भारतीय विस्फोटक अधिनियम १८८४ चे कलम ५, ९ ब प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. बार्शीचे तहसीलदार एफ. आर. शेख, बार्शी उपविभागीय पोलीस अधिकारी जालिंदर नालकोल, बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पीआय अण्णासाहेब मांजरे- पाटील, बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे मिट्टू जगदाळे, पांगरी पोलीस स्टेशनचे जाधव आणि बार्शी नगरपालिकेचे अग्निशामक दलाचे कर्मचारी आणि अधिकारी घटनास्थळी येवून मदतकार्य हाती घेतले.

दीड वर्षांपूर्वी पांगरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पांगरी शिवारातील फटाके कारखान्यात झालेल्या स्फोटात पाच महिला ठार झाल्याची घटना ताजी असताना त्या दुर्दैवी घटनेनंतरही प्रशासनाने सुरक्षेच्या उपाययोजनांकडे दुर्लक्ष केल्याचे शुक्रवारच्या घटनेने सिद्ध झाल्याची चर्चा सुरू आहे. बार्शी तालुक्यातील शिराळे येथेही फटाक्याच्या कंपनीत भीषण स्फोट झाला होता.

सुदैवाने जीवितहानी झाली नाही

फटाके बनविण्याकरिता वापरण्यात येणारे पदार्थ व कच्चा माल ठेवलेल्या खोलीमध्ये आग लागली. ज्वलनशील पदार्थ असल्याने लगेच या पदार्थांनी पेट घेतला व मोठा स्फोट झाला. यामुळे घारी गावाच्या परिसरातील ६ किमीचा एरिया हादरला. ज्वाळा व धुराचे लोळ उठले. बराच वेळ फटाक्यांचे मोठे आवाज येत होते. या आगीमध्ये फटाक्याच्या कारखान्याच्या दोन खोल्यांचे पत्रे उडून मोडतोड होवून तसेच आतील सामान जळून नुकसान झाले. कारखाना शेतात असल्याने व बंद असल्याने सुदैवाने जीवितहानी झाली नाही.

या उपाययोजनांची गरज

- **सुरक्षावस्त्रांचा वापर** : प्रत्येक फटाके कारखान्यात काम करणाऱ्या कर्मचार्यांना आणि अग्निशामक दलाच्या कर्मचार्यांना योग्य सुरक्षावस्त्रांचा वापर अनिवार्य करणे.
- **सुरक्षा प्रशिक्षण** : फटाके कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या सर्व कर्मचार्यांना आणि अग्निशामक दलाच्या कर्मचार्यांना नियमितपणे सुरक्षा प्रशिक्षण देणे.
- **सुरक्षा नियमावली** : फटाके कारखान्यांसारख्या धोकादायक ठिकाणी योग्य सुरक्षा नियमावली कठोरपणे पाळली पाहिजे.
- **तपासणी आणि देखरेख** : फटाके कारखान्यांची नियमित तपासणी आणि देखरेख करणे, तसेच सुरक्षा उपाययोजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट पाहून उडाली खळबळ

कोयत्यानेच तुझा कार्यक्रम करतो

सोलापुरात एकजण मरता मरता वाचला

सोलापूर : मोटर सायकल वरून कोयत्याने जिवे मारण्याचा प्रयत्न केला मात्र युवक त्या इसमाच्या तावडीतून पळून जाण्यात यशस्वी झाला ही घटना सोलापूरच्या बाळे परिसरात घडली. बाबासाहेब अंबादास भोसले, (वय-४१ वर्षे, जोशी गल्ली, बाळे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विकास ऊर्फ पप्पु सुरेश दोरकर, (वय-२८ वर्षे, गणेश नगर बाळ) याच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, ही घटना १९ जून रोजी सकाळी साडे दहाच्या सुमारास पुष्पक हॉटेल जवळ घडली. फिर्यादीची मोटार सायकल क्र एमएच १३ सी पी २३८८ वर बाळे ब्रिजकडून संतोष नगरकडे जात असताना नमूद ठिकाणी आले असता फिर्यादीचा चुलत भाचा यातील आरोपी पप्पू याने फिर्यादी चालवीत असलेली मोटार सायकल अडवून मागील गुन्हयात तुला अडकावलो होतो परंतु तुझी मस्ती जिरली नाही आता तुला दाखवतो म्हणून शिवीगाळ करू लागला. त्यावेळी फिर्यादी त्यास काय झाले असे म्हणाला असता आरोपीने पॅन्टचे मागे ठेवलेला लोखंडी कोयता काढून फिर्यादीस दाखवत तुझा यानेच कार्यक्रम करतो, असा दम भरला. त्यावेळी फिर्यादी हा मोटार सायकल तेथेच सोडून घरी पळून गेला व नंतर येवून तक्रार दिली आहे. तपास पोलीस नाईक कसबे हे करीत आहेत.

● मोहोळ तालुक्यातील अरबळीतील प्रकरण... ● गुन्ह्यातील अन्य आरोपी बाळासाहेब भोसले चार वर्षांपासून फरार

मेव्हण्याच्या गर्भवती पत्नीचा खून करणाऱ्याला जन्मठेप

✔ सुराज्य/सोलापूर

शीतल काळे

महेंद्र भोसले

महेर भोसले

पत्नीला नांदायला न पाठविल्याच्या रागातून महेंद्र सुभान भोसले (वय २३), महेर ऊर्फ मयूर रामा भोसले (वय २४) या दोयांना जिल्हा व सत्र न्यायालयाने शीतल अर्जुन काळे या गर्भवतीच्या खुनात दोषी धरले. त्यातील महेंद्र भोसले यास जन्मठेपेची तर महेर भोसले याला दहा वर्षांच्या सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. यातील बाळासाहेब सुभान भोसले हा आरोपी २० एप्रिल २०२० पासून फरार आहे.

गर्भवती शीतल काळे व फिर्यादी मयताचा पती अर्जुन काळे हा २० एप्रिल २०२० रोजी रात्री नऊच्या सुमारास जेवण करून अरबळी (ता. मोहोळ) येथील शेतातील वस्तीवर झोपला होता. त्यावेळी अर्जूनच्या बहिणीचा पती महेंद्र व त्याचा भाऊ मेहर आणि बाळासाहेब हे तिघेजण त्याठिकाणी आले. त्यांनी माया कोठे आहे, अशी विचारणा केली. त्यावेळी ती याठिकाणी नसून आईकडे बेगमपूरला असल्याचे अर्जुनने त्यांना सांगितले. त्यानंतर चिडलेल्या तिघांनी जांबिया चाकूने अर्जुनच्या हातावर व बगलेत वार केले. त्यावेळी भांडण सोडवायला अर्जुनची पत्नी शीतल आली. त्यावेळी आरोपींनी तिच्यावरही वार केले व पोटात चाकू भोसकला. शीतल जमिनीवर पडली व जागेवरच ठार झाली. आरोपीने त्यांच्या एक वर्षाच्या चिमुकलीवरही वार करून तिलाही जखमी केले. अर्जुन जिवाच्या आकांताने ओरडला व शेजारील लोक त्याठिकाणी आले. त्यावेळी आरोपी तेथून पसार झाले. याप्रकरणी अर्जुन काळे यांनी कामती पोलीस ठाण्यात २१ एप्रिल २०२० रोजी फिर्याद दिली.त्यानुसार गुन्हा दाखल झाला. पोलिसांनी तपास करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सरकारतर्फे ११ साक्षीदार तपासण्यात आले. फिर्यादी, पंच, घटनास्थळाचा पंचनामा, मयताचे कपडे, नेत्र साक्षीदार, वैद्यकीय अधिकारी, तपास अधिकारी, नोडल अधिकाऱ्यांची साक्ष गुन्ह्यात महत्वाची ठरली. सरकारतर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांनी युक्तिवाद केला. त्यांचा युक्तिवाद ग्राह्य मानून जिल्हा व सत्र न्यायाधीश वाय. ए. राणे यांनी आरोपींना शिक्षा ठोठावली. आरोपीतर्फे ॲड. बायस व ॲड. अजमोदीन शेख यांनी काम पाहिले.

ॲड.प्रदीपसिंग राजपूत

समाजासाठी बार्शीच्या देठेंच्या 'प्रसाद'नं बलिदान दिलं, रस्त्यावर आलेल्या 'त्या' परिवाराचं कोणी भलं केलं?

● मराठा संघर्षयोद्धा प्रसाद देंठेच्या आत्महत्येनं कुंटुंबाचं भवितव्य आलं अंधारात
● चौघांच्या उदरनिर्वासह तिघांच्या शैक्षणिक खर्चाचा प्रश्न
● मराठा समाज अन् मायबाप सरकारनं देठे परिवाराच्या पाठिशी तातडीनं उभा राहणं गरजेचं

✔ सुराज्य/बार्शी

गरजवंत मराठ्यांना आरक्षण मिळत नसल्यानं व्यथित झालेल्या मुळच्या बार्शीच्या पण पुण्यात वास्तव्यास असलेल्या मराठा संघर्षयोध्दा प्रसाद देठे यांनी आत्महत्या करुन मराठा समाजासाठी आपले बलिदान दिलं. दरम्यान केवळ समाजासाठी त्यांच्या कायमच्या जाण्यानं त्यांचं कुंटुंब अक्षरश: रस्त्यावर आलं. प्रसाद यांच्या पत्नी चिऊ यांच्यासह श्रध्दा, ओम आणि सायली या चौघांचे भवितव्य अंधकारमय झालं. ज्या प्रसाद यांनी मराठ्यांसाठी बलिदान दिलं. त्याबदल्यात मराठा समाज आणि मायबाप सरकार यांनी त्यांच्या कुंटुंबियांच्या पाठिशी खऱ्या अर्थानं उभं राहणं गरजेचे आहे. हीच खऱ्या अर्थाने प्रसाद यांच्यासाठी श्रद्धांजली ठरणार आहे.

ओम देठे

श्रध्दा देठे

सायली देठे

ज्या प्रसाद यांनी उदात्त भावनेनं मराठा समाजासाठी आपला जीव दिला. त्याबदल्यात त्यांच्या पत्नीच्या मुलांच्या उदरनिर्वाहाबरोबरच शैक्षणिक खर्चाच्या सहकार्यासाठी आता तातडीने मदत करण्याची गरज आहे. मृत प्रसाद देठे यांचा सर्वात मोठा मुलगा ओम हा संगणक अभियांत्रिकेच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत असून तो आता दुसऱ्या वर्षात प्रवेश घेणार आहे. त्याला बारावीच्या परीक्षेत ८७ टक्के गुण मिळाले होते. मात्र तो खुल्या संवर्गातून होता. त्याला प्रथम वर्षात प्रवेश घेण्यासाठी अपेक्षित महाविद्यालयात केंद्रीय गुणवत्ता यादीमध्ये जाण्यासाठी प्राधान्यक्रमात २ टक्के गुण कमी पड़ले. त्यामुळे त्याला अपेक्षित महाविद्यालयात प्रवेश मिळू शकला नाही. ज्या महाविद्यालयात त्याला प्रवेश घ्यावा लागला त्या महाविद्यालयाचे एका वर्षासाठीचे शुल्क हे ८७ हजार रूपये इतके आहे. त्याच्या पूर्ण पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक शुल्क पुर्तेची चिंता आहे.

देठे यांची दुसरी कन्या सायली ही इयत्ता १२ वी मध्ये विज्ञान शाखेत शिक्षण घेत असून करिअरमधले वळणबिंदू असणाच्या वर्षानंतर तिनं पुढचं शिक्षण कसं घ्यायचं? याची मोठी काळजी आहे. त्याचप्रमाणे देठे यांची सर्वात लहान मुलगी कन्या श्रध्दा ही इयत्ता दहावीमध्ये शिकत आहे. दहावीसारख्या महत्वाच्या शैक्षणिक वर्षानंतर तिच्या करिअरचे काय ही चिंतादेखील आहे. ही चिंता मृत देठे यांच्या मनाला भेडसावत होती. देठे यांनी आपण खुल्या प्रवर्गातून आहोत. त्यामुळे आपल्या मुलांना मोठे शैक्षणिक शुल्क भरावे लागते.

तसेच त्यांच्याकडे गुणवत्ता असूनही केवळ आरक्षण नसल्यामुळे त्यांना अपेक्षित महाविद्यालय मिळवणे कठीन जाते आहे, ही खंत मृत देठे यांनी आपल्या निकटवर्तीय मित्र परिवारांमध्ये बोलून दाखविली होती. त्यामुळे राज्यामध्ये गेले वर्षभर मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा आरक्षण सवलतेसाठी सुरू केलेल्या आंदोलन व चळवळीबाबत देठे यांना पूर्ण सहानुभूती होती.

देठे यांनी जरांगे यांच्या पुणे जिल्ह्यात झालेल्या कार्यक्रमात सक्रीय उपस्थिती दर्शवली होती. तसेच आरक्षण आंदोलनाला पूर्णपणे उघड पाठिंबा व्यक्त करत वारंवार त्यांच्या सोशल मीडियावरील खात्यामधून आवाहनही केले होते.

देठे हे अतिशय कष्टाळू होते. ते एका खासगी कंपनीमध्ये सुरक्षा रक्षक म्हणून तेरा हजार रूपये पगारावर सेवेत होते. तसेच त्यांच्या पत्नी या देखील एका कंपनीत कामगार म्हणून नऊ हजार रूपये पगारावर काम करत होत्या. त्यामुळे या दोयांच्या एकूण गोळा बेरीज कमाईतून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह जेमतेमच चालत होता. त्यामुळे आगामी काळात आपल्या अपत्यांच्या शैक्षणिक भवितव्याचे काय हा प्रश्न सातत्याने त्यांच्या मनात घोळत होता.

आत्मघाताच्या निर्णयाचे कुंटुबियांवर भयावह परिणाम

आरक्षण मिळाल्यानंतर आपले प्रश्न सुटतील ही आशा प्रसाद यांच्या मनात होती. पण त्यांनी हा आत्मघाताचा निर्णय घेताना आपल्या कुंटुंबियांवर त्याचे काय परिणाम होतील याचा विचार करायला हवा होता. अशी प्रतिक्रिया देखीलसमाजातून उमटत आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

सगळे जागेमुळे फसलं?

कल्याण
247-31-146

मुंबई
367-65-690

ओबीसींची उपसमिती स्थापन करणार

✔ **मुंबई** : येत्या पावसाळी अधिवेशनात सर्वपक्षीय बैठक बोलाविण्याबरोबरच जात प्रमाणपत्र हे आधारकार्डशी संलग्न करण्याबाबतचा निर्णय मुख्यमंत्री शिंदे यांनी ओबीसी समाजाच्या नेत्यांच्या बैठकीत घेतला. ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघामारे यांच्या उपोषणस्थळी जावून त्यांना उपोषण मागे घेण्याची विनंती करण्यासाठी सरकारमधील सात ते आठ मंत्र्यांचे एक शिष्टमंडळ धाडण्याचे तसेच मराठा समाजाची जशी उपसमिती आहे, तशी ओबीसींचीदेखील उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

संक्षिप्त वृत्त

योगामुळं सुधारलं अर्थव्यवस्थेचंही आरोग्य

नवी दिल्ली : काल जगभरात मोठ्या उत्साहात योग दिवस साजरा केला गेला. दरम्यान, योगामुळं आपलं आरोग्य सुधारते. त्याचबरोबर योगामुळं भारताच्या अर्थव्यवस्थेचंही आरोग्य सुधारलं हे. मोठ्या प्रमाणात योगाच्या माध्यमातून व्यवसाय विस्तारला आहे. त्यामुळं अर्थव्यवस्थेतही वाढ होत आहे. २१ जून हा दिवस जगभरात 'योग दिन' म्हणून साजरा केला जातो. 'आंतरराष्ट्रीय योग दिना'ने शरीर आणि मन निरोगी ठेवण्याचे सूत्र जगाला दिले आहे. तेव्हापासून या योगाशी संबंधित व्यवसायही वाढत आहेत. यामध्ये पोशाख, उपकरणे, चटई, क्लब आणि योग केंद्र यामध्ये योगाचा विस्तार झाला आहे. यामाध्यमातून व्यवसाय विस्तारला आहे. या खास दिवसामुळं जगभरात भारताची प्रतिमा खूप सुधारली आहे. त्यामुळे अर्थव्यवस्थेचीही प्रगती झालीय.

पोर्शे अपघात प्रकरणात न्यायालयाचे सरकारवर ताशेरे

पुणे : पुण्यातील पोर्शे कार अपघातातल्या अल्पवयीन मुलाच्या आत्याने आता हायकोर्टात धाव घेतलीय. मुलाला बेकायदेशीररित्या कोर्टात डांबल्याचा आरोप मुलाची आत्या गीता जैन यांनी केलाय. हायकोर्टात यासंदर्भात सुनावणी सुरू आहे. राज्य सरकारने याचिकेला विरोध केलाय. या प्रकरणात हिबीयस कॉर्पस दाखल होऊ शकत नाही असा दावा सरकारने केलाय. अल्पवयीन आरोपीला जामीन दिल्यानंतर कुठल्याप्रकारची कस्टडी दिलीत? असा सवाल हायकोर्टाने केला आहे. कोर्टाने दिलेला जामीन रद्द करून घेण्याची गरज नव्हती. जामीन दिलेल्या व्यक्तीला पुन्हा कोठडीत टाकलं नाही, हे सिद्ध करा, असा सवाल हायकोर्टाने राज्य सरकारला केला आहे. सरकारने गौतम नवलखा, नरेश गोयल या प्रकरणांचा हवाला कोर्टात दिला. तर याचिकाकर्त्यांचे वकील आभात पोंडा यांचा युक्तिवाद सुरू आहे. मुलाला जामीन दिल्यावरही त्या मुलाला अटक झाली, इथे कायद्याच्या मर्यादेबाहेर जात कोर्टाने अटकेचे आदेश दिले असं पोंडा यांनी म्हटलंय. मुलाची बालसुधारगृहात नीट काळजी घेतली जात नाही त्याच्या जिवाला धोका आहे, असंही पोंडा यांनी म्हटलंय.

अंबानींच्या डिफेक व्हिडिओचा वापर करुन लाखांची फसवणूक

मुंबई : गुंतवणुकीत चांगला परतावा देण्याच्या नावाखाली फसवणाऱ्या टोळीकडून उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या डिफेक व्हिडिओचा वापर करुन फसवणूक करण्याच आली आहे. या व्हिडिओत मुकेश अंबानी हे 'राजीव शर्मा ट्रेड ग्रुप' याकंपनी बद्दल उच्चार करत आहेत. या कंपनीमध्ये इउऋ मध्ये गुंतवणूक करण्यास सांगत असल्याचा तो व्हिडिओ आहे. दरम्यान, या आधीही मार्च महिन्यात अशाच प्रकारे गुंतवणूक कण्याबाबतचा व्हिडिओ सोशल मिडियावर अपलोड करण्यात आला होता. दरम्यान, डॉ. के. के. पाटील यांनी दिलेल्या तक्रारीनुसार २८ मे ते १० जून दरम्यान जास्त परतावा देण्याच्या नावाखाली संबधित कंपनीत ७ लाखांची गुंतवणूक १६ वेगवेगळ्या खात्यांवर पाठवली आहे. मात्र, कालंतराने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पाटील यांनी गुंतवलेले पैसे काढण्याचा प्रयत्न केला. दरम्यान पाटील यांनी ओशिवरा पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार पोलिसानी अनोळखी व्यक्ती विरोधात फसवणूक आणि आयटी ॲक्ट अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी ओशिवरा पोलिस अधिक तपास करत आहेत.

बॉक्स ऑफिसवर मुंज्या चित्रपटाची जादू

आदित्य सरपोतदार दिग्दर्शित, शर्वरी वाघ आणि अभय वर्मा यांचा 'मुंज्या' बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घालत आहे. हा हॉरर कॉमेडी चित्रपट रिलीजच्या दुसऱ्या आठवड्यातही बॉक्स ऑफिसवर कमालीची कमाई करत आहे. रिलीजच्या ६ दिवसांतच आपले बजेट वसूल केले. रिलीजच्या १३व्या दिवशीदेखील चांगली कमाई केली आहे. चित्रपटाने ७० कोटींची कमी केली आहे.

महायुतीत एकनाथ शिंदेंची 'पॉवर' वाढली, तर महाआघाडीत पवारांचेही 'शतकी टार्गेट'

मुंबई/प्रतिनिधी

लोकसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता सगळ्यांचेच लक्ष लागले ते राज्याच्या विधानसभा निवडणुकांकडे. महायुती असो की महाविकास आघाडी असो जागा वाटपावरून सध्या या दोन्ही आघाड्यामध्ये वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात कुठे रस्सीखेच तर कुठे सामंजस्य भूमिका घेत असल्याचे पाहायला मिळत आहे. लोकसभा निवडणुकांच्या निकानंतर महायुतीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची बार्गेनिंग पॉवर वाढली असून महाविकास आघाडीमध्ये पुन्हा एकदा शरद पवारांच्या अनुभवांची खेळी होणार असल्याचे दिसून येते. त्यामुळे, विधानसभा निवडणुकीतील जागावाटपक नेमकं कसं होतं, याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

शिवसेनेच्या ५८ व्या वर्धापन दिनी रामदास कदम यांनी जाहीर भाषणातून १०० जागांची मागणी केली. महायुतीत जागा वाटपाबाबत अजून चर्चा देखील सुरू झालेली नसताना रामदास कदम यांचं हे विधान चांगले चर्चेत आले. दोन वर्षांपूर्वी ठाकरेंच्या सरकारला धक्का देत राज्यात शिंदे यांची शिवसेना आणि भाजप एकत्र आले सरकार मध्ये बसले. त्यानंतर, त्यांच्या जोडीला राष्ट्रवादी काँग्रेसनेही सत्तेत सहभागी होऊन समर्थन दिलं. मात्र ,आता विधानसभा निवडणुकींच्या तोंडावर शिंदे यांच्या शिवसेनेतून १०० जागांची मागणी करण्यात आली आहे. आम्ही जागावाटपात विधानसभेच्या १०० जागा मागितल्या आहेत. त्यातल्या आम्ही ९० जागा जिंकू, ही आमची विनंतीवजा मागणी असल्याचे रामदास कदम यांनी म्हटलं आहे. कारण, लोकसभा निवडणुकीत शिंदेच्या शिवसेनेची बार्गेनिंग पॉवर चांगलीच वाढली आहे.

● जागावाटपांवरुन डोकेदुखी वाढणार

एकूणच काय, महायुती असो वा महाविकास आघाडी विधानसभेच्या जागा वाटपावरून सर्वच पक्षांची चांगलीच डोकेदुखी वाढणार आहे. जागा वाटपासोबतच महायुती आणि महाविकास आघाडीला युती टिकवून ठेवावी लागणार आहे. त्यामुळे येत्या काळात महायुती आणि महाविकास आघाडी कशाप्रकारे कोणताही वादविवाद न होऊ देता जागावाटप करेल आणि निवडणुकीला सामोरे जाणार हे पाहण महत्वाचे ठरेल. मात्र, पुढचे काही महिने तरी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागा वाटपावरुन जोरदार चर्चा आणि रस्सीखेच रंगणार हे मात्र नक्की.

● महायुतीत शिंदेंचे नेते भाजपची डोकेदुखी

लोकसभा निवडणुकीत शिंदेंच्या शिवसेनेला ७ जागांवर यश मिळालं. तर भाजपने ९ जागा जिंकल्या आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला फक्त एकच जागा जिंकता आली. महायुतीचे हे आकडे बघता सध्याच्या घडीला महायुतीत शिंदेंच्या शिवसेनेचे बार्गेनिंग पॉवर वाढल्याचे पाहायला मिळते. त्याचमुळे आता लोकसभा निवडणुकीचा दाखला देत शिंदेंच्या शिवसेनेचे नेते भाजपची डोकेदुखी ठरू लागले आहेत. एकीकडे शिंदेंच्या शिवसेनेचे नेते जाहीरपणे जागा वाटपावर बोलत असताना भाजपकडून मात्र सावध पवित्रा घेतला गेलाय. भाजप आमदार नितेश राणे यांनी रामदास कदम हे ज्येष्ठ नेते असल्याचे म्हणत महायुतीच्या नेत्यांनी जाहीरपणे असे बोलू नये. आमचे नेते एकत्र बसून याचा निर्णय करतील असे म्हटले. तर, प्रवीण दरेकर यांनी देखील हा वरिष्ठांचा निर्णय असल्याचे सांगत बोलण टाळले.

● राष्ट्रवादीचा १०० जागा लढवण्याचा विचार, काँग्रेस शांत

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये एक आठवडा विधानसभा निहाय बैठका आयोजित करण्यात आल्या असून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विधानसभानिहाय विविध सेलकडून विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शंभर जागा लढण्यासंदर्भामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस विचार करत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष १०० विधानसभा लढवण्याच्या तयारीत आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये लोकसभा निवडणुकीत मोठा भाऊ ठरलेल्या काँग्रेसने सद्या तरी जागा वाटपाबाबत काही ठरले नसल्याचे सांगत आमचा उद्देश भाजपमुक्त महाराष्ट्र असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे, जागावाटपात काँग्रेस सामंजस्य भूमिका घेऊन महाविकास आघाडीतूनच विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी प्रयत्न करेल, असेच दिसून येते.

● लोकसभेला पवारांच्या अनुभवाची खेळी :

एकीकडे महायुतीमध्ये जागा वाटपावरून आतापासूनच रस्सीखेच सुरू असताना महाविकास आघाडी मात्र सावध भूमिका घेताना पाहायला मिळत आहे. विधानसभेच्या जागा वाटप संदर्भात महाविकास आघाडीमध्ये अद्याप कुठलीही प्राथमिक सुद्धा चर्चा झालेली नाही. त्यामुळे कोणी किती जागा लढवायच्या हे अद्याप ठरलेलं नाही. जिथे ज्याचा चांगला आणि ताकदीचा उमेदवार ती त्या पक्षाची जागा अशाप्रकारे जागावाटप केलं जाईल. त्यामध्ये अंतिम निर्णय महाविकास आघाडीची समन्वय समिती आणि प्रमुख नेते घेतील, असे शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांकडून सांगण्यात आले.तर, पुण्यात आपल्याला लोकसभेला जास्त जागा मिळायला हव्या होत्या. मात्र, महाविकास आघाडीची एकी राहावी यासाठी मी दोन पाऊल मागे आलो, असे विधान शरद पवारांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केले आहे. एकत्रित राहिलो म्हणून यश मिळाल असे देखील शरद पवार यावेळी म्हणाले. म्हणजेच आपला प्रदीर्घ अनुभव पणाला लावून पवारांनी लोकसभा निवडणुकांत राजकीय खेळी केली, तीच पुनरावृत्ती आता विधानसभेतही दिसून येईल.

मुंबईतील रिझवी कॉलेजचे चार विद्यार्थी बुडाले

खालापूरच्या धरणातील सहलीवेळी घडली दुर्घटना

रायगड : मुंबईतील रिझवी कॉलेजचे चार विद्यार्थी बुडाल्याची घटना घडली आहे. पावसाळी सहलीसाठी खालापूर येथील धरणात गेलेले चार जण बुडाल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे.

पावसाळी सहल गेली होती, यावेळी ही दुर्घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे. धरणात बुडालेले विद्यार्थी मुंबईच्या बांद्रा येथील रिझवी कॉलेजचे असल्याची माहिती समोर आली आहे. सुमारे ३७ तरुण-तरुणी या सहलीसाठी गेले होते, त्यापैकी चार जण बुडले. रायगड जिल्ह्यातील खालापूर येथील धरणात कॉलेजचे चार विद्यार्थी बुडाल्याची प्राथमिक माहिती आहे. खालापूर येथील सत्य साई बाबा धरणात चार युवक बुडाल्याची ही दुर्घटना घडली आहे.

● सहलीला गेलेले चार जण बुडाले :

रायगडच्या खालापूर तालुक्यातील वावर्ले ग्रामपंचायत मधील पोखरवाडी जवळील सत्य साई बाबा धरणात चार युवक बुडाले. पावसाळी सहलीसाठी रिझवी कॉलेजमधील एकूण ३७ युवक-युवती खालापूर येथे आले होते. सहलीवेळी पाण्याचा अंदाज न आल्याने धरणात चार जण बुडाले, यावेळी बचावकार्य राबवण्यात आलं. मात्र, त्या चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे.

● धरणात बुडून चार जणांचा मृत्यू :

घटनास्थळी खालापूर पोलीस दाखल झाले असून त्यांनी चार जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे. या दुर्घटनेत ईशांत यादव, आकाश माने, रनक बंदा, एकलव्य सिंग या चार विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला आहे.

अटल सेतूला ५ महिन्यातच तडे

मुंबई : मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या अटल सेतूवर भेगा पडल्या असा दावा काँग्रेसनं केलाय. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी आज अटल सेतूवर जाऊन पाहणी केली. या सरकारला जनतेच्या सुरक्षेशी काहीही देणंघेणं नाही, खुद्द मोदी हे भ्रष्टाचाऱ्यांचे सरदार आहेत अशी टीका पटोले यांनी केली. अटल सेतूबद्दल पटोलेंचे दावे महाराष्ट्र भाजपनं खोडून काढलेत. अटल सेतूला बदनाम करणं बंद करा, असे महाराष्ट्र भाजपनं ट्वीट केले आहे.

अटल सेतूला बदनाम करणं बंद करा. यांना निर्माण करणं जमलं नाही पण बदनाम करण्यात यांचा हात' कोणी पकडू शकत नाही. फोटोत दिसणाऱ्या भेगा या अटल सेतूवरील नाही हे स्पष्ट दिसतंय. कारण या भेगा अटल सेतुकडे जाणाऱ्या जमिनीवरच्या रस्त्याला पडल्या होत्या. तातडीने दुरूस्तीचे काम सुरू करून ते काम सुद्धा पूर्ण होत आलं आहे, असे भाजपनं ट्वीटमध्ये म्हणाले.

● एमएमआरडीएने केलेला खुलासा

अटल सेतूचे प्रोजेक्ट हेड म्हणाले, अटल सेतू पुलाच्या मुख्य भागावर कोणतेही तडे गेले नसून विविध माध्यमांतून त्याबाबत अफवा पसरवल्या जात असल्याचे निदर्शनास आले आहे. कृपया अफवांवर विश्वास ठेवू नका. अटल सेतूला जोडणाऱ्या पोहोचमार्गावर किरकोळ भेगा आढळून आल्या आहेत. सदर पोहाचमार्ग मुख्य पुलाचा भाग नसून तो पुलाला जोडणारा सेवा रस्ता आहे. तसेच उत्पन्न झालेल्या भेगा या प्रकल्पातील संरचनात्मक दोषांमुळे नसून त्यामुळे पुलाच्या संरचनेला कोणताही धोका नसल्याचे लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. प्रकल्पाच्या ऑपरेशन आणि मेंटेनन्स टीमने २० जून २०२४ रोजी केलेल्या तपासणीदरम्यान, उलवेकडून मुंबईच्या दिशेला जाणाऱ्या रॅम्प क्रमांक ५ अस्फाल्टवर तीन ठिकाणी किरकोळ भेगा निदर्शनास आल्या असून त्या त्वरीत दुरूस्त करण्यासारख्या आहेत. अटल सेतू प्रकल्पाच्या पॅकेज ४ चा कंत्राटदार, मेसर्स स्ट्रॅबॅग या कंपनीने सदर भागातील दुरुस्तीचे काम सुरू केले असून सेतूवरील वाहतुकीला कोणताही अडथळा न होऊ देता २४ तासांत हे काम पूर्ण केले जाणार आहे.

कोकण रेल्वेच्या प्रवाशांसाठी एक आनंदाची बातमी आहे. रेल्वेमार्गाच्या दुहेरीकरणाला वेग आला असून त्याचा प्राथमिक अहवालही रेल्वे बोर्डाला दिलाय. तो मंजूर झाला की या कामाला वेग येणार असून त्यामुळं जादा गाड्या सोडता येतील आणि गाड्यांचा वेग वाढेल.

● केंद्रीय निवडणूक आयोग विधानसभेच्या तयारीला लागले

मतदार याद्या अद्ययावत करण्याची अधिसूचना जारी

नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकींनंतर केंद्रीय निवडणूक आयोगाकडून विधानसभा निवडणुकींची तयारी सुरू करण्यात आली आहे. महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड आणि जम्मू काश्मीर राज्यांच्या विधानसभा निवडणुकींची तयारी सुरू केली आहे. आयोगाने निवडणूक याद्या अद्ययावत करण्यासाठी अधिसूचना जारी केली आहे. घरोघरी जाऊन मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मतदान केंद्राच्या काही अडचणी असतील, त्या दूर केल्या जाणार आहेत.

आगामी २५ जूनपासून म्हणजेच येत्या चार दिवसांपासून महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड, जम्मू काश्मीर या ठिकाणी निवडणुकींच्या आधीची तयारी सुरु होणार आहे. १८ व्या लोकसभेसाठीची निवडणूक

पार पडल्यानंतर आता निवडणूक आयोगाने महाराष्ट्र, झारखंड, हरियाणा या ठिकाणी निवडणूक पूर्वतयारी सुरु केली आहे. हरियाणा विधानसभेचा कार्यकाळ ३ नोव्हेंबर, महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबर तर झारखंड विधानसभेचा कार्यकाळ ५ जानेवारी २०२५ ला संपणार आहे. त्यादृष्टीने आता राज्यांना निवडणुकींच्या तयारीला लागण्यासंबंधी सूचना करण्यात आल्या आहेत.

● लोकसभेसाठी ६४.२ कोटी लोकांनी मतदान केलं

भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी पत्रकार परिषदेत मतदान प्रक्रियेची माहिती दिली. हा एक चमत्कार आहे. जे झालं तो चमत्कार आहे. आपल्यासाठी हा एक ऐतिहासिक क्षण आहे. जगभरात आपण एक विक्रम प्रस्थापित केला आहे. या निवडणुकीत ६४.२ कोटी मतदारांनी मतदान केलं आहे. या निवडणुकीत एकूण ३१.२ कोटी महिलांनी मतदान केले, असे राजीव कुमार यांनी सांगितले.

● महाराष्ट्रात महाविकास आघाडीला घवघवीत यश

लोकसभा निवडणुकीचा निकाल याच महिन्यातील (जून) ४ तारखेला लागला. यामध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडीने घवघवीत यश संपादन केले आहे. महाराष्ट्रातील लोकसभेच्या एकूण ४८ जागांपैकी ३० जागांवर मविआचे उमेदवार विजयी झाले. लोकसभा निवडणुकीपूर्वी राज्यात काँग्रेसला घरघर लागली होती. अनेक बड्या नेत्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली होती. तर पक्षात पडलेल्या फुटीमुळे ठाकरे गट आणि शरद पवार गटाचीही अवस्था तितकीशी चांगली नव्हती. भाजपच्या अजस्त्र यंत्रणेसमोर हे पक्ष कितपत टिकाव धरतील, याबाबत साशंकता होती. मात्र, मविआने ३० जागा जिंकत या सर्व शंका-कुशंका फेटाळून लावल्या. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकाला सामोरे जाताना मविआतील तिन्ही पक्षांचा आत्मविश्वास कैकपटीने वाढला आहे.

महाविकासआघाडी

अस्सल सोलापुरी
सुराज्य सोलापूर

माळशिरस : वटसावित्री पौर्णिमेनिमित्त जन्मोजन्मी हाच पती लाभू दे अशी प्रार्थना करत वटवृक्षाची पूजा करुन रणरागिणींनी या निमित्ताने कॅमेऱ्यासमोर दिलेली अशी झकास पोझ.

महापालिकेसह वैकुंठभूमीत वावर असणाऱ्यांना नाही थांगपत्ता

अमावस्येच्या रात्री आंध्रप्रदेश, कर्नाटकातून मांत्रिक स्मशानभूमीत

✔ सोलापूर/प्रतिनिधी

मोदी स्मशानभूमीची सुरक्षा व्यवस्था 'रामभरोसे' आहे. इथं येणा-जाणाऱ्यांना कोणीच कोणाला अडवत नसल्यानं कोणाचाही आक्षेपार्ह वावर होतोय हे वास्तव आहे. त्यातून अमावस्या अन् पोर्णिमेच्या मध्यरात्री आंध्र प्रदेशासह कर्नाटक राज्यातून काही मांत्रिक विधीसाठी या स्मशानभूमीत येऊन जात असल्याची धक्कादायक बाबीला बळकटी येतेय. विशेष म्हणजे याला स्मशानभूमीत मृतदेहाचं दफन करण्यासाठी खड्डे खोदणाऱ्यांबरोबरच काही रिक्षा चालकांकडून दूजोरा मिळाला आहे.

प्रियांश वाघमारे
मृतदेह गायब प्रकरण

- गोरीवर ठिया मांडून विधी; पडतात बाहुल्या, लिंबू, बिबं
- बाळंतीण महिला, जावळ असलेल्या बालकाच्या मृतदेहावर लक्ष
- अंधाराचं साम्राज्य, वेड्या बाभळींची दाटी, मोठा परिसर, नसलेल्या सुरक्षा व्यवस्थेनं कोण येतं-जातं याचा कोणाला थांगपत्ताच नाही
- रात्री दहा ते सकाळी नऊ वाजेपर्यंत स्मशानभूमीत नसतं कोणीच

उल्लेखनीय बाब म्हणजे अंधाराचं साम्राज्य, वेड्या बाभळींची दाटी, मोठ्या डुकरांसह कुत्री, विस्तीर्ण परिसर शिवाय महापालिकेहून या ठिकाणी कोणतीच पुरविण्यात न आलेली सुरक्षा व्यवस्था यामुळं या स्मशानभूमीत कोण येतं-जातं याचा कोणाला कसलाच थांगपत्ता लागत नाही. रात्री दहा ते सकाळी नऊ वाजेपर्यंत स्मशानभूमीत कोणीच नसतं. त्यातच अमावस्या आणि पोर्णिमेबद्दलची स्मशानभूमीच्या संदर्भानं पसरवलेली भिती हे पार्श्वभूमीवर, अमावस्या अन् पोर्णिमेला जादूटोणा तसेच अघोरी विद्येचा प्रकार करणारे मांत्रिक येत असतील या गोष्टीला अधिकच बळकटी मिळतेय.

विशेषत्वे, बाळंतीण महिला आणि जावळ असलेलं बालक यांचा जर मृत्यू झाला असेल तर त्यांच्या मृतदेहावर जादूटोण्याची अघोरी विद्या फळाला येते, असे मृतदेह मांत्रिक लोक शोधात असतात. त्यातून सोलापूरच्या मोदी स्मशानभूमीत असे मृतदेह येणाऱ्यांवर मांत्रिकांचं विशेष लक्ष असतं अशी चर्चा अत्यंविधी आणि दफन क्रिया पार पाडण्यात सहभागी असलेल्या या स्मशानभूमीमधील काहींमध्ये आहे. या स्मशानभूमीत ज्या ठिकाणी गोर खोदून व्यक्तींचा दफनविधी करण्यात आलेला आहे. त्या गोरीवर बसून मांत्रिक आपला विधी अमावस्या किंवा पोर्णिमेच्या दिवशी करतात याबद्दलचा गवगवा या स्मशानभूमीत बसणाऱ्यांमध्ये आहे.

सोलापूर : कोणतीच सुरक्षा व्यवस्था नसल्याने मोकाट तसेच पाळीव जनावरांचा राबता दररोज असा स्मशानभूमीत असतो.

सोलापूर : मृतदेह दफन केल्याचा खड्डा असा उकरलेला दिसतो. पण नेमकं खड्डा कोण उकरतं. याच उत्तर छात्तीठोकपण कोणाकडे नाही.

सोलापूर : मोदी स्मशानभूमीत मोठ्या संख्येने वावर असणाऱ्या गलेलठ्ठ डुकरांचे दिवसा वास्तव्य असलेले ठिकाण.

रात्रीच अंत्यसंस्कार उरकून जाण्याचेही गंभीर प्रकार

मोदी स्मशानभूमीमध्ये बऱ्याच वेळी रात्री दहा वाजलेनंतर जेव्हा महापालिकेचं कोणीच इथं नसतं तेव्हांदेखील मृतदेहावर अंत्यसंस्कार उरकून जाण्याचे प्रकारही होत असल्याचे विद्युत दाहिनी विभागाच्या कर्मचाऱ्यांनं सांगितलं. रात्री-अपरात्री उरकू न घेतलेल्या मृतदेहावरील अंत्यसंस्कारासंदर्भात कोणतीच माहिती समजत नाही.

अमावस्या-पौर्णिमेच्या दिवशीचं साहित्य गायब होतं कसं?

अमावस्या आणि पोर्णिमेला या स्मशानभूमीत हळद, कुंकु, बिबा, बाहुल्या, सुया, छोटे छोटे आरसे, लिंबू असं साहित्य पडतं असं सांगण्यात आलं. पण हे साहित्य अमावस्या आणि पोर्णिमेच्या दुसऱ्या तिसऱ्या दिवशीच स्मशानभूमीतून गायब कसं होतं? कारण अशा वस्तु उचलण्याबद्दल प्रचंड भितीची भावना लोकांच्यामध्ये मनामध्ये असते. तेव्हा हे साहित्य नेमकं उचलतं कोण? याचं उत्तर मात्र स्मशानभूमीत वावर असणाऱ्यांपैकीच कोणीच देत नाही.

नगरअभियंता विभाग एवढा बेफिकीर कसा?

मोदी स्मशानभूमीसह शहरातील सर्वच स्मशानभूमींची जबाबदारी सोलापूर महापालिकेची पर्यायानं नगरअभियंता विभागाची आहे. मुख्यत्वे, मोदी स्मशानभूमीत भयावह प्रकार घडतात. तिथं रखवालारासह सुरक्षा व्यवस्था अधिक चांगली ठेवणं हे शहाणपण नगरअभियंता विभागाला आजवर कसं आलं नाही. नगरअभियंता विभाग एवढा बेफिकीर कसा? हा संतापजनक सवाल आहे.

शिंदेंनंतर स्मशानभूमीला वालीच नाही

मोदी स्मशानभूमीकडे शिंदे नामक महापालिकेचा कर्मचारी नियुक्तीस होता. मात्र मागच्या साधारण सहा महिन्यांपूर्वी हा कर्मचारी सेवानिवृत्त झाला आहे. तद्नंतर या ठिकाणी कोणत्याही कर्मचाऱ्याची नियुक्त करण्यात आली नसल्याचे सांगण्यात आले.

विद्युत दाहिनीवाल्यांचे कानावर हात

मोदी स्मशानभूमीमध्ये विद्युत दाहिनी आहे. विद्युत दाहिनीवर अत्यंसंस्कार करण्याची वेळ सकाळी दहा ते रात्री दहा पर्यंतची आहे. शिवाय या विभागात इलेक्ट्रीकल ऑपरेटर म्हणून राजू डोलारे हा कर्मचारी कार्यरत आहे. विद्युत दाहिनी विभागाशिवाय या स्मशानभूमीत सरपणारवर होणारे अत्यंसंस्कार, दफनविधी यासंबंधी आम्हाला माहिती असत नाही असं या कर्मचाऱ्याकडून सांगण्यात आले.

अंगावर येणाऱ्या डुकारांचा रात्री मुक्त संचार

मोदी स्मशानभूमीमध्ये ज्या भागात मृतदेहांचे दफन केलं जातं त्या परिसरात रात्री भयावह डुकरांचा मुक्त संचार असतो. शिंदे नामक महापालिकेचा कर्मचारी ज्या वेळी या ठिकाणी कार्यरत होता. त्याच्याकडून या डुकरांना हुसकावण्याचा प्रयत्न व्हायचा त्यावेळी गलेलठ्ठ डुकरं अंगावर यायची, हल्ला करण्याच्या प्रयत्नात असायची अशी माहिती या स्मशानभूमीत बसणाऱ्यांपैकी काहींनी दिली.

दाजी पेठेतील महासेवा शिबिरास प्रतिसाद

१७७४ नागरिकांनी घेतला लाभ

✔ सोलापूर/प्रतिनिधी

भारत सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ अंत्योदय घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे आणि माजी नगरसेवक देवेंद्र राजेश कोठे यांच्या संयुक्त विद्यमाने शहर भाजपच्यावतीने आयोजित महासेवा शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात जवळपास १७७४ जणांनी लाभ घेतला. यावेळी मोफत ई-श्रम नोंदणी आणि आयुष्मान कार्ड, आभा कार्ड,मतदान नोंदणी व दुरुस्ती, रेशन कार्ड नोंदणी व दुरुस्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

स्वर्गीय विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानच्या वतीने सर्व योजनेतील संपूर्ण शासकीय शुल्क भरण्यात आली. त्यामुळे नागरिकांना या शिबिराचा मोफत लाभ मिळाला. या शिबिरास शहराध्यक्ष नरेंद्र काळे, राष्ट्रवादी गटनेते किसन जाधव, लक्ष्मण गायकवाड,डॉक्टर सूर्यप्रकाश कोठे, नागेश खरात यांनी भेट दिली.

यावेळी ज्येष्ठ नेते रामचंद्र जन्नू, नागनाथ सोमा, रवींद्र नक्का, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, रामेश्वरी बिरू, राधिका पोसा, मेघनाथ येमुल, भूपती कमटम, जय साळुंखे, नागेश सरगम, बजरंग कुलकर्णी, सुनील गौडगाव, सावित्रा पल्लाटी, महिला आघाडी विजया वड्डेपल्ली, उद्योग आघाडी अंबादास बिंगी,शिक्षक आघाडी दत्ता पाटील आदींसह भाजपाचे पदाधिकारी, व स्वर्गीय विष्णुपंत कोठे प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपस्थित होते.

सोलापुरात पसरतेय 'हॉर्न बजाने की बिमारी'!

सायलेंसरची टरटर पोलीस अन् आरटीओंना मात्र आवाजच येईना

✔ सोलापूर/ॲड. विजयकुमार जाधव

सोलापूर शहरात कर्णकर्कश 'हॉर्न बजाने की बिमारी'पसरत आहे. असे हॉर्न वाजवण्यावर बंदी आहे. तरीही कारवाई होत नसल्याचे शहरात आवाजाचाचे हे प्रदुषण रोखण्यासाठी आरटीओ, पोलिस यांनी प्रबोधन आणि प्रसंगी कारवाई करण्याची गरज आहे.स्मार्ट सिटी सोलापूर प्रदूषणाच्या विळख्यात आहे.

'स्मार्ट सिटी' ध्वनी प्रदुषणाच्या विळख्यात

शहरात आणि जिल्ह्यात लाखाच्या घरात अधिक वाहने आहेत. दिवसेंदिवस वाहनधारकांना निष्कारण हॉर्न वाजवण्याची सवय जडत असल्याचे चित्र आहे. वास्तविक पहाता आवाजाचे प्रदुषण लक्षात येता गरज असेल तरच हॉर्न वाजवला पाहिजे.

पण वाहनधारकामध्ये गरज नसतानांही हॉर्न वाजवणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. याशिवाय कर्णकर्कश हॉर्न बसवून येणाऱ्यांची संख्याही वाढत आहे. ट्रक, टेंपो, कंटेनर यासारख्या जड वाहनांमध्ये असलेले हॉर्न अगोदरच मोठ्या आवाजाचे असतात, तरीही चारचाकींच्या चालकांकडून मोठ्या आवाजाचे हॉर्न बसवून घेण्याचे प्रमाण वाढले आहे. त्याचप्रमाणे शहरातील कार, जीप, ऑटोरिक्षा, दुचाकींचेही हॉर्न बदलून प्रेशर हॉर्न बदलून घेण्याची क्रेज निर्माण झाली आहे.

प्रबोधनाची गरज

कर्कश हॉर्नचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी पोलीस आणि आरटीओंच्या मोहिमेबरोबर विविध सेवाभावी संस्थांच्या मदतीने प्रबोधनाची गरज आहे.यासाठी स्पेअर पार्ट दुकानदार,वाहन वितरक, बस, ट्रक ऑअपरेटर्स संघटना, रिक्षा, टॅक्सी संघटना,शाळा व माहविध्याल्य प्रमुख, विविध कंपन्या यांचे प्रबोधन करण्यासाठी पोलीस आणि आरटीओ कार्यालयाने पुढाकार घेण्याची गरज आहे.

अँसेंबल्ड सायलेंसर

शहरात बुलेट व हायस्पीड बाईक तसेच काही रिक्षा चालकमुळे सायलेंसरमध्ये बदल करुन आवाजाची टरटर वाढवत आहेत. अनेक बुलेटस्वार तर हौसेखातर सायलेंसरमध्ये बदल करुन घेतात. अशा बदल केलेली दुचाकी फट-फट आवाज करत प्रत्येकाचे लक्ष वेधून घेते. तसेच ऑटा रिक्षांच्या सायलेंसरची टिकली काढून टाकल्याने रिक्षाचा मूळ आवाज बदलून आवाजाची टरटर वाढते.

हॉर्न वाजवण्याच्या ध्वनी प्रदूषणातून जडणारे आजार

मानसिक ताण, उच्चदाब,हृदयरोगास आमत्रंण, कायमचा बहिरेपणा, ज्येष्ठ नागरिक आणि बालकांमध्ये, रुग्णांमध्ये घबराट,रिस्की ड्रायव्हिंग, अपघातसदृश परिस्थिती, मानसिक नैराश्य.

कारवाईची काय आहे तरतुद?

केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ चे नियम ११९ मधील तरतुदीनुसार वाहनास योग्य हॉर्न बसविणे आवश्यक आहे. कुठल्याही वाहनांना वेगवेगळे आवाज काढणारे, प्रेशर हॉर्न किंवा त्या पधतीचे कुठलेही यंत्र, रिव्हर्स हॉर्न किंवा मल्टीटोन हॉर्न बसविण्यास नियम १९९ अन्वये बंदी आहे. कायद्याचा भंग केल्यास चालक,मालकाला एक हजार रुपये दंडाची शिक्षा आहे. नवीन मोटार वाहन कायद्यात दुसऱ्यांदा हा गुन्हा केल्यास दोन हजार रुपये दंडाची शिक्षा आहे. तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम अंतर्गत विहीत ध्वनी प्रदुषण नियमन व नियंत्रण नियम २००० च्या तरतुदीप्रमाणे विहीत विशिष्ट डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणारे विशेषत: प्रेशर हॉर्न हे ध्वनी प्रदुषण करताना आढळल्यास त्या कर्कश हॉर्न वाजविणाऱ्या चालकासह एक लाख दंड व पाच वर्ष शिक्षा किंवा दोन्हीही होऊ शकते.

अन्न दारिद्र्याचे भय

माणसाला तीन मूलभूत गरजा हव्या असतात. एक अन्न, वस्त्र आणि निवारा. आज भौतिक गरजा वाढल्या आहेत, हा भाग वेगळा पण जगण्यासाठी त्या तीन खऱ्या गरजा आवश्यक असतात. मोठ्यांना जशा अन्न-पाण्याची गरज असते, तशी बालकांना देखील लहानपणी सकस आहाराची आवश्यकता असते. रांगड्या वयात त्याला पौष्टिक अन्न दिले गेले नाही तर ते मूल कुपोषणग्रस्त होतो. कदाचित अशक्तही होते. लहानग्यांच्या अन्न दारिद्र्याविषयी एक भयावह चित्र समोर आले आहे. ते पाहिल्यानंतर जगभरातील सत्ताधीशांची झोप उडालेली असावी. लहानपणी सकस आहार न दिल्याने कित्येक कोटीपर्यंत मुले कुपोषणग्रस्त असल्याची धक्कादायक माहिती एका अहवालातून उजेडातून आली आहे. लहान मुलांना सकस अन्नापासून वंचित ठेवण्याला अन्न दारिद्र्य म्हटले जाते. जगातील चारपैकी एका मुलाला सध्या अन्न दारिद्र्याची सम स्या आहे. जगभरातील अशा पाच वर्षांखालील मुलांची संख्या १८.१ कोटीपर्यंत असल्याचे सांगण्यात येते. काही देशांमध्ये हे प्रमाण जास्त तर काही देशांमध्ये कमी आहे. विशेष म्हणजे यात गरीब देशांसोबत श्रीमंत देशांचाही समावेश आहे. त्यामुळे कुटुंबाच्या उत्पन्नावर अन्न दारिद्र्य अवलंबून नसल्याचे दिसते. गरीब देशांमध्ये मुलांना गरिबीम ुळे सकस आहार मिळत नाही. याच वेळी श्रीमंत देशांमध्ये सकस आहाराऐवजी इतर अयोग्य पर्यायांना पसंती दिली जात असल्याचे वास्तव आहे. अन्न दारिद्र्य असलेल्या गरीब देशांतील मुलांची संख्या ८.४ कोटी तर मध्यम व श्रीमंत देशांतील मुलांची संख्या ९.७ कोटी आहे. जगातील ६४ देशांचा अहवालात विचार करण्यात आला आहे. गेल्या दशकभरात अन्न दारिद्र्य असलेल्या लहान मुलांच्या प्रमाणात फारसा बदल झालेला नाही. ही संख्या २०१२ मध्ये ३४ टक्के होती आणि ती २०२२ मध्ये ३१ टक्के झाली. जगातील ३२ देशांमध्ये अन्न दारिद्र्याचे प्रमाण स्थिर असून, ११ देशांमध्ये ते वाढत असल्याचे निष्पन्न झाले आहे. याचवेळी दशकभरात पश्चिम व मध्य आफ्रिकेत अन्न दारिद्र्याचे प्रमाण ४२ टक्क्यांवरून ३२ टक्क्यांवर खाली आले आहे. अहवालात समाविष्ट असलेल्या तीनपैकी एका देशात अन्न दारिद्र्याचे प्रमाण कमी झाले आहे. दक्षिण आशिया आणि सहारा उपखंडातील अन्न दारिद्र्याची समस्या अधिक बिकट आहे. अन्न दारिद्र्य का निर्माण होत आहे याविषयीची कारणे देखील समोर आली आहेत. अन्न दारिद्र्य असलेली पाचपैकी चार मुले स्तनपान, दुग्ध उत्पादने आणि तांदूळ, मका अथवा गव्हासारखी तृणधान्ये यावर पोषण झालेली आहेत. याचवेळी १० टक्क्यांपेक्षा कमी मुलांना आहारात फळे आणि भाज्या मिळत आहेत. याचबरोबर अंडी, मांस आणि मासे मिळणाऱ्या मुलांची संख्या केवळ ५ टक्के आहे. तसेच निकस असलेले खाद्यपदार्थ आणि खाद्यपेयांच्या सेवनाचे प्रमाण लहान मुलांमध्ये अधिक आहे. यामुळे अन्न दारिद्र्य असलेल्या ४२ टक्के मुलांच्या आहारात जास्त साखर, मीठ अथवा चरबी असलेल्या खाद्यपदार्थांचा समावेश आहे. कोरोना संकटानंतर रशिया-युक्रेन युद्ध सुरू झाले. याच वेळी अनेक देशांमध्ये अंतर्गत संघर्षही सुरू झाले. त्यातच तापमान बदलामुळे निसर्गचक्र बदलल्याचा फटका बसू लागला. यामुळे पालकांना आपल्या लहान मुलांना सकस आहार देण्यात अनेक अडचणी येऊ लागल्या आहेत. डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो आणि सोमालिया या देशांमध्ये तर ८० टक्के पालकांनी आपल्या लहान मुलांना सकस आहार देण्यात अपयशी ठरल्याची कबुली दिली आहे. यासाठी त्यांनी आर्थिक अडचणींकडे बोट दाखविले आहे. सध्या अशांतता असलेल्या देशांतील तीनपैकी एक मूल अन्न दारिद्र्यात जगत आहे. त्यामुळे अन्न दारिद्र्याचे प्रमाण अफगाणिस्तानात ४९ टक्के, सोमालियात ६३ टक्के आहे. पॅलेस्टाईनमधील गाझा पट्टीत तर दहापैकी नऊ मुलांना अन्न दारिद्र्याची समस्या आहे. लहान मुलांना सकस आहार पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावा, यासाठी युनिसेफने पुढाकार घेतला आहे. कमी उत्पन्न असलेल्या देशांमध्ये सामाजिक सुरक्षा योजनांवर भर दिला जात आहे. अन्न दारिद्र्य संपविण्यासाठी सर्वच देशांनी पुढाकार घ्यावा, अशी भूमिका युनिसेफने मांडली आहे. यासाठी प्रत्येक देशाने त्यांच्या धोरणात अन्न दारिद्र्याचा समावेश करून कुपोषण थांबविण्याचे शाश्वत विकास उद्दिष्ट आखायला हवे. आरोग्य व्यवस्था आणखी बळकट करण्याची गरज असून, त्या माध्यमातून पालकांपर्यंत मुलांच्या सकस आहाराच्या सवयी पोहोचवायला हव्यात, असे युनिसेफचे म्हणणे आहे.

सामाजिक

हिंदूत्व : निष्ठावंतांची पर्वणी!

गेल्या काही वर्षांत भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या, संस्थांच्या सभांतून, कार्यक्रमांतून त्याचा पुनरुच्चार केला जात असल्याचेही पाहायला मिळते आहे. हिंदू राष्ट्र म्हणजे भारतीय संविधानाला डावलून केवळ एकाच धर्माच्या कल्याणासाठी केलेली व्यवस्था असणार की काय असे वाटून काही जण या संकल्पनेला विरोध करताना दिसत आहेत तर काही जण अशा प्रकारची मागणी करणे असंविधानिक असल्याचे सांगत यास विरोध करत आहेत. बहुसंख्य असलेल्या हिंदूस्थानाला 'हिंदू राष्ट्र 'म्हणून घोषित करणे खरेच असंविधानिक आहे का याबाबत या लेखातून थोडक्यात जाणून घेऊया !

देशाच्या स्वातंत्र्यानंतर काही काळ निद्रिस्त असणारा हिंदू समाज हळूहळू जागृत होऊ लागला आहे. हिंदूंच्या प्रथा, परंपरा, हिंदूंची प्रतिके, श्रद्धास्थाने यांच्या विविध माध्यमातून होणाऱ्या विडंबनाच्या आणि अपप्रचाराच्या विरोधात तो व्यक्त होऊ लागला आहे, सनदशीर मार्गाने या प्रकारांना विरोध करु लागला आहे. नुकताच येऊ घातलेल्या आमिर खानच्या मुलाच्या 'महाराज' या चित्रपटाचे प्रसारण गुजरात उच्च न्यायालयाने स्थगित केले हे त्याचेच फलित आहे. हिंदूंनी संघटितपणे केलेल्या विरोधामुळे हा चित्रपट नियोजित तारखेला प्रसारित होऊ शकला नाही. सलमान खानच्या 'दबंग ३' या चित्रपटातील एका गाण्यात साधू आणि देवता यांच्या वेशभूषेत काही जण अंगविक्षेप करत नृत्य करताना दाखवण्यात आले होते, हिंदूंनी केलेल्या विरोधामुळे ते दृश्य चित्रपटातून काढण्यात आले. हिंदूंनी केलेल्या विरोधामुळे अक्षय कुमारच्या 'लक्ष्मी बॉंब' चित्रपटाचे नाव बदलून 'लक्ष्मी' असे करण्यात आले. कुंभमेळ्यात हिंदूंवर लादण्यात येणारा प्रवासी अधिभार रहित करण्यात आला. श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठापनापूर्वी अयोध्येत ८४ कोसी यात्रामार्गात मद्य-मांस यावर बंदी आणण्याची हिंदूंनी एकमुखाने केलेली मागणी मान्य करण्यात आली. हिंदूंमध्ये जागृती झाल्याची ही हल्लीची काही मोजकी उदाहरणे आहेत. आजतागायत हिंदूंना गृहीत धरून मनोरंजन क्षेत्रातून हिंदूंच्या देवीदेवतांचा अवमान करणारी मंडळी आता सतर्क झाली आहेत. जात-पात, संप्रदाय, संघटना, पक्ष यांमध्ये विखुरला गेलेला हिंदू समाज आता 'हिंदू' म्हणून एक होऊ लागला आहे. हिंदूंच्या संघटनशक्तीमुळे सेक्युलर म्हणून स्वतः ची ओळख दाखवणाऱ्या पक्षाची प्रमुख मंडळीही तिर्थाटने करू लागली आहेत. हिंदू समाजात होत चाललेला हा बदल अचानकपणे झालेला नाही. हिंदूंच्या संघटनासाठी हिंदू जनजागृती समिती नामक एक संघटना मागील अनेक वर्षांपासून अविरतपणे झटत आहे. हिंदूंना संघटित करण्यासाठी स्थापन करण्यात आलेली ही समिती मागील ११ वर्षांपासून गोव्यात 'वैश्विक हिंदू राष्ट्र महोत्सवा'चे आयोजन करत आहे. यंदा २४ ते ३० जून या कालावधीत फोंडा, गोवा येथे श्री रामनाथ देवस्थानातील श्री विद्याधिराज सभागृहात 'द्वादश अखिल भारतीय हिंदू राष्ट्र अधिवेशन' अर्थात् वैश्विक 'हिंदू राष्ट्र महोत्सव' संपन्न होत असल्याचे या समितीच्यावतीने मुंबई मराठी पत्रकार संघात पत्रकार परिषद येऊन जाहीर करण्यात आले. मागील ११ अधिवेशनांच्या माध्यमातून २५ राज्यातील १००० हून अधिक हिंदू संघटना या अधिवेशनाच्या माध्यमातून संघटित झाल्या आहेत. या सर्व संघटना यंदाच्या अधिवेशनात सहभागी होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

१९४७ साली देशाची धर्माच्या आधारावर फाळणी झाली आणि बहुसंख्य मुसलमानांचा पाकिस्तान हा स्वतंत्र देश निर्माण झाला. तेव्हाच भारताला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित का करण्यात आले नाही? तेव्हापासून आतापर्यंत भारताच्या अनेक भागांत मिनी पाकिस्तान तयार करण्याचे षड्यंत्र अविरतपणे सुरु आहे. २०४७ सालापर्यंत भारताला इस्लामी राष्ट्र बनवण्याचे मोठे षडयंत्र असल्याचे राष्ट्रीय तपास यंत्रणांच्या चौकशीत समोर आले आहे. अशा वेळी 'स्वयंभू हिंदू भूमी' असलेल्या भारताला स्वत:ची ओळख पुन्हा मिळवून देण्यास लोकांचा विरोध असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. हिंदू राष्ट्र अर्थात रामराज्य.

आजही जगाच्या पातळीवर आदर्श राजकीय व्यवस्था म्हणून रामराज्याचे उदाहरण दिले जाते, ज्यामध्ये मनुष्यासह समस्त प्राणीमात्राच्या कल्याणाचा आणि उध्दाराचा प्राधान्याने विचार केला जातो. द्वापारयुगात जगद्गुरू भगवान श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनाखाली युधिष्ठिरांनी स्थापन केलेले 'धर्मराज्य' हे हिंदू राष्ट्रच होते. पाच पातशाह्यांना चारी मुंड्या चित करून छत्रपती शिवाजी महाराजांनी उभे केलेले हिंदवी स्वराज्य हे हिंदू राष्ट्रच होते, ज्यामध्ये सर्व पंथांचे लोक गुण्यागोविंदाने नांदत होते.

आजमितीला हिंदू राष्ट्राची चर्चा केवळ भारतातच नव्हे, तर जागतिक पातळीवर प्रारंभ झाली आहे. भारत हिंदू राष्ट्राच्या दिशेने अग्रेसर होत आहे, असे जागतिक अभ्यासकांचे मत आहे. त्यामुळे हिंदू राष्ट्राच्या मागणीला भारतातच नव्हे, तर जागतिक पातळीवर समर्थन मिळत आहे. सर्वोच्च न्यायालयात 'केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य' या गाजलेल्या खटल्यात वर्ष १९७३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या १३ न्यायाधिशांच्या खंडपिठाने कोणत्याही शासनाला संविधानात सुधारणा करण्याचा अधिकार असला, तरी ते शासन संविधानाच्या मूलभूत आराखड्याला किंवा चौकटीला धक्का पोहोचेल, असे पालट करू शकत नाही, असा आदेश दिला होता. हा आदेश दिल्यानंतर ३ वर्षांतच, म्हणजे वर्ष १९७६ मध्ये तत्कालीन सरकारने संविधानाच्या प्रस्तावनेत पालट करून त्यात 'सेक्युलर' आणि 'सोशलिस्ट' हे शब्द घातले. यामुळे हे पालट म्हणजे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या विरोधातील कृत्य आहे. आज या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका चालू आहे आणि लवकरच संविधानातील सेक्युलर शब्दाचा त्यातून निकाल लागेल. कायदेतज्ञांच्या मते ज्याप्रमाणे ४२ वी घटनादुरुस्ती करून पंथनिरपेक्ष' आणि समाजवाद' हे शब्द राज्यघटनेत घुसडले, ते शब्द हटवून त्या जागी 'हिंदू राष्ट्र आणि आध्यात्मिक' हे शब्द राज्यघटनेत घातले जाऊ शकतात. संविधानाच्या चौकटीत राहून समाज आणि राष्ट्र यांच्या हिताची संकल्पना मांडणे, हे पूर्णतः संविधानिक आहे! आणि भारताला संविधानिक पद्धतीने हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करता येऊ शकते !

मागील ११ वर्षांपासून दरवर्षी गोव्यात साजरे होणारे अखिल भारतीय हिंदू राष्ट्र अधिवेशन म्हणजे हिंदू धर्माच्या अभ्यासकांसाठी, हिंदुत्वनिष्ठांसाठी एक अनमोल पर्वणी असून यंदाही द्वादश अधिवेशनाच्या निमित्ताने हिंदुत्वासाठी वर्षभर तन, मन आणि धनाने कार्य करणाऱ्या देश विदेशातील मान्यवरांच्या मार्गदर्शनाची आणि त्यांचे अनुभव ऐकण्याची संधी श्रोत्यांना मिळणार आहे.

- जगन घाणेकर, मुंबई.

टुडेज् ब्लॉग

बोलण्याला काही अर्थ असला पाहिजे...

आजकाल लोक गरजेपेक्षा जास्त प्रमाणात बोलत आहेत. सभोवार नजर टाकली की लोक नुसते बोलताना दिसतात. कोणी नुसती बडबड करत राहते, कोणी बोलण्यातून फुशारक्या मारते, काही लोक मोजकेच कामापुरते बोलतात आणि फार कमी लोक असे काही प्रभावी बोलतात आणि ऐकणाऱ्यांना मंत्रमुग्ध करतात. अति बोलणे म्हणजे जीवंत असण्याचे लक्षण होऊन बसले आहे. खरेतर विनाकारण बोलणे आणि बोलून शांतता भंग करण्याचा कोणालाही अधिकार नाही पण बोलणाऱ्यांना आपण गप्प करू शकत नाही. याउलट ज्यांचे बोलणे हृदयाचा ठाव घेते, त्या व्यक्तींने बोलत राहावे आणि आपण फक्त ऐकत राहावे असे वाटते. बोलणे ही एक कला आहे परंतु बोलण्याला काही अर्थ असला पाहिजे हेही तितकेच खरे आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी 'ग्रामगिता' मध्ये बोलावे कसे, किती बोलावे हे स्पष्टपणे सांगताना खालील ओव्यांचा संदर्भ दिला आहे -

आपुल्या बोलण्याने उबगतील जन
ऐसे कधी न करावे भाषण
कोणाचेही पूर्ण ऐकल्याविण, न द्यावे मधून उत्तर

या ओव्या आपणास बोलण्याची महती सांगताना व्यक्तीने बोलताना कोणती काळजी घ्यावी हे विषद करून सांगतात. आपण आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवलेच पाहिजे. आपले भाषण ऐकून श्रोत्यांना उबग येईल असे कुचकामी भाषण अजिबात करू नये. पुढील व्यक्तींचे बोलणे पूर्ण ऐकावे मगच आपण बोलावे नाहीतर पुढचा व्यक्ती भरमसाठ बोलतोय म्हणून आपण मध्ये-मध्ये बोलावे असे होता कामा नये.

मी पुण्याला शिकायला होतो तेव्हा बालगंधर्व नाट्यगृहात प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे व्याख्यान ऐकण्याचा योग आला होता. प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे व्याख्यान ऐकून मी भारावून गेलो होतो. त्यांचे व्याख्यान म्हणजे ज्ञानाचा खळखळता झराच. त्यांची ती ओघवती भाषा, बोलण्याची लकब आणि शब्दफेक सारं अगदी अफलातून होतं. लातूरात विलासराव देशमुख साहेबांचे भाषण ऐकणे म्हणजे एक सुवर्ण योगच जणू.त्यांचे ओघवते भाषण मी अनेक वेळा ऐकले आहे. आमच्या शाळेतील विज्ञानाचे शिक्षक गणेशराव गुळवे गुरुजी यांचे भाषण आम्हा विद्यार्थ्यांसाठी एक अमूल्य ठेवा होता. शालेय उपक्रमात त्यांचे विविध विषयांवरील भाषणे ऐकून आमच्या ज्ञानात भर पडायची हे सांगणे नको. अहमदपूर शहरातील जिजाऊ-सावित्री व्याख्यानमालेत अनेक सुप्रसिध्द वक्त्यांचे व्याख्यान ऐकायला मिळते हे मी माझे भाग्य समजतो.

घरात, समाजात व आपल्या कार्यक्षेत्रातील लोकांसोबत आपण खूप बोलतो, बोलतच राहतो. ज्या कुटुंबातील सासू-सुना बोलण्यात तरबेज असतात, त्या घराला शांतता कधीही लाभत नाही. एसटीत प्रवास करताना मोबाईलवर बोलणारे खूप वेळ आणि मोठ्या आवाजात बोलतात. बाकीच्या प्रवाशांना त्रास होतोय याचे भान त्यांना नसते. बोलघेवडे लोक सतत बोलत राहतात. काही महाशय गरजेपेक्षा जास्त बोलून स्वतःचा मोठेपणा व नसलेलं स्वकर्तृत्व मीठ मिरची लावून सांगतात. 'अति तिथे माती'या म्हणीप्रमाणे जास्त प्रमाणात बोलणाऱ्या लोकांना ठार वेडे समजले जाते. त्यामुळे गरजेपेक्षा जास्त कोणी बोलू नये. एकसारखी बडबड करू नये. लोकांशी संवाद साधताना बोलले तर पाहिजे परंतु आपल्या बोलण्याला काही अर्थ असलाच पाहिजे. बोलताना नेमके कसे आणि किती बोलावे हे कळाले पाहिजे. आपण बोलतोय आणि कोणी ऐकून घेत नसेल तर आपण न बोललेच बरे. बोलण्यात ढोंगीपणा नसावा, बोलून कोणाची टिंगल टवाळी करायची नसते आणि बोलण्यातून कोणाची निंदा होणार नाही हे पण लक्षात घ्यावे. आपल्या बोलण्याला अर्थ प्राप्त व्हावा असे कोणाला वाटत असेल तर त्याने ऐकावे जास्त आणि बोलावे मोजके, तेही तोलून आणि मापून.विनाकारण बडबड करण्याची सवय अगोदर बंद करायला हवी.

बोलणे काहींचे, नुसती वटवट
बोलघेवड्या लोकांची, रिकामी बडबड
बोलतात काही लोक, अगदीच मोजके
विद्वान बोलतात, प्रभावी थोडके

- बबन गुळवे, जि. लातूर.

जन्म हा अखेरचा

स्वीकृतप्रसादीस्थल



तेथे स्वाद घेण्यात मनुष्य तल्लीन होतो. परमात्म्याची प्राप्ती होईपर्यंत वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, व्यंग्यार्थ इत्यादींचा विचार मनुष्य करीत असतो. परंतु एकदा परमात्मप्राप्ती झाली की मग कुठल्याही अर्थाचा विचार शिल्लक राहत नाही. शिल्लक राहतो फक्त परमात्म्याशी एकरूपतेचा अनुभव. मग त्याठिकाणी कोणतेही व्यवधान राहत नाही. तो आनंदरूप होऊन आनंदाचा आस्वाद घेत असतो. तो शिवोऽहम् भावनेने ऐक्याचा आनंद घेत असतो त्यालाच विशेष प्रकारचा 'प्रसाद' म्हटले जाते. भोजन हा एक प्रसाद आहे तसा मी शिवस्वरूप आहे या अनुभवाचा आस्वाद घेणे हा देखील एक प्रसादच आहे. त्याला ज्ञानप्रसाद म्हणतात.

शिवयोगी शिवजीवैक्याच्या ज्ञानरूपी प्रसादाचा अखंड स्वीकार करीत असल्यामुळे त्याला 'स्वीकृतप्रसादी' असे म्हणतात. हाच विषय पुढे अधिक स्पष्ट केला आहे. तेथे व्यवधान कसे नसते? **मातृमेयप्रमाणादिव्यवहारे विहारिणीम्। संवित्साक्षात्कृतिं लब्ध्वा योगी स्वात्मनि तिष्ठति।।२०.७।।** जोपर्यंत ज्ञान होत नाही तोपर्यंत प्रमेय, प्रमाता आणि प्रमाण या त्रिपुटीचा विचार चाललेला असतो. प्रमेय म्हणजे शिव, प्रमाता म्हणजे जीवात्मा आणि प्रमाण म्हणजे शब्दादी प्रमाणे, ज्ञानोत्तर अवस्थेत प्रमेय, प्रमाता आणि प्रमाण एकरूप होऊन जातात. त्यांच्यामध्ये भेद उरत नाही. प्रमेय, प्रमाता आणि प्रमाण परमात्मरूपच होऊन जातात. त्यामुळे त्यांचा विचार अंतिम अवस्थेत होत नाही. शिवयोगी आत्मरूपात स्थिर झाल्यामुळे वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, व्यंग्यार्थ इत्यादी कोणताही विचार त्याच्या मनाला स्पर्श करीत नाही. त्यांच्या पलीकडे तो स्वात्मानुभवात तल्लीन झालेला असतो.

(क्रमशः) – काशी जगद्गुरु
डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.

जनमानस

सण-उत्सवांवर विनोद करू नका !

नुकताच वटपौर्णिमेचा सण पार पाडला. वटपौर्णिमा खरे तर एक व्रत असून या व्रतामागे ऐतिहासिक आणि शास्त्रीय कारण आहे. पातिव्रत्याचे महत्व अधोरेखित करणारे हे व्रत हिंदू धर्माचे आणि भारतीय संस्कृतीचे आगळे महत्वही विशद करते.

हल्लीच्या पिढीवर असलेला पाश्चिमात्य विकृतीचा प्रभाव आणि हिंदू धर्माविषयी असलेले घोर अज्ञान यामुळे सोशल मीडियावर या दिवशी व्रताचे महत्व सांगणाऱ्या पोस्टहून अधिक या व्रताची टिंगल टवाळी करणाऱ्या पोस्ट आणि मिम्स पाहायला मिळाल्या.

दुर्दैव म्हणजे या पोस्ट आणि मिम्स तयार आणि ते चवीने फॉरवर्ड करणारे, त्यावर तितक्याच विनोदी प्रतिक्रिया देणारे हिंदूच होते. अन्य पंथीयांच्या बाबतीत असा भाग कधीच पाहायला मिळत नाही.

अन्य पंथीयांच्या श्रद्धास्थानांची कोणी निंदा मस्करी करण्याचा प्रयत्न केला तर त्याचे पडसाद जगभर उमटतात. हिंदू धर्मातील सण उत्सवांची टिंगल टवाळी करण्यात मात्र हिंदूच अग्रेसर असतात.

मनोरंजन वाहिन्यांवरील विनोदी कार्यक्रमांतून, सिनेमा-नाटकांतून सण-उत्सवांवर विनोद केले जातात किंवा त्यांविषयी गैरसमज निर्माण होतील असे संवाद त्यांतील पात्रांच्या तोंडी दिले जातात.

वटपौर्णिमेपासून एकेक सण-उत्सवाला सुरुवात होते. तसे हे टुकार विनोद आणि मिम्स तयार करणारेही तितकेच कार्यरत होऊ लागतात.

आज प्रत्येकाच्या हाती स्मार्टफोन आल्याने सोशल मीडियाचा प्रभाव जसा वाढत गेला तशी यांचीही संख्या कमालीची वाढली आहे. बहुसंख्य हिंदू समाज हा सश्रद्ध आहे.

व्रत वैकल्ये करणारा आणि भगवंतावर विश्वास ठेवणारा आहे. मात्र, आपल्याच धर्माविषयी पुरेसे ज्ञान नसल्याने त्याविषयीचा अभिमानही निर्माण झालेला नाही. सण-उत्सवांच्या निमित्ताने सोशल मीडियावर फिरणारे विडंबनात्मक संदेश आणि मिम्स फॉरवर्ड करून आपणच आपल्या संस्कृतीचा, ऋषीमुनींचा पर्यायाने आपल्या धर्माचा अवमान करत असून हे पातक स्वत:हून ओढवून घेऊ नका! असे कोणी करत असेल त्याची कानउघाडणी करा!

- मोक्षदा घाणेकर, मुंबई.

नवसंजीवनी मिळवून देतील?

काँग्रेसच्या गेल्या ७५ वर्षांचा इतिहास पाहिला तर नेहरू आणि गांधी घराण्याचेच पक्षावर कायम वर्चस्व राहिलेले आहे. या घराण्याला अनेकांनी अडवण्याचा प्रयत्न केला, त्यासाठी पक्षही सोडला, वेगळे पक्ष स्थापन केले, सत्ताही मिळवली पण काँग्रेसच्या डीएनएमध्ये असलेला गांधी कुटुंबांचा वरचष्मा हे नेते कमी करु शकले नाहीत. अर्थात गांधी घराण्याची चाकरी न करण्याची इच्छा असलेले असे नेते फार कमी प्रमाणात आहेत. काँग्रेसमध्ये सगळ्यात जास्त नेते अंगात कर्तृत्व आणि धमक असतानाही गांधी कुटुंबांच्या चरणी आपली निष्ठा ठेवून आहेत. अर्थात यातही ते स्वतःचा फायदाच बघतात.

यश मिळाले की ते त्याचा फायदा उचलायला तयार असतात आणि अपयश आले की गांधी कुटुंबावर टाकून मोकळे होतात आणि याच गोष्टीमुळे पक्षाची धुरा गांधी कुटुंबाकडेच असावी असे त्यांना वाटत असते. म्हणूनच सोनिया आणि राहुल यांच्यानंतर प्रियांका गांधी निवडणुकींच्या मैदानात उतरणार म्हटल्यानंतर अशा नेत्यांना खूपच आनंद झाला आहे. जोमात आलेल्या काँग्रेस पक्षाला प्रियांका गांधी संजीवनीची आणखी एक बूस्टर डोस प्रदान करून २०१९ मध्ये सत्तेवर आणतील असा विश्वास आता काँग्रेस नेत्यांना वाटू लागला आहे.

राजकारणात नेत्यांच्या वक्तव्यांना कधीही गंभीरतेने घेण्याची गरज नसते. आज ते एक बोलतात आणि काही दिवसांनी त्या वक्तव्यापासून फारकत घेत अगदी तसेच केल्याचे आपण अनेक वेळा पाहिले आहे. **सोनिया गांधी यांनी आपली मुले रस्त्यावर भीक मागतील पण, कधीही राजकारणात येणार नाहीत असे म्हटले होते.** प्रख्यात लेखिका तवलीन सिंह यांच्या 'दरबार' पुस्तकात ही माहिती दिलेली आहे. पण काही काळानंतर सोनिया गांधी स्वतः तर राजकारणात आल्याच राहुल आणि प्रियांका यांनाही घेऊन आल्या. राहुल गांधींना तर काँग्रेस पक्षाचे अध्यक्षही बनवले.

लोकसभा निवडणुकींपूर्वी प्रियांका गांधी रायबरेलीतून निवडणूक लढवणार असे म्हटले जात होते तेव्हा आपण निवडणूक लढवणारच नाही असे प्रियांका गांधींनी स्पष्ट केले होते. प्रियांकाचे पति रॉबर्ट वाड्रा निवडणूक लढवणार असेही म्हटले जात होते. पण रॉबर्ट वाड्रांना तिकीट दिले तर जनता काँग्रेसवर आणखी नाराज होईल असा अहवाल आल्यानंतर रॉबर्ट वाड्रांचेही नाव मागे करण्यात आले. राहुल गांधींनी वायनाड आणि रायबरेलीची जागा जिंकली. त्यानंतर आता रायबरेलीची जागा कायम ठेवत त्यांनी वायनाडमधून राजीनामा दिला.

आता वायनाडमधून प्रियांका गांधी पोटनिवडणूक लढवणार असल्याचे सांगितले जात आहे. २०१९ पासून राजकारणात सक्रिय असलेल्या प्रियांका गांधी या काँग्रेस पक्षाच्या महासचिव आहेत. निवडणुकींच्या मैदानात उतरणाऱ्या प्रियांका या गांधी कुटुंबातील दहाव्या सदस्य आहेत. पंडित जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, फिरोज गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी, राहुल गांधी, संजय गांधी, मनेका गांधी आणि वरुण गांधी यांनी यापूर्वी निवडणुका लढवलेल्या आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकींत पक्षाचा जोरदार प्रचार केला होता. भाजप आणि मोदींना सडेतोड उत्तर प्रियांका देत होत्या.

खरे पाहिले तर राहुल गांधींनी वायनाडची जागा स्वतःकडे ठेवून रायबरेलीची जागा प्रियांकांसाठी सोडायला पाहिजे होती. वायनाडमुळेच राहुल गांधी २०१९ मध्ये संसदेत पोहोचले होते आणि यावेळीही वायनाडने त्यांना साथ दिली, मात्र असे असताना त्यांनी वायनाडच्या मतदारांचा अपेक्षाभंग केला आहे.

गेल्या दहा वर्षांपासून पाहिले तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दक्षिण भारतावर जास्त लक्ष केंद्रित केले आहे. प्रियांका गांधींनी उत्तर प्रदेशमध्ये ज्याप्रकारे मोदींना मात दिली त्याच पद्धतीने दक्षिण भारतातही त्या मोदींवर मात करतील असा विश्वास काँग्रेस नेत्यांना वाटू लागला आहे. प्रियांका वायनाडमधून जिंकल्या तर केरळमध्ये काँग्रेसला नवसंजीवनी मिळेल आणि सत्ताही मिळेल असे वाटते आहे.

खरे तर प्रियांकांना दक्षिण भारतातील राजकारणाचा तसा काही अनुभव नाही. उत्तर प्रदेशचे राजकारण आणि दक्षिण भारतातील राजकारण वेगळे आहे. तेथील परिस्थिती वेगळी आहे. गांधी कुटुंब वायनाडला फक्त गरजेपुरते वापरून घेते असाही एक मेसेज सध्या वायनाडमध्ये मोठ्या प्रमाणावर फिरवला जाऊ लागला आहे. त्यातच भारतीय कम्युनिस्ट पार्टीने पोटनिवडणुकीत उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे. राहुल गांधींना वायनाडची जागा सोडायचीच होती तर त्यांनी येथून निवडणुकींच्या मैदानात उतरायचेच नव्हते. असेही भाकपाचे म्हणणे आहे. याशिवाय भाजपकडून परिवारवादाचा आरोप मोठ्या प्रमाणावर केला जाण्याची शक्यता असून त्यालाही त्यांना तोंड द्यावे लागणार आहे. स्वतः प्रियांका गांधींना याची जाणीव झाली असेलच, तरीही त्या निवडणुकींच्या मैदानात उतरत असतील तर त्यामागे नक्कीच मोठे काही तरी कारण असावे असे वाटते. वायनाडमधून प्रियांका जिंकून येतील आणि संसदेत सोनिया, राहुल, प्रियांकांचे त्रिकुट मोदी सरकारवर तुटून पडेल आणि काँग्रेस २०२९ मध्ये मोठ्या प्रमाणावर यश मिळवेल अशी आशा काँग्रेसजनांना वाटू लागली आहे. ती कितपत खरी ठरते हे काळच ठरवेल.

- चंद्रकांत शिंदे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाच वेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR/२००२/९७०७. Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

संक्षिप्त वृत्त

प्रा. आनंदराव काशिद यांना पी.एचडी पदवी प्रदान

सोलापूर : येथील नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयातील मेकॅनिकल विभागातील सहयोगी प्राध्यापक श्री. आनंदराव शिवाजीराव काशिद यांना संजय घोडावत विद्यापीठाकडून डॉक्टरेट प्रदान करण्यात आली. डेव्हलपमेंट ऑफ हायब्रीड मॅन्युफॅक्चरिंग प्रोसेस फॉर ऍल्युमिनियम फोम अँड ऑप्टिमायझेशन ऑफ इट्स प्रोसेस पॅरामीटर्स या विषयावर त्यांनी केलेल्या संशोधनाबद्दल त्यांना हि डॉक्टरेट प्रदान करण्यात आली आहे. डॉ. अभिजित पाटील यांनी त्यांचे पी.एचडी गाईड म्हणून काम पहिले आहे. प्रा. आनंदराव काशीद हे सोलापुरातील अभियांत्रिकी शिक्षण क्षेत्रात एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक पदवी आणि पदव्युत्तर प्रकल्पाना प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्षरीत्या मार्गदर्शन केले आहे. तसेच त्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय जरनलमध्ये त्यांचे संशोधन प्रकाशित केले असून त्यांना भारत सरकारच्या पेटंट ऑफिसकडून 'क्लॉथ डस्टर' या उपकरणाचे पेटंट देखील मिळाले आहे. ते सध्या नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयात डीन डमिनिस्ट्रेशन म्हणून कार्यरत आहेत. या यशाबद्दल विद्यार्थी, सहकारी, प्राचार्य आणि संस्थेच्या विश्वस्तांकडून त्यांचे अभिनंदन केले.

अक्कलकोट : न्यासाकडून सालाबादप्रमाणे यंदाही ३७ वा वर्धापनदिन आणि श्री गुरुपौर्णिमा उत्सव साजरा

स्वामी समर्थ मंदिरात ३७ वा वर्धापनदिन उत्साहात

अक्कलकोट : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून सालाबादप्रमाणे यंदाही ३७ वा वर्धापनदिन आणि श्री गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे, या उत्सवाच्या सस्नेह निमंत्रण पत्रिका पूजन गुरुवारचे औचित्य साधून करण्यात आले. धर्मसंकिर्तन व संस्कृतीक कार्यक्रम २०२४ यंदाचे २५वे रौप्य महोत्सव वर्ष आहे. दरम्यान पत्रिकेचे विधिवत पूजन अमोलराजे भोसले यांच्या हस्ते व उद्योगपती दत्ताआण्णा सुरवसे, न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, संतोष भोसले, मनोज निकम, अरविंद शिंदे,वास्तूविशारद योगेश अहंकारी, अभियंता किरण पाटील, अमित थोरात यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, सौरभ मोरे, सिद्धाराम कल्याणी, शहाजीबापू यादव, निखील पाटील, पिंटू दोडमनी, प्रवीण घाडगे, गोटू माने, दत्ता माने, बलभीम पवार, बाळासाहेब पोळ, बाळासाहेब घाटगे, सतीश महिंद्रकर, शरद भोसले, प्रसाद हुल्ले, रमेश हेगडे, महांतेश स्वामी, शिव स्वामी, एस.के. स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, तानाजी पाटील, अनिल बिराजदार, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, विठ्ठल रेड्डी, विश्वनाथ कलशेट्टी, सुमित कल्याणी, खंडेराय होटकर, यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

पिलीवमध्ये बकरी ईद साजरी

पिलीव : सर्व समाजातील सामाजिक ऐक्य, बंधुभाव, सुसंवादाची भावना वृद्धिंगत करणाऱ्या तसेच बलिदान व त्यागाचे प्रतीक असणारा बकरी ईदचा सण अत्यंत उत्साही वातावरणात व पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी पिलीव येथील ईदगाह मैदानावर सामूहिक नमाज अदा करून एकमेकांना आलिंगन देऊन ईद निमित्त शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी मौलाना हाफीज नवील अख्तर यांनी नमाज पठण केले व यावेळी बकरी ईदच्या दिवसांचे महत्व कथन केले. तसेच नमाजीनंतर हिंदू व ईतर समाजबांधवांनी सर्व मुस्लिम बांधवांना हातात घेऊन व आलिंगन देऊन बकरी ईदच्या शुभेच्छा दिल्या जात होत्या तर मुस्लिम समाज बांधवांनी आपल्या वाढवडीलांच्या स्मरणार्थ बकऱ्याची कुर्बानी देऊन पारंपारिक पद्धतीने ठरल्याप्रमाणे त्याचे सर्व नातेवाईक आप्तेष्ट यांच्यात वाटप केले जाते तसेच शीरखुर्मा गुलगुले याचाही एकमेकांना घरी बोलवून प्रसाद म्हणून खाऊ घातले जाते बकरी ईदचा हा पवित्र दिन आपल्या सर्वांच्या आयुष्यात शांतता आणि समृद्धी घेवून येवो अशी सदिच्छापर मजकूर भागातील सामाजिक कार्यकर्ते नेते मंडळींनी प्रत्यक्ष भेटून व समाज माध्यमातून ही शूभेच्छा देण्यात येत होत्या. यावेळी जामा मशिद ट्रस्टच्या वतीने ईदगाह मैदानावर सामूहिक सामाजीचे नियोजन करण्यात आले होते या नमाजी मध्ये गावातील मदरसा मशिद व मदिना मशिदीच्या कार्यक्षेत्रातील सर्व मुस्लिम बांधव सहभागी झाले होते यावेळी जामा मशिदीचे अध्यक्ष महिबूब मुलांणी सचिव नजीर मुलाणी , मौलाना मुजमिल तांबोळी आरिफखान पठाण अमीनखान पठाण सर्व संचालक तसेच मदरसा मशिदीचे सलीम मुलाणीअमीर मुलांणी व सर्व मुस्लिम समाजातील तरुणांनी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

परिवहन मंडळाचे कर्मचारी पास घेवून येणार शाळेत

पाससाठी एसटी आगारातून होणारे विद्यार्थ्यांचे हेलपाटे थांबणार

सोलापूर/प्रतिनिधी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण यशामध्ये शाळा, महाविद्यालय, शिक्षकवृंद यांच्यासोबतच राज्य परिवहन महामंडळाचाही मोलाचा वाटा आहे. अत्यल्प दरात विद्यार्थ्यांना, तर मुलींच्या शिक्षणासाठी मोफत प्रवास सुविधा उपलब्ध करून एसटीने सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. त्यातच यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना एसटीचे पास थेट शाळा-महाविद्यालयांत उपलब्ध करून देण्याचा निर्णय परिवहन महामंडळाने घेतल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

विदर्भ वगळता राज्यात १५ जूनपासून नवीन शैक्षणिक पर्वाचा शुभारंभ झाला आहे. तर विदर्भात १ जुलैपासून शाळा सुरू होणार आहे. यरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६ टक्के इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना एसटीमधून शालेय प्रवासासाठी मासिक पास काढता येतो. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण येणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते.

एसटीमध्ये दररोज सुमारे ६५ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे एसटीला महाराष्ट्रातील सार्वजनिक प्रवासी वाहतुकीचे प्रमुख साधन मानले जाते. विद्यार्थी-विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनाकडून पास घेतले जात असत. परंतु यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून विद्यार्थ्यांना पाससाठी आता रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा व महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून संबंधित विद्यार्थी आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. जेणेकरून त्यांचा वेळ वाया जाणार नाही.

विद्यार्थ्यांची यादी तयार

राज्यातील सर्व शाळा-महाविद्यालयांच्या मुख्याध्यापक व प्राचार्य यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे. या अभिनव योजनेचा लाभ जिल्ह्यात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना होणार आहे.पण या वर्षापासून विद्यार्थ्यांना पास साठी आता रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा -महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. यामुळे त्यांचा वेळ वाया जाणार नाही. या संदर्भात १८ जुन पासुन एसटी प्रशासनातर्फे 'एसटी पास थेट तुमच्या शाळेत' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्या आधी सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक आणि प्राचार्यांनी एसटीच्या आगार व्यवस्थापकांना पत्र द्याचं आहे. त्यात आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी द्याची आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना होणार आहे.

एसटीत १६१९ हजार चालक

एसटीमध्ये कर्मचाऱ्यांना नियमित प्रशिक्षण, आरोग्य तपासणी, वाहन परवाना तपासणी, गाड्यांची तांत्रिक तंदुरुस्ती अशा अनेक बाबींवर भर दिला जातो. सध्या महाराष्ट्रात एसटीमध्ये १६१९ चालक कार्यरत आहेत. अपघाताची विविध कारणे शोधून त्यावर उपाययोजना करण्याच्या दृष्टीने एसटीने चालकांसाठी वेळोवेळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले आहे

येत्या १८ जूनपासून राज्यात एसटी प्रशासनातर्फे एसटी पास थेट तुमच्या शाळेत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी-विद्यार्थिनींना आता एसटीचे मासिक पास थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार असल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

– व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर, एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष,

बार्शी, पंढरपूर, मंगळवेढा, मंद्रूप रोडवरील कॉलेजमधील विद्यार्थ्यांना याचा फायदा निश्चित होणार आहे. विद्यार्थ्यांनी बस स्थानकावर येण्याची काही गरज नाही. आमचेच एसटी कर्मचारी शाळेमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना पास देणार. याचा लाभ ग्रामीण. विद्यार्थ्यांना मिळणार.

–उत्तम जुंधळे, आगार व्यवस्थापक,सोलापूर

अर्थकारणाच्या माध्यमातून महिलांची प्रगती व्हावी

पंढरपूर अर्बन बँकेमार्फत आई योजनेचा उपक्रम

पंढरपूर/प्रतिनिधी

दि.पंढरपूर अर्बन को-ऑप बँक लि.पंढरपूर नवीपेठ, खवा बाजार येथील कर्मयोगी सभागृह येथे महाराष्ट्र शासनाचा उपक्रम आई महिला केंद्रीत पर्यटन धोरणा अंतर्गत व्याज परतावा कर्ज योजना उद्घाटन मेळावा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरूवात बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलनाद्वारे करण्यात आली.

कार्यक्रमाचे सुरवातीस आई महिला केंद्रीत पर्यटन धोरणा अंतर्गत व्याज परतावा कर्ज योजनेची माहिती डॉ.संगिता पाटील यांनी दिली. या कार्यक्रमास पंढरपूरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पर्यटन क्षेत्रातील महिला उद्योजीकांचे सक्षमीकरण करण्यासाठी आई महिला केंद्रीत पर्यटन धोरणा अंतर्गत व्याज परतावा कर्ज योजना (फक्त महिलांसाठी) राबविण्यात येत आहे. या योजनेतून कृषी पर्यटन केंद्र, हॉटेल व्यवसाय, रेस्टॉरंट, कॅफे, उपहार गृह, फास्ट फूड, ट्रॅव्हल एजंट, टूर ऑपरेटर, टूर ट्रॅव्हल्स एजन्सी, हाऊस बोट, टेंट हाऊस, पर्यटन व्हिला, साहसी पर्यटन केंद्र, होम स्टे, रिसॉर्ट, ट्री हाऊस, आदिवासी,निसर्ग पर्यटनाशी संबंधित प्रकल्प, मेडीकल पर्यटन, वेलनेस सेंटर, योगा केंद्र असे पर्यटन क्षेत्राशी संबंधित व्यवसायासाठी कर्जपुरवठा केला जातो.

आई महिला केंद्रीत पर्यटन धोरणा अंतर्गत व्याज परतावा कर्ज योजनेअंतर्गत १५ लाख पर्यंतच्या कर्ज रकमेवर पर्यटन विभागाच्या वतीने रू. ४.५० लाख पर्यंत (१२ टक्केच्या मर्यादेत) व्याजाचा परतावा हा लाभार्थ्याला त्यांच्या खात्यावर दिला जाणार आहे. या योजनेअंतर्गत आधारकार्ड, पॅन कार्ड, शॉप क्ट, उद्योग आधार, प्रकल्प अहवाल, एल ओ आय पात्रता प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे आवश्यक असणार आहेत.

,बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमेश विरधे,आनंदा नाईकनवरे कर सल्लागार व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



पंढरपूर: आई महिला केंद्रीत पर्यटन धोरणा अंतर्गत व्याज परतावा कर्ज योजना उद्घाटन मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाची सुरूवात बँकेचे चेअरमन सतीश मुळे यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन.

सांगोला: ओबीसी समाजाच्या वतीने तालुका हाक ची निवेदन तहसिलदार यांना देताना.

ओबीसी समाजाच्या वतीने सांगोला बंदची हाक

सांगोला/प्रतिनिधी

ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे,या मागणीसाठी तसेच ओबीसी समाजाच्या आरक्षण बचावासाठी ओबीसी समाजाच्या वतीने शुक्रवारी २१ जून रोजी सांगोला तालुका बंदची हाक देण्यात आली असून बंदबाबतचे निवेदन सांगोल्याचे तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आले आहे.

सांगोला तालुक्यातील सर्व ओबीसी प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत काल गुरुवारी सांगोला येथे बैठक पार पडली व त्या बैठकीत ओबीसी समाजाच्या आरक्षण बचावासाठी सांगोला तालुका बंद ठेवण्याचे तसेच नाझरा टोळ नाका येथे सकाळी ११ वाजता रास्ता रोको करण्याचे नियोजन करण्यात आले. त्यानंतर तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना सांगोला बंदचे निवेदन देण्यात आले. यावेळी,सर्व छोटे-मोठे उद्योग व व्यवसाय बंद ठेवून व्यापारी वर्गही सहकार्य करतील,असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

ओबीसी आरक्षण बचावासाठी राज्य मागासवर्गीय आयोगाचे माजी सदस्य प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे हे वडीगोद्री,अंबड येथे तसेच पुणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मंगेश ससाणे, मृणाल ढोले व पाटील यांनी आमरण उपोषण सुरु केले आहे.मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत आमचा विरोध नाही.परंतु ओबीसी समाजावर अन्याय करुन आमच्या आरक्षणाला धक्का लावू नये. आमच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे,अशी ओबीसी समाजाची मागणी आहे.

बंदबाबतचे निवेदन देतेसमयी,शेकापचे युवानेते डॉ.बाबासाहेब देशमुख,माजी नगराध्यक्ष मारुतीआबा बनकर,सांगोला सूतगिरणीचे चेअरमन डॉ.प्रभाकर माळी, उद्योगपती बाळासाहेब एरंडे, माजी शिवसेना नेते समाधान कोळेकर यांचेसह अनेक समाजबांधव उपस्थित होते.

ओंकार परिवाराचा दहा हजार वृक्षलागवडीचा संकल्प – चेअरमन

पिलीव/प्रतिनिधी

माळशिरस तालुक्यातील चांदापुरी साखर कारखान्याच्यावतीने पर्यावरण दिनानिमित्त चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ व निसर्ग प्रेमी विरबहादुरसिंह मगर यांच्या हस्ते कारखाना परिसरात वृक्षारोपण करणयात आले.

गतवर्षी ओंकार साखर कारखाना परिवाराने पाच हजार वृक्षांची लागवड करुन जतन करण्याची जबाबदारी येतली होती.तर यंदा पर्यावरण दिनानिमित्त कारखान्याने दहा हजार वृक्ष लागवड करुन जतन करण्याचा संकल्प केला आहे. यामुळे कारखाना परिसर निसर्ग रम्य तसेच याचा उपयोग पर्यावरणाचा समतोल व प्रदुषण मुक्ती साठी उपयोग याचा उपयोग होणार असल्याचे कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांनी सांगितले.

यावेळी जनरल मॅनेजर भिमराव वाघमोडे, केन मॅनेजर शरद देवकर, मुख्य सुरक्षा अधिकारी मोहन घोडके,चिफ इंजिनिअर तानाजी देवकते, पि डी पाटील, धनाजी पवार, धन्यकुमार जमदाडे, रमेश आवताडे, गणेश धायगुडे, गणेश शितोळे, यासह सर्व अधिकारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुनिलनगर येथे खून; आरोपीचा जामीन मंजूर

सोलापूर/प्रतिनिधी

राम उर्फ पापा निंबाळकर (रा. न्यु सुनिल नगर) याचा खून केल्याच्या आरोपात अटकेत असलेल्या लक्ष्मण उर्फ अप्पी अशोक जाधव (रा सुनिल नगर, सोलापूर) याला जिल्हा व सत्र न्यायाधिश पी.एस. खुने यांनी १५ हजाराच्या जामीनावर मुक्त करण्याचा आदेश नुकताच दिला आहे.

सदर गुन्हयाची हकीकत अशी , २२ फेबुवारी २०२४ रोजी दुपारच्या सुमारास यातील फिर्यादी गणेश राजू निंबाळकर (रा. कामाक्षी नगर, बोळकोटे) नगरच्या आतील बाजूस हा त्याच्या घरी असताना, त्याचा मित्र महेश गर्जे याने फोन करून सांगितले की, तुझा भाऊ पापा हा सुनिल नगर गुंटूंक कारखान्याच्या पाठीमागे मोकळया जागेत बेशुध्द अवस्थेमध्ये पडला असून तु लवकर ये असे सांगितले. त्यामुळे फिर्यादी हा त्याठिकाणी पोहचला तेथे फिर्यादीचा भाऊ राम उर्फ पापा बेशुध्द अवस्थेत पडलेला दिसला. फिर्यादीने त्यास उठविण्याचा प्रयत्न केला, परंतू तो उठला नाही. त्यामुळे फिर्यादी हा त्याच्या भावास बेशुध्द अवस्थेत सिव्हील हॉस्पिटल येथे घेवून गेले. त्यावेळेस डॉक्टर याने मयत झाल्याचे सांगितले.

मयत राम उर्फ पापा याचे सोबत फिरणारा राम भाऊ कोळी याने फिर्यादीस भेटून सांगितेले की वाजण्याच्या सुमारास गुटूंक कारखाना येथील मैदानात तुझा भाऊ राम हा पालथा झोपला, असताना त्याठिकाणी लक्ष्मण उर्फ आप्पी जाधव हा त्याच्या हातामध्ये लोखंडी पाईप येवून आला होता. तु मला शिव्या देतो म्हणून लोखंडी पाईपणे मारहाण केली होती. त्यानुसार फिर्यादी गणेश निंबाळकर याने आरोपी लक्ष्मण अशोक जाधव यांचे विरूध्द खूनाचा गुन्हा दाखल केला होता.

=फिर्यादीत नमूद प्रमाणे मयताचा अंगावर जखमा दिसून येत नाही. त्याप्रमाणे वैद्यकीय पुरावा ही नाही. खटल्याचा तपास संपला असून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असा युक्तीवाद आरोपीचे वकील इस्माईल एन. शेख यांनी केला. सदरचा युक्तीवाद मान्य करून जिल्हा व सत्र न्यायाधिश पी. एस. खुने यांनी आरोपीस जामीनीवर मुक्त करण्याचा आदेश दिले . या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. इस्माईल एन. शेख, ॲड. सिराज रजाक शेख, ॲड. वसीम ला. शेख यांनी काम पाहिले व सरकारतर्फे माधुरी देशपांडे यांनी काम पाहिले.

अकलूज नगरपरिषद अकलूज

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ता.माळशिरस,जि.सोलापूर(महाराष्ट्र)

फोन - (०२१८५) २२२०३५,२२२५९२

email-comcakluj21@gmail.com

स्थापना दिनांक ०३-०८-२०२१.

जा.क्र ३७७/अ.न.प./करवि/SN५२/प्र.क्र.०१/ २०२४ दिनांक- २९/०६ /२०२४

जाहीर सूचना

(वाचा महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती, औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११८, ११९ प्रमाणे)

अकलूज नगरपरिषदेने हद्दीमधील जुन्या मिळकतीस वार्षिक करयोग्य मुल्यांकन करून जुन्या मालमत्तेची यादी तयार केलेली आहे. करयोग्य मुल्यांकनाची यादी नगरपरिषदेने प्राधिकृत मुल्यनिर्धारण अधिकारी, तथा सहाय्यक संचालक, नगररचना, सोलापूर यांचेकडे तपासून घेतली आहे. तपासलेली करयोग्य मुल्यांकनाची यादी नगरपरिषदेने दि.२२/०६/२०२४ पासून प्रसिद्धी केली आहे. ती संबंधित नागरिकांना पाहण्यासाठी नगरपरिषदेच्या कार्यालयात ठेवलेली आहे.

सदरहू यादी नगरपरिषदेच्या कार्यालयात सुट्टीचे दिवस खेरीज इतर दिवशी कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० या वेळेत पहावयास भेटेल. सदरहू यादी पाहून त्याची करयोग्य सुधारित मुल्यांकनाविषयी अगर मजकुराविषयी ज्यांना लेखी तक्रारी व सूचना करावयाच्या असतील त्यांनी त्या या जाहीर सूचनेच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत (दि.२२/०७/२०२४) अखेर मुख्याधिकारी अकलूज नगरपरिषद यांचे नावे करून या कार्यालयात आणून द्याव्यात. तसेच एका मालमत्तेची एकच तक्रार स्विकारण्यात येईल. तक्रारी अर्जासोबत पुरावा असणे बंधनकारक आहे. विना पुरावा तक्रार अर्ज स्वीकारला जाणार नाही. तसेच मुदतीनंतर येणाऱ्या सूचना अगर हरकती यांचा विचार केला जाणार नाही.

शिक्का

सही/-

मुख्याधिकारी

अकलूज नगरपरिषद अकलूज

महाराष्ट्र शासन

जलसंपदा विभाग

मंडळ कार्यालयाचे नांव : लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर

विभागाचे नांव : भीमा विकास विभाग क्र. २, सोलापूर

दुरध्वनी क्रमांक.०२१७/२७४०६६० फॅक्स क्रमांक.०२१७/२६००९१४

Web : http://mahatenders.gov.in Email : eebdd2solapur@gmail.com

ई-निविदा सूचना क्रमांक. १५ सन २०२३-२०२४ दुसरी वेळ (ऑनलाईन)

मा.मुख्य अभियंता (विप्र),जलसंपदा विभाग,पुणे यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, भीमा विकास विभाग क्र. २,सोलापूर (दुरध्वनी क्र. ०२१७-२७४०६६०) महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्राणालीद्वारे (ऑनलाईन) मान्चित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर येथुन डाऊनलोड करण्यात यावी.

कोरी निवीदा या कार्यालयामार्फत विक्री केली जाणार नाही.इच्छुक कंत्राटदारांनी संकेत स्थळावरून निविदा फॉर्म व निविदा संच **दि.२४/०६/२०२४ ते ०५/०७/२०२४** या कालावधीत डाऊनलोड (Download) करून घ्यावयाचे आहेत. निविदा कागदपत्रांची किंमत कार्यकारी अभियंता भीमा विकास विभाग क्रं.२,सोलापूर यांना ऑनलाईन व्दारे **दि.०५/०७/२०२४** रोजी **१८.००** वाजे पर्यंत जमा करण्यात यावी.

जे ठेकेदार पहिल्यांदाच ई-निविदा प्रक्रियेत भाग घेत आहेत त्यांना वरील संकेतस्थळावर दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रथम समक्ष अधिका-यांकडुन डिजीटल सिग्नेचर युजर आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.ई-निविदा प्रक्रिया कामासंदर्भात सर्व माहिती वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदा संबंधी काही सहाय्यक आवश्यक असल्यास (डाऊनलोड/अपलोड) आपणास एनआयसी हेल्पडिस्क नं.१८००३०७०२२३२ येथे संपर्क करावा.

अ. क्र.	कामाचे नांव	कामाची अंदाजित किंमत (GST वगळुन)	इशारा / बयाणा रक्कम	काम पुर्ण करण्याचा कालावधी	ई-निविदा संचाची किंमत	नोंदणी वर्ग.
१	सिना नदीवरील मौजे शिंगोली,पाकणी, अकोले, सिंदखेड, कोर्सेगाव येथील को.प.बंधारे दुरुस्ती करण्याचे काम सन २०२३-२०२४	रु. ३,९५,७८,७८८/-	रू.१,९१,०००/-	१२ महिने	रू.२३६०/ -	सर्व पात्र कंत्राटदार

या विभागाकडील वरील प्रमाणे काम दिनांक २४/०६/२०२४ पासून ई निविदा प्रणालीच्या Main Portal www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

सही/-

(सं. ज. माने)

कार्यकारी अभियंता

भीमा विकास विभाग क्रं. २.

सोलापूर

(DGIPR-ROC-2024-25-5-C376)

संक्षिप्त वृत्त

शाळा प्रवेशोत्सवासाठी सजवलेल्या बग्गीतून मुली आणि प्रभात फेरीत सहभागी मुली.

वेळापूर मुलींच्या शाळेत प्रवेशोत्सवी मुलींसाठी बग्गीसफर

वेळापूर : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता राज्यभर प्रवेशोत्सवाची जोरदार अंमलबजावणी होत असताना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेळापूर मुली येथे नूतन प्रवेश घेतलेल्या १७ मुलींना सजवलेल्या बग्गीमधून गावाची सफर घडवून आणली. तत्पूर्वी शाळेमध्ये शाळा प्रवेशोत्सव पाठ्यपुस्तक वाटप समारंभ पूर्वक पार पडले. यावेळी सुरभी पतसंस्थेचे चेअरमन प्रतापराव पाटील, व्हाईस चेअरमन नंदकुमार होडगे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मुलींचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी सजवलेली बगी, बगीला जोडलेल्या ध्वनीक्षेपातून स्कूल चले हम, शाळा आमची यासारखी गीते लावून वातावरण प्रवेशमय केले होते. विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया टप्पा क्रमांक दोन साठी वेळापूर परिसरातील सर्व अंगणवाडी सेविकांनी महत्वपूर्ण सहकार्य केले. कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य बाळासाहेब बनसोडे, शुभांगी घाडगे, नीता जाधव, अर्चना भोसले, मीनाक्षी सरवदे आदी उपस्थित होते. प्रास्ताविक अशोक पवार यांनी केले. तर सूत्रसंचालन नितीन चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मुख्याध्यापक कोंडीबा सरतापे, प्रज्ञा इंगोले, कृष्णदेव तुपे, प्रवीण कुमार पांगे यांनी तयारी केले होती.

मोहोळ : महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याच्या शिष्टमंडळाने त्यांचा ना. आठवलेंचा सत्कार.

स्वाभिमानाने जगण्यासाठी प्रयत्न व्हावा : रामदास आठवले

मोहोळ : आपल्या पक्षाच्या माध्यमातून तळागाळातील जनतेच्या समस्या सोडवून त्यांच्या जीवनात स्थैर्य निर्माण होईल असा प्रयत्न करावा आणि समाजाच्या प्रगतीसाठी कार्यकर्त्यांनी हातभार लावावा जेणेकरून सामान्य नागरिक स्वाभिमानाने जीवन जगेल, अशी अपेक्षा केंद्रीय सामाजिक व न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी व्यक्त केली. ना. रामदास आठवले यांची तिसऱ्यांदा या विभागच्या केंद्रीय मंत्रिपदी निवड झाली आहे. त्यानिमित्त महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या नेतृत्वाखाली सोलापूर जिल्ह्याच्या शिष्टमंडळाने त्यांचा मुंबई येथील निवासस्थानी सत्कार केला. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना आठवले बोलत होते. यावेळी प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्यासमवेत सोलापूर जिल्हा सरचिटणीस शामसुंदर (रवी) गायकवाड, सोलापूर जिल्हा युवक अध्यक्ष तात्यासाहेब काळे, जिल्हा संघटन सचिव सिद्धार्थ बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष सुग्रीव जेटीथोर, मोहोळ तालुका युवक अध्यक्ष अमोल जगताप, हरिओम काळे आदीसह कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. रूपाली बेंदगुडे, मिसाळ व लांडे यांचे पुस्तक प्रकाशित

टेंभुर्णी : अकोले खुर्द, ता. माढा येथील श्री गणपती इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल सायन्सेस अँड रिसर्च या महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. रुपाली बेंदगुडे आणि प्रा. सुकुमार लांडे व प्रा. प्रशांत मिसाळ यांनी फार्मास्युटिक्स-१ हे प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र पदवी या शाखेतील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असलेले पुस्तक नित्या पब्लिकेशन भोपाळ यांच्या सहकार्याने हे महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या प्रकाशित करण्यात आले. तसेच हे पुस्तक फार्मसी काऊन्सिल ऑफ इंडिया, नई दिल्लीच्या पाठ्यक्रमानुसार तयार केले आहे. या पुस्तकांमधला पाठ्यक्रम हा विद्यार्थ्यांना आकलन व्हावे अशा पद्धतीने मुद्देसूदपणे मांडला असल्याने विद्यार्थ्यांना याचा अधिक फायदा होणार असल्याचे प्राचार्या डॉ. रूपाली बेंदगुडे यांनी सांगितले. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक सचिव डॉ. आर. डी. बेंदगुडे, अध्यक्ष ड. विजयराव हिरवे, उपाध्यक्ष बाबा येडगे यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

भाड्याच्या रकमेसह टेम्पो पळवणाऱ्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

टेंभुर्णी : अहमदाबादहून सोलापूर येथे माल घेऊन आलेल्या भाड्याची रक्कम ६४ हजार रूपये व माल वाहतूक करणारा १३ लाख रूपये किंमतीचा टेंम्पो असे मिळून १३ लाख ६४ हजार रुपयाचा ऐवज घेऊन पलायन केलेल्या कर्नाटक येथील चालक शरणबसप्पा दत्तू फुलारी, रा. हिरोळी, गुलबर्गा, आळंद याने टेंभुर्णी येथून १७/५ रोजी सकाळी १० वाजता येथील इंडियन ऑईल पंपावरून सोलापुरात माल खाली करण्यासाठी घेऊन गेलेला टेम्पो क्रमांक एम. एच. १२ एच. डी. ५३३८ हा व माल वाहतुकीपोटी मिळालेली रक्कम ६४ हजार रोख घेऊन पलायन केले आहे. याच्या विरूद्ध टेम्पो वाहतूक व्यावसायिक समाधान मारूती थोरात रा. तांबवे (टें.) यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लालपरीत वायफाय सेवा पुरवल्याच्या गप्पा 'हवेत' प्रवाशांचा लांब पल्ल्याचा प्रवास ठरतोय कंटाळवाणा

सोलापूर एसटी आगारातील ६३० एसटी बसमधील प्रथमोपचार पेट्याही झाल्या अनेक दिवसांपासून गायब

सोलापूर/प्रतिनिधी

प्रवाश्यांसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने बसमध्ये मोफत वायफाय सेवा सुरू केली होती. मात्र वर्षभरातच ही सेवा बारगळली आहे. एसटीतील प्रवासी संख्या वाढवण्यासाठी महामंडळाने २०१७ मध्ये एका खासगी कंपनीमार्फत हीसेवा सुरू केली होती. वायफायमुळे प्रवाशांना मनोरंजनाचे कार्यक्रम बसप्रवासात पाहण्याची संधी मिळाली होती. त्यामुळे या उपक्रमाला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला होता, मात्र ही योजना बारगळली.

परिवहन महामंडळाने एसटीचे प्रवासी वाढवण्यासाठी नवे अभियान सुरू केले होते. उन्हाळ्याच्या सुरुवातीला वायफाय सुविधा मिळत होती. या काळात प्रवाशांची संख्या जास्त असते, तसेच सतत प्रवास करावे लागतात. प्रवास कंटाळवाणा होऊ नये यासाठी हा प्रयोग राबवण्यात आला होता; मात्र आता एसटीने वायफाय सुविधा बंद केल्यामुळे प्रवास कंटाळवाणा होत आहे. शहर आगारातील कांही बसमध्ये वायफाय सुविधा सुरू नाही. कंपनीला ही सेवा देणे परवडण्यासारखे न झाल्याने बंद केल्याचे समजते. परिणामी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटीतून प्रवास करणाऱ्या प्रवाशांची निराशा झाली. तसेच अनेक बसेसमध्ये आता प्रथमोपचार पेट्याही दिसणे बंद झाल्या आहेत.

बसमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव

हल्ली अनेक प्रवासी राज्य परिवहन महामंडळाच्या गाड्यांमधून प्रवास करतात. स्मार्टफोन वापरणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे. पण स्मार्टफोनची बॅटरी प्रवासामध्ये लवकर उतरत असल्यामुळे नव्याने निर्माण करण्यात येत असलेल्या गाड्यांमध्ये मोबाइल चार्जिंगची सोय करावी, अशी मागणी होत आहे. शिवाय वाय-फायसेवा पूर्ववत चालू करावी.

- सरफराज डांगे, प्रवासी सोलापूर.

आगारातील बसेसमध्ये सुविधा बंद

वायफाय सुविधेमुळे प्रवाशांना निःशुल्क वायफाय सेवा एसटी प्रवासादरम्यान वापरायला मिळत होती. शहर आगारात रोज सरासरी जुन्या ६३० व नवीन ३० बस धावतात; परंतु एकही बसमध्ये सध्या वायफाय सेवा नसल्याचे आढळून आले आहे. एका खासगी कंपनीला ठेका देण्यात आला; परंतु कंपनीला डबघाईला गेली असल्याचे एका कर्मचारी याने नाव न सांगण्याच्या अटीवर माहिती दिली.

अकलुज : येथील शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित महर्षि संकुल यशवंतनगर येथे जागतिक योग दिन उत्साहात पार पडला.

महर्षि संकुलात जागतिक योग दिन उत्साहात

अकलूज/प्रतिनिधी

शिक्षण प्रसारक मंडळ अकलूज संचलित महर्षि संकुल यशवंतनगर येथे जागतिक योग दिन उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाप्रसंगी उदय साळुंखे कृषी सहाय्यक अधिकारी, ज्येष्ठ विधीज्ञ नितीनराव खराडे, अनिल जाधव, कैलास चौधरी यांच्या हस्ते माळशिरस तालुक्याचे भाग्यविधाते सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील व रत्नप्रभादेवी मोहिते पाटील यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. सर्व प्रमुख मान्यवरांचा सन्मान समारंभ संकुलाच्यावतीने संपन्न झाला.

उदय साळुंखे कृषी सहाय्यक अधिकारी मार्गदर्शन करताना म्हणाले, 'योगसाधनेचे मूळ उगमस्थान भारत देश आहे. मनातील आत्मविश्वास वाढवण्यासाठी योगच प्रभावी आहे.'

संकुलातील प्राध्यापक धनंजय देशमुख यांनी मनोगतातून स्व आणि समाजासाठी योग यावर्षीची थीम असल्याचे सांगितले. सर्वेक्षणानुसार आयटी कंपन्यातील घटत्या उत्पादन क्षमतेला सुधारण्यासाठी तरुणाईने योग करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन आपल्या मनोगतातून केले. आपल्या टीमच्या माध्यमातून ताडासन, पद्मासन, वज्रासन, हलासन अशा विविध योगासनांचे प्रात्यक्षिक सादरीकरण केले. त्याचप्रमाणे ओंकार, प्रार्थना, पूरक हालचाली, सूर्यनमस्कार प्राणायाम, ध्यान, योगनिद्रा आणि विविध योगासने करण्यात आली. प्रशालेचे मुख्याध्यापक संजय गळीतकर यांच्या मार्गदर्शनाखाली योग दिनानिमित्त योग प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमासाठी उपमुख्याध्यापक भारत चंदनकर, पर्यवेक्षक अंकुश एकतपुरे, शिक्षक प्रतिनिधी शिवाजी थोरात, सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी योगाचे प्रात्यक्षिक करत उपक्रमात आपला सहभाग नोंदवला. सूत्रसंचालन नागेश सोनवणे तर आभार प्रभावती लंगोटे यांनी मानले.

पांडुरंग साखर कारखान्याच्या मिल रोलरचे पूजन

वेळापूर/प्रतिनिधी

कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ या गळीत हंगामाचा मिल रोलर पूजन कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते व व्हा. चेअरमन कैलास खुळे व सर्व संचालक आणि कार्य. संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व अधिकारी यांच्या उपस्थितीत झाला.

यावेळी कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांनी सांगितले की, 'कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याकडे गळीत हंगाम २०२४-२५ साठी सुमारे १० लाख ५०० हेक्टर क्षेत्राच्या ऊस नोंदी झालेल्या असून त्यामध्ये आणखी १५०० ते २००० हेक्टर क्षेत्राच्या वाढीव नोंदी होतील असा अंदाज आहे. या हंगामात कारखाना पुर्ण क्षमतेने चालणार असून त्यासाठी आवश्यक असणारी तोडणी व वाहतूक यंत्रणा उभारणीचे काम युध्दपातळीवर सुरू आहे.' कारखाना पूर्ण क्षमतेने चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तोडणी व वाहतूक यंत्रणेचे करार सुरू आहेत. या हंगामात कारखान्यास सुमारे ४०० ते ४५० ट्रक, ट्रॅक्टर, ३०० ट्रॅक्टर बजॅट व २०० ते २५० बैलगाडीची आवश्यकता असून आवश्यकतेप्रमाणे सर्व करार करण्यात येत आहेत. यावेळी कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी यांनी माहिती दिली की, गळीत हंगाम २०२३-२४ ची कारखान्याची एफ.आर.पी प्रती मे. टन रक्कम रु.२५०० रुपये/- असतानाही या हंगामात गाळप झालेल्या ऊसास एफ.आर.पी. पेक्षा रक्कम रु. ३०० रुपये जादा देऊन प्रती मे. टन रक्कम रु. २८०० प्रमाणे ऊस बिल अदा केले आहे. तसेच तोडणी व वाहतूक ठेकेदारांची बिले अदा केली आहेत. पाठीमागील हंगामात पाऊस कमी झाल्यामुळे उन्हाळ्यात ऊस उत्पादकांना पाणीटंचाईशी सामोरे जावे लागले आहे. परंतु सध्या कार्यक्षेत्रात झालेल्या समाधानाकारक पाऊसामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे एकरी टनेजमध्ये वाढ होणार असून कारखान्यास अपेक्षेप्रमाणे गाळप करता येणार आहे.

यावेळी संचालक दिनकरराव मोरे, दिलीपराव चव्हाण, ज्ञानदेव ढोबळे, तानाजी वायमोडे, बाळासाहेब यलमर, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरू वायमारे, गंगाराम विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हनुमंत कदम, किसन सरवदे, दाजी पाटील, दिलीप गुरव, सिताराम शिंदे, शामराव साळुंखे, राणू पाटील व अधिकारी उपस्थित होते.

पांडुरंग कारखान्यात २०२४-२५च्या गळीत हंगामासाठी रोलर चे पूजन कारखान्याचे चेअरमन प्रशांतराव परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्हॉइस चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी व संचालक.

गृहिणींच्या 'किचन'चे बजेट कोलमडले

कांदा, बटाटा, टोमॅटो, कोथिंबीर, लसूण भाज्यांचे भाव कडाडले

नातेपुते/प्रतिनिधी

याऊक किंमत निर्देशांकावर आधारीत महागाई एप्रिलमध्ये १.२६ टक्के इतकी होती. मे व जून महिन्यात महागाई २.६१ टक्क्यांवर म्हणजेच दुपटीने वाढली. म्हणजेच महागाईने गेल्या १५ महिन्यांचा उच्चांक गाठला महागाईचा आगडोंब उसळल्याने सर्वसामान्य गृहिणींच्या किचनचे बजेट कोलमडले आहे. बटाटा सर्वाधिक कडाडला. २०२४ मध्ये बटाट्याच्या किमती ६४ टक्क्यांनी वाढल्या असून कांद्याचे दर ५८ टक्क्यांनी वाढले आहेत. खाद्यपदार्थ, खाद्यपदार्थांची उत्पादने, कच्चे-पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, खनिज तेल आणि इतर उत्पादनांच्या किंमती वाढणे, याऊक किंमती वाढण्याचे कारण आहे. मे २०२३ मध्ये याऊक किंमत निर्देशांकाच्या दरात ३.४८ टक्क्यांची घसरण नोंदवण्यात आली होती.

राज्यात अनेक ठिकाणी मुसळधार पाऊस झाला. त्यामुळे माल खराब झाला तसेच बाजारातच माल कमी प्रमाणात पोहोचतोय. दुसरीकडे इंधनाचे दरही कडाडले आहेत. त्यामुळे आपोआपच भाजीपाल्यासह कडधान्यांचे भावही गगनाला भिडल्याचे मालाची ने-आण करणारे सांगत आहेत. भाज्या तब्बल ३० ते ४० रुपयांनी कडाडले. २० रुपये किलोने मिळणारा कोबी ६० रुपयांवर गेला आहे तर ८० ते ९० रुपये किलोने मिळणारा वाटाणा १२०, १४० आणि १६० रुपये किलोवर गेला आहे. गवारीनेही चांगलाच भाव खाल्ला आहे. ६० ते ८० रुपये किलोने मिळणारी गवार दर्जानुसार १०० ते १६० रुपयांवर गेली आहे. ३० रुपये किलोने मिळणारा कांदा ४० रुपयांवर तर २५ रुपयांनी मिळणारा बटाटा ३५ आणि १०० ते १२० रुपये किलोने मिळणारा लसूण २५० ते ३०० रुपयांवर गेले आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांना खरेदी करताना आर्थिकचा विचार करावा लागत असून 'अच्छे दिन'ची वाट पहावी लागत आहे.

महागाईने सामान्यांचे हाल

महागाईचा आगडोंब उसळला असून सर्वसामान्यांचे हाल सुरू झाले आहेत. मेथी खायचीही सोय नाही. मेथीची जुडी घ्यायला गेले तर ६० रुपयांना एक जुडी मिळाली. कीती ही महागाई? सर्वसामान्यांनी खायचे काय आणि जगायचे कसे, असा प्रश्न निर्माण झाला असल्याचे गृहिणीकडून बोलले जाते.

किराणा मालाचे पूर्वीचे आणि आताचे दर

दर प्रति किलो

- तूरडाळ १४०, १८०
- साखर ४०, ४३
- तांदूळ ८०, १००
- मूगडाळ ९०, १०५
- चणा डाळ ८०, १००
- गहू ३०, ४० ते ४५

मांसाहारही महागणार

ब्रॉयलर कोंबडी १८० रुपये किलो असून चिकन २८० रुपये किलो आहे तर गावठी कोंबडी २८० रुपये किलो आहे. तसेच मटण ७२० रुपये किलो आहे. मात्र, काही दिवसांत हे दरही वाढतील असे विक्रेत्यांनी सांगितले. दरम्यान, अंड्यांचे दर डझनामागे ६८ रुपये होते हेच दर आता ७५ रुपये आहेत.

कावड ट्रस्ट पुणे व रोहित रक्षिता यांचे मुंगी घाटात ७०० झाडांचे वृक्षारोपण

नातेपुते/प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील कोथळे तालुका माळशिरस येथील मुंगीघाटात पुणे येथील केदारी कावड ट्रस्ट वानवडी पुणे व पर्यावरण प्रेमी छत्रपती शिवाजी महाराज वनश्री रोहित रक्षिता यांच्या संयुक्त विद्यमाने ७०० वड पिंपळाच्या झाडांचे वृक्षारोपण रविवार दि. १६ जून रोजी करण्यात आले.

या ठिकाणी उन्हाळ्याच्या अति तीव्रतेत चैत्र महिन्यात श्री शंभू महादेवाची यात्रा भरते. या लाखोंच्या संख्येने भाविक भक्त या मुंगी घाट कावड मार्गावरून मोठ्या श्रद्धेने येत असतात. परंतु या ठिकाणी पूर्वीसारखी मोठमोठाली सावली व ऑक्सिजन देणारी झाडे अस्तित्वात राहिलेली नाहीत. या कारणांमुळे सतत या भागात दुष्काळ पडत आहे. याची झळ यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना मोठ्या प्रमाणात सोसावी लागत आहे.

या गंभीर समस्येचा विचार करून यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी या ठिकाणी जास्तीत जास्त ऑक्सिजन व सावली देणारी १० फुट उंचीच्या वड पिंपळाच्या झाडांचे वृक्षारोपण करून त्या झाडाच्या संवर्धनाची संगोपनाची जबाबदारी स्वीकारुन वृक्षारोपण आनंद उत्सव साजरा केला. याप्रसंगी वनश्री रोहित रक्षिता व दामुअण्णा महाराज, यदाअप्पा जाधव व सर्व वानवडीमधील शिवभक्त बहुसंख्येने उपस्थित होते.

संक्षिप्त वृत्त

सोलापूर : खड्ड्याच्या ठिकाणी चित्र काढताना शिवसेना ठाकरे पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते.

रस्त्यावर पेंटिंग करत शिवसेना ठाकरे गटाचे अनोखे आंदोलन

सोलापूर : स्मार्ट सिटीतील रस्त्यांवर ड्रेनेज मेनहोलची नादुरुस्त झाकणे आणि खड्ड्यांमुळे नागरिक हैराण झाले आहेत. महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने करण्यात आला आहे. रस्त्यावर ड्रेनेज व खड्ड्यांच्या बाजूला सावधान ! पुढे खड्डा आहे ! असा इशारा पेंटिंग करत दिला आहे. यावेळी पदाधिकाऱ्यांनी महापालिका प्रशासनाच्या विरोधात धिक्काराच्या घोषणाही दिल्या. शहरात अनेक ठिकाणी ड्रेनेज मेनहोलची झाकणे नादुरुस्त झाली आहेत. तसेच रस्त्यांवर खड्डेही पडले आहेत. पावसात यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वाहनधारकांना वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे. यामुळे अनेक ठिकाणी अपघात घडले आहेत. याकडे लक्ष वेधण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सावधान ! पुढे खड्डा आहे असा इशारा देत रस्त्यावर पेंटिंग करून अनोखे आंदोलन करण्यात आले. सोलापूरला खड्ड्यात घालणाऱ्या महापालिकेचा धिक्कार असो आदी घोषणा दिल्या. महापालिकेनेया आंदोलनाची दखल घ्यावी अन्यथा अधिकाऱ्यांवर शिक्का उमटवावा लागेल, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, महेश धाराशिवकरसह कार्यकर्ते उपस्थित होते.

तेलुगू सार्वजनिक ग्रंथालयमच्यावतीने नूतन खा. प्रणिती शिंदे यांचा सत्कार

सोलापूर : तेलुगु भाषा अभिवृध्दि सार्वजनिक ग्रंथालयम व मंडळीतर्फे खासदार प्रणिती शिंदे यांचा करण्यात आला. त्यांच्या प्रतिमेचे हातमागावर विणकर मार्कडेन श्रीचिप्पा यांनी तयार केलेला वालहॅगींग फोटोफ्रेमसह सोलापूर शहरातील ५ लाख तेलुगु भाषिकांतर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी प्रणिती शिंदे यांनी तेलुगू भाषिका समाजाची ऋणी आहे. या पूर्वी आपले काम केले असून या पुढेही करणार असल्याचे सांगितले. याप्रसंगी अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम, कार्याध्यक्ष बालराज बोल्ली, सचिव तिप्पण्णा गणेरी, सहसचिव प्रभाकर भिमनाथ, कवयित्री रेणुका बुधारम व पुरषोत्तम बुधारम उपस्थित होते.

कवी जगदिशचंद्र कुलकर्णी यांचा दिब्रुगडमध्ये शांतीदुत पुरस्काराने सन्मान

सोलापूर : लेखक कवी जगदीशचंद कुलकर्णी यांनी इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन पीस ॲन्ड फ्रेंडशीप दिब्रुगड येथे भाग घेतला होता. ही कॉन्फरन्स दि.६ मे ते ११ जुन या काळात पार पडली. यावेळी दिब्रुगड मौचाक व इंटरनॅशनल युनेस्को यांच्यातर्फे कुलकर्णी यांना पीस मेसेजर ॲवॉर्ड (शांतीदुत पुरस्कार) अध्यक्ष संजीव बारदोलाई यांच्याहस्ते मेयर डॉ.बरुआ व अन्य मंत्री यांच्या उपस्थितीत देण्यात आला. शाल, श्रीफळ, आसामी कॅप, स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप होते. पुरस्कार प्राप्तीबद्दल कुलकर्णी यांचे त्यांच्या हितचिंतकांकडून अभिनंदन केले जात आहे.

महापालिकेत महिला कर्मचाऱ्यांनी वटवृक्षाचे रोपटे देऊन वटपौर्णिमा साजरी केली.

महिला अधिकाऱ्यांनी वटवृक्ष देऊन पर्यावरण रक्षणाचा दिला संदेश

सोलापूर : महापालिकेतील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना वटवृक्ष देऊन वटपौर्णिमा अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात आली. या निमित्ताने पर्यावरण रक्षणाचा संदेश देण्यात आला. वटपौर्णिमेनिमित्त महापालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अभियानांतर्गत इंद्रभुवन येथे सहाय्यक आयुक्त ज्योती भगत व मुख्य लेखा परीक्षक रूपाली कोळी यांच्या हस्ते महापालिकेतील महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना वडाचे वृक्ष देऊन वटपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. सर्व महिलांना दिलेल्या वृक्षाचे घराच्या परिसरात रोपण करून त्याचे जोपासना करावी, असे आवाहन यावेळी भगत यांनी केले. या कार्यक्रमास संगणक विभागाचे प्रमुख स्नेहल चपळगावकर, युसीडी विभागाच्या उज्वला गणेश, शहर समन्वयक दामिनी जवळकर, वाहन अधिक्षक नागनाथ मेंडगुळे, शेरखाने, पर्यावरण व्यवस्थापक स्वप्निल सोलनकर, जनसंपर्क अधिकारी गणेश बिराजदार, दिलीप भामरे, आदी मान्यवर उपस्थित होते. आरोग्य निरीक्षक अंजली काकडे यांनी सूत्रसंचालन केले.

पाहिजेत

साईराम कंपनीत कामासाठी मुले, मुली व महिला पाहिजेत. वय - १८ ते ३५, शिक्षण अट नाही, पगार ९ ते १५ हजार. राहणे मोफत. संपर्क मो.: अकलूज : ९१५८७७०१६७, सांगोला : ९२०९३०५७१५ (२६४/०३०७२४)

सुराज्य Classified

निवेदन : या अंकात प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिध्द केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आवाहनाच्या सत्यतेबाबत 'सुराज्य' हमी घेऊ शकत नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

पीकविमा भरता येणार १५ जुलैपर्यंत

- आधार कार्ड व बँक खात्यावरील नाव सारखे नसल्यास योजनेपासून वंचित; अंतिम मुदत १५ जुलै २०२४
- नुकसान झाल्यास ७२ तासांच्या आत याबाबत केंद्र शासन पीकविमा कंपनीकडे कळवावे

सोलापूर/प्रतिनिधी

खरीप पिकांसाठी एक रुपयात पीक विमा भरण्याची सोय राज्य शासनाने केली आहे. शेतकऱ्यांनी पेरणी व विमा भरण्यासाठी बँका व महा-ई सेवा केंद्रावर गर्दी केली आहे. मात्र, सरकारने सातबारा, बँक पासबुक व आधारकार्डवर एकच नाव असावे ही अट घातली आहे. यंदा ही नवी अट नावात काहीअंशी बदल असणाऱ्या शेतकऱ्यासाठी अडचणीची ठरणार आहे.

शासनाने गेल्या वर्षांपासून एक रुपयात पीक विमा सुरू केला आहे. सध्या सुविद्या झाल्याने शेतकरी पीकविमा भरू लागले आहेत. १६ जूनपासून पोर्टलवर विमा भरण्याची सोय झाल्याने १५ जुलैपर्यंत मुदत असेल. दरवर्षी जुलैअखेरपर्यंत विमा भरण्याची मुदत असते. यावर्षी शासननिर्णय घेणार आहे.

- दत्तात्रय गवसाने,
जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी.

खरिपासाठी या पिकांचा समावेश
खरीप हंगामातील पीकविमा योजनेमध्ये भात, ज्वारी, बाजरी, नाचणी, मका, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमूग, तीळ, कारळ, कापूस आणि कांदा या पिकांचा समावेश आहे.

सर्व शेतकरी योजनेस पात्र
सर्व शेतकरी या योजनेस पात्र आहेत. पीककर्ज घेणाऱ्या आणि बिगर कर्जदार शेतकऱ्यांना योजनेतील सहभाग ऐच्छिक राहील. भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना पीकविमा पोर्टलवर नोंदणीकृत भाडेकरार अपलोड करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याने लागवड केलेल्या पिकाची नोंद ई-पीक पाहणीमध्ये करावी. पिकाची नोंद ई-पीक पाहणीमध्ये करावी

योजनेत सहभागी होण्याकरिता
पेरणीचे स्वयंघोषणापत्र घेऊन प्राधिकृत बँकेत विमा अर्ज देऊन व हप्ता भरून सहभाग घ्यावा. हप्ता भरलेली पोहोच पावती त्याने जपून ठेवावी. याशिवाय कॉमन सर्व्हिस सेंटर, आपले सरकारच्या मदतीने आपण विमा योजनेत सहभाग घेऊ शकता किंवा www.pmfby.gov.in या पोर्टलचे साह्य घेऊ शकतो.

माहितीसाठी संपर्क
पीकविमा योजनेच्या अधिक माहितीसाठी किंवा नुकसान भरपाईसाठी केंद्र शासनाच्या कृषी रक्षक पोर्टल हेल्पलाइन १४४४७ वर संपर्क साधावा, संबंधित विमा कंपनी, स्थानिक कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

जिल्ह्यात अलीकडे खरिपाचे क्षेत्र वाढत असल्याने खरीप जिल्हा म्हणून शासनाने मान्यता दिली आहे. दरवर्षी एक जुलैपासून पीक विमा भरण्यास सुरुवात होते. साधारण जुलै अखेरपर्यंत पीकविमा भरण्याचा कालावधी असतो. जिल्ह्यात लवकर पाऊस सुरू झाल्याने पीक कंपनीकडून कसलेही पत्र आले नसले तरी पीक विमा भरून घेण्यास सुरुवात झाली आहे. मागील एक रुपयात पीक विमा भरून घेतला जात आहे. शेतकरी हिश्श्याच्या उर्वरित रकमेचा भार राज्य शासन उचलणार आहे. मात्र, यावर्षी सातबारा उतारा, बँक पासबुक व आधारकार्डवर एकच नाव असावे, ही अट घातली आहे.

पीकनिहाय विमा संरक्षित रक्कम

पीक	रक्कम रु./हे.
भात	३२, ५००
बाजरी	३३, ९१३
नाचणी	२०, ०००
मका	३५, ५९८
मूग	२५, ८१७
उडीद	२६, ०२५
भुईमूग	४२, ९७१
सोयाबीन	५७, २६७
तीळ	२५, ०००
कारळ	१३, ७५०
कापूस	५९, ९८३
कांदा	८१, ०००

नाना पाटोले यांच्या फोटोला दुग्धाभिषेक करताना विजय हत्तुरे व इतर.

पटोलेंच्या फोटोला दुग्धाभिषेक

सोलापूर/प्रतिनिधी

भाजपच्या वतीने काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या पाय धुणे प्रकरणाच्या विरोधात आंदोलन केले होते. याला प्रतिउत्तर देत सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांच्या नेतृत्वाखाली चार पुतळा चौकात पटोले यांच्या प्रतिमेस दुग्धाभिषेक करण्यात आले.

याप्रसंगी कार्याध्यक्ष विजयकुमार हत्तुरे यांनी भाजपच्या नेत्यावर सडकून अशी टीका केली. काँग्रेस राज्यात एक नंबरचा पक्ष झाला. परंतु वैफल्यग्रस्त झालेल्या भाजपने विनाकारण आंदोलन करून स्वतः चे हसे करून घेतले आहे. यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नामदेव फुलारी, मोतीराम राठोड,एम.एस. मुंडेवाडीकर, अमर पाटील कंदलगाव, समर्थ हिटनळी, काशिनाथ होनराव, रुद्रप्पा कांबळे, नागेश पडनुरे, परशुराम राऊतराव, यशवंत नानाजी, अमिन शेख, नंदू पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते.

शहर काँग्रेसतर्फे सरकारच्या निषेधार्थ चिखलफेक आंदोलन

शासनाच्या नाकर्तेपणावर ओढले कोरडे

सोलापूर/प्रतिनिधी

केंद्रातील मोदी सरकार आणि राज्यातील महायुती सरकार केवळ जातीय तेढ निर्माण करण्यात व्यस्त आहे. इतर घटकांच्या मागण्यांकडे लक्ष देण्यासाठी त्यांना वेळ नाही, असा आरोप करत शहर काँग्रेसकडून शहराध्यक्ष चेतन नरोटे यांच्या नेतृत्वाखाली पूनम गेटवर सरकारच्या प्रतिकात्मक प्रतिमेवर चिखलफेक आंदोलन करण्यात आले.

दोन्ही सरकारच्या नाकर्तेपणामुळे सर्वसामान्य जनता, शेतकरी, कष्टकरी, बेरोजगार, तरुण, विद्यार्थी महिला, सर्वसामान्य नागरिकांसह कोणत्याही घटकाला दिलासा मिळालेला नाही. महागाई, बेरोजगारी प्रचंड वाढली, नोकर भरती होत नाही, महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवून नेले जात आहेत. महिलांवर अत्याचार वाढले आहेत. सरकारच्या आश्रयाने लाखो रुपये घेऊन स्पर्धा परीक्षांचे, प्रवेश परीक्षांचे पेपर फोडले जात आहेत. यामुळे मेरिट मधील विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. असे अनेक घटना घडत असताना सुध्दा केंद्रातील खिचडी सरकार आणि राज्यातील तिघाडी सरकार मुके, बहिरे, आंधळे होऊन बघत आपल्याच राजकारणात व्यस्त आहेत. जातीधर्मात तेढ निर्माण करून आपले अपयश झाकण्याचे काम करत आहे, असा आरोप काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी केला.

या शहराध्यक्ष चेतन नरोटे, महिलाध्यक्षा प्रमिला तूपलवंडे, परवीन इनामदार, भीमाशंकर टेकाळे, अंबादास करगुळे, दत्तू बंदपट्टे, जुबेर कुरेशी, उमेश सुरते, उदयशंकर चाकोते, हणमंतू सायबोलु, नागनाथ कदम, केशव इंगळे, हेमा चिंचोळकर, सुशील बंदपट्टे, तिरुपती परकीपंडला, अनिल मस्के, राजेश झंपले, दाऊद नदाफ, सिद्राम अत्तेलुर, नागेश म्हेत्रे, रमेश जाधव, राहुल वर्धा, श्रीशैल रणधिरे, देशपांडे, शमीन पटेल, पटेल यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

सोलापूर : केंद्र व राज्य सरकारच्या चुकीच्या धोरणांविरोधात सोलापूर शहरात काँग्रेसकडून चिखलफेक आंदोलन करण्यात आले.

आता शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी

- कमी पुस्तकात मुद्देसूद, सर्व प्रकारच्या अभ्यासाचा समावेश

सोलापूर/प्रतिनिधी

शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी झाला असून कमी पुस्तकांमध्येच मुद्देसूद व सर्वच प्रकारचा अभ्यासाचा समावेश आला आहे. मुलांमध्ये पाठदुखीचा त्रास होणे, सांधे आखडणे, स्नायू आखडणे, मणक्याची झीज होणे, मान दुखणे, फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी होणे, थकवा येणे, मानसिक ताण येणे, डोके दुखी यासारखे आजार होऊ शकतात. त्यामुळे मुलांच्या शारीरिक वाढीवर अनिष्ट परिणाम होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांसाठी शालेय दृष्टिकोनातून कमी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याची अंमलबजावणी मागच्या वर्षापासून करण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील दप्तराचे ओझे कमी करण्यात आले आहे.

कमी वयोगटातील मुलांच्या दप्तराचे ओझे १० टक्केपेक्षा कमी असते. हे शासनाव्दारे तपासून घेण्यात आले आहे. दप्तराचे वजन मुलाच्या वजनाच्या १० टक्केच्या आत राहील, याची जबाबदारी पालका एवढीच मुख्याध्यापकाची आहे. यापुढे शाळेमुळे मुलांच्या दप्तराचे वजन मयादेपेक्षा जास्त होणार नाही, यासाठी शाळेने सकारात्मक पध्दतीने वेळापत्रक तसेच गृहपाठाचे नियोजन करावयाचे आहेत. यामुळे त्याना दप्तरामध्ये पुस्तके जास्त लागत नाही. इतर मुख्याध्यापकांनीही तसे करत आहेत. विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी त्यांच्या योगटानुसार शाळेमध्येच खेळण्याचे उपलब्ध करून द्यावे. नव्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या दप्तराच्या ओझ्याबाबत चर्चा केली जाते. यावर मार्ग काढण्याचे आश्वासनदेखील दिले जाते. पण यंदाच्या या नवीन शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे दप्तराच ओझ हे कमी होणार आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्य पुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने येत्या नव्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता दुसरी ते आठवीपर्यंतच्या पुस्तकांची रचना बदलली आहे. यामुळे जवळपास ७५ टक्के दप्तराच ओझे हे कमी होणार आहे. विद्यार्थ्यांना हे चारही भागांचे पुस्तक एकत्रित देण्यात येणार आहे. मुलांना पहिल्या तिमाही परीक्षेसाठी एक पुस्तक आणि पुढील तिमाहीसाठी एक असे वर्षभरात चार पुस्तके येऊन जाता येणार आहेत.चारही भागातील पुस्तकांमध्ये अनुक्रमणिका-नव्या शैक्षणिक वर्षात नवीन पुस्तके बालभारतीकडून प्रकाशित करण्यात येणार आहेत. मुलांना धड्याबाबत महत्त्वाची नोंदही लिहिता येणार आहे. या चारही भागातील पुस्तकांमध्ये अनुक्रमणिका देण्यात आली आहे. त्यात मराठी, इंग्रजी, हिंदी, गणित, सामान्य विज्ञान, इतिहास व नागरिक शास्त्रज्ञ, भूगोल या विषयाचे धडे देण्यात आले आले आहे.

बालभारतीचे पुस्तक कसे आहे?

शैक्षणिक वर्षात इयत्तानिहाय सर्व विषयांचे चार भाग करण्यात आले आहेत. प्रत्येक भागात सर्वच विषयांचे धडे असणार आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या या पुस्तकात एक धडा संपल्यानंतर वहीचे एक पान जोडण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांना कसा मिळणार फायदा

शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना नवीन पुस्तके मिळाली आहेत. विद्यार्थ्यांना ही चारही पुस्तके प्रत्येक तिमाहीसाठी वापरता येणार आहेत. पाठ्यपुस्तकांच्या नव्या रचनेनुसार तीन-चार विषयांची पुस्तके चार भागांत एकत्रित केली आहे. या पुस्तकाच्या बरोबर मुलांना वर्गामध्ये वह्या आणाव्या लागणार आहेत. नव्या पुस्तकांचे चार भाग-प्रत्येक भागात प्रत्येक विषयाचे धडे असणार आहेत. या नव्या पुस्तकात प्रत्येक धड्यामागे वहीचे एक पान असणार आहे.

पाठ्यपुस्तकाची रचना ही एकात्मिक पद्धतीने

शालेय विद्यार्थ्यांच्या पाठीवरील पुस्तकाचे ओझ कमी करण्यासाठी पाठ्यपुस्तकाची रचना ही एकात्मिक करण्यात आली आहे. राज्य सरकारने लागू केलेल्या नियमानुसार पुस्तकाचे चार भाग करण्यात आले आहेत या पानाचे नाव माझी नोंद असे असणार आहे. या माझी नोंदच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्येक धड्यानंतर विद्यार्थ्याला त्याची नोंद देखील करण्यात येणार आहे. प्रत्येक भागात वेगवेगळ्या विषयांचे धडे देण्यात आले आहे. यंदा चार भाग करण्याचा फायदा असा की पहिल्या तिमाही भागासाठी आत्ता विद्यार्थ्यांना एकच पुस्तक घेऊन जावे लागणार आहे.

- कादिर शेख,
शिक्षण अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर

अॅग्री 'कल्चर'

वेलकम 'आर्द्रा'...

सोलापूर-यंदाच्या पावसाळ्यातील मृग नक्षत्राने गुरूवारी निरोप घेतला तर शुक्रवारी आर्द्रा नक्षत्राचे आगमन झाले.मृग नक्षत्राने सुरूवात चांगली केली. जूनच्या दुसऱ्या आठवड्यात पडलेल्या मुसळधार आणि संततधार पावसामुळे नदी,ओढे आणि नाले तुडूंब भरून वाहिले होते. सोलापूरची वरदायिनी असलेल्या उजनी धरणात सह टीएमसी पाणीही आले.जमिनीत ओलावा होवून वापसा देखील आला. शेतकऱ्यांनी खरिपाच्या पेरण्याही उरकल्या.मात्र गेल्या आठ-दहा दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे.त्यामुळे शेतकरीवर्ग चिंताग्रस्त झाला आहे.सोलापूर जिल्ह्यात काही तालुक्यांमध्ये खरीपाच्या पेरण्या झाल्या तर काही तालुक्यात पावसाअभावी त्या खोळंबल्या आहेत.ज्या ठिकाणी पेरण्या झालेल्या आहेत,तिथेही पावसाची गरज आहे.त्यामुळे शेतकरीवर्ग पावसाच्या प्रतिक्षेत आहे.नक्षत्र बदलल्यानंतर पाऊस हमखास होतो,असा शेती क्षेत्रातील जाणकारांचा अनुभव आहे.२४ जूनपासून पावसाला सुरूवात होईल,असे हवामान विभाग सांगते.पंचांगकर्ते मोहन दाते यांनीही हीच शक्यता वर्तवली आहे. आर्द्रा नक्षत्राच्या काळात सर्वत्र चांगला पाऊस होईल,असे दाते यांनी सांगितले.

नाफेडचे कारस्थान उघडे पडले

शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी न करता मार्केट कमिटीकडून केली

नाफेडच्या अध्यक्षांनी टाकली रेड

✔ **नाशिक** : नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहीर यांनी अचानक नाशिक जिल्ह्यातील नाफेडच्या कांदा खरेदी विक्री केंद्रांवर धाड टाकली. नाफेडच्या केंद्रांना अचानक भेट दिल्याने त्यांना गैरकारभार आढळून आला आहे. शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी न करता बाजार समितीतून कांदा खरेदी केला जात असल्याचे आढळून आले आहे.

ऑनलाईन व्यवहारात घोटाळा

ऑनलाइन कांदा खरेदी विक्रीमध्ये घोटाळा झाल्याचे निरीक्षण करण्यात आले आहे. कांदा प्रश्नांबाबत तक्रार करण्यात आली होती. कोणाला न सांगता अचानक भेट दिली आहे. विक्री केलेल्या मालापेक्षा दुप्पट कांदा गोडावूनमध्ये आढळून आला आहे. आधीच काही शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करुन नाफेडकडून पैसे वसूल केले जातात. ५ ते ६ ठिकाणी चुकीच्या पध्दतीने काम सुरु असल्याचे आढळून आले आहे.

लवकरच समिती स्थापन करणार

दरम्यान, कांदा खरेदी ही शेतकऱ्यांकडून केली जात नाही. नाफेड हे शेतकऱ्यांसाठी आहे पण तसे कामकाज दिसत नाही. शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे जात नसल्याचेही समोर आले आहे. आधारकार्डवर शिक्के मारुन ऑनलाइन खरेदी विक्री व्यवहारात गडबड केली जात असल्याचेही समोर आले आहे. दरम्यान, यासंदर्भात लवकरच समिती स्थापन केली जाणार असून, समिती नाशिकमध्ये येऊन आढावा घेणार असून, त्यानुसार कठोर कारवाई केली जाणार आहे. शेतकऱ्यांना पैसे मिळत नाहीत, दलाली होत असल्याचेही समोर आले आहे. शेतकऱ्यांना दुप्पट नफा देण्यासाठी नाफेडची स्थापना करण्यात आली आहे. मात्र वास्तवात तसे घडत नसल्याचा शेरा नाफेडच्या अध्यक्षांनी दिला आहे. कांदा खरेदी विक्री व्यवहारात दलाली होत असल्याने शेतकऱ्यांना पूर्ण पैसे मिळत नसल्याचे उघडकीस आले आहे. बाजार समितीतून कांदा माल खरेदी करणे अवघड आहे पण आम्ही, याबाबतीत विचार करत असल्याचे नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहीर म्हणाले.

नाफेडचे कांद्याचे दर कमी

केंद्र सरकारच्या बफरस्टॉकसाठी शेतकऱ्यांकून खरेदी केल्या जाणाऱ्या कांद्याचे दर यापूर्वी नाफेडच्या स्थानिक अधिकाऱ्यांकडून ठरवले जात होते. मात्र, आता नाफेड कांदा खरेदीचे दर दिल्लीतून ठरणार आहेत. त्यामुळं शेतकऱ्यांचा फायदा होणार असे सरकारकडून सांगण्यात आले आहे. पण, प्रत्यक्षात आजही बाजार समित्यांमध्ये शेतकऱ्यांच्या कांद्याला लिलावात मिळणाऱ्या दरापेक्षा नाफेडचे दर कमी आहेत.

खरीपातील ऊस मोडला; कापूस, तुरीवर भर

✔ सोलापूरः यावर्षी जूनच्या सुरुवातीला झालेल्या पावसानंतर शेतकऱ्यांनी पेरणीची लगबग सुरु केली. १८ जूनपर्यंत गेवराई तालुक्यातील १३ महसूल मंडळातील तब्बल ७० हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. यामध्ये सर्वाधिक कापसाची लागवड ६२ हजार हेक्टरवर पूर्ण झाली आहे.

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्याचे भौगोलिक क्षेत्र १ लाख ४६ हजार ५४० हेक्टर क्षेत्र असून यापैकी १ लाख ३४ हजार ७३७ हेक्टर पेरणीलायक क्षेत्र आहे. यापैकी १ लाख हेक्टरवर खरिपाचा पेरा होण्याची शक्यता आहे.

दरम्यान यावर्षी पावसाने वेळेवर हजेरी लावल्याने मृग नक्षत्रातच कपाशीची लागवड झालेली आहे. सध्या दोन-तीन दिवसापासून पावसाने उघडीप दिल्याने शेतकऱ्यांनी या पिकाच्या अंतरमशागतीच्या कामांची लगबग सुरु केली आहे.

यामध्ये बैलपाळी, खुरपणी कामे करताना शेतकरी दिसत आहेत. बाजरी, भुईमूग, सोयाबीनसह अन्य खरिपाच्या पेरणीसाठी शेतकरी प्रयत्नात आहे. त्यामुळे शेतशिवार गजबजलेली दिसून येत आहे. तालुक्यात आतापर्यंत १८४ मिमी पाऊस झाला असून गतवर्षीच्या तुलनेत या कालावधीत अधिक पाऊस पडला आहे.

परिणामी जलसाठ्यात वाढ झाल्याने

विहिर, बोअरची पातळी वाढत चालली आहे.

१३ महसूल मंडळातील खरीप पेरा

बीड जिल्ह्यात आतापर्यंत १३ महसूल मंडळात कापूस ६१ हजार ७३७, तूर ४ हजार ७३५, मूग ५२४, बाजरी ४१७, मका ३५५, सोयाबीन ९०६, उडीद ५६ व अन्य असा एकूण ६८ हजार ३७६ हेक्टर पेरा झालेला आहे.

खरीप पिकाच्या क्षेत्रात वाढ होणार !

शेतकऱ्यांमधून सर्वाधिक कापूस लागवडीला प्राधान्य दिले जात आहे. दोन वर्षापासून भाव चांगला मिळत असल्याने तूर पिकांचा पेरा वाढणार आहे.

मागील दोन वर्षे पडलेल्या अत्यल्प पावसामुळे तालुक्यातील हजारो हेक्टरवरील ऊस मोडला असून यावर्षी खरीप पिकाच्या क्षेत्रात वाढीची शक्यता असल्याचे गेवराईचे कृषी मंडळ अधिकारी सतीश केसभट, उमापूर मंडळाचे कृषी मंडळ अधिकारी रवींद्र मुंडे यांनी सांगितले.

बटाटा, कांदा, टोमॅटोनंतर आता डाळींच्या दरातही वाढ

✔ सोलापूर/प्रतिनिधी

चालू जून महिन्यात अनेक वस्तूंच्या दरात वाढ झाली आहे. जून महिन्यात बटाटे, कांदा, टोमॅटोनंतर डाळींचे भाव देखील वाढले आहेत. मिळालेल्या आकडेवारीनुसार देशाची राजधानी दिल्लीत हरभरा डाळीच्या किंमतीत ११ टक्क्यांहून वाढ झालीय. त्याबरोबर तूर आणि उडदाच्या दरातही ३ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. दरम्यान, या वाढत्या दराचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे.

जून महिन्यात डाळींच्या किंमतीत वाढ झाली आहे. जून महिन्यात बटाटे, कांदा, टोमॅटोसह डाळींच्या दरात वाढ झाली आहे. देशाची राजधानी दिल्लीत हरभरा डाळीच्या दरात ११ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. त्याचबरोबर कांद्याच्या भावात ६७ टक्क्यांनी वाढ झाली आहे. तूर, उडीद, मूग यांच्या दरात वाढ झाली आहे. देशातील बटाटे, कांदा आणि टोमॅटोच्या सरासरी दरांवर नजर टाकली तर सर्वाधिक वाढ टोमॅटोमध्ये झाली आहे. टोमॅटोच्या दरात ३१ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. त्याचबरोबर हरभरा आणि तुरीच्या दरात देखील सरासरी २ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे.

सरासरी किती वाढ

ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, ३१ मे रोजी हरभरा डाळीची किंमत ८६.१२ रुपये प्रति किलो होती. ज्यात २.१३ टक्के म्हणजेच १९ जूनपर्यंत १.८४ रुपयांची वाढ झाली. आज डाळीची किंमत ८७.९६ रुपये झाली आहे.

३१ मे रोजी तूर डाळीची किंमत १५७.२ रुपये प्रति किलो होती. त्यात १९ जूनपर्यंत ४.०७ रुपये म्हणजेच २.५८ टक्के वाढ झाली आहे. तूर डाळीचा भाव हा १६१.२७ रुपये प्रति किलो झाला आहे.

उडीद डाळीच्या सरासरी दरात फारशी वाढ झालेली नाही. आकडेवारीनुसार, ३१ मे रोजी १२५.७९ रुपये किंमत होती. ती वाढून १२६.६९ रुपये प्रति किलो झाली आहे. म्हणजेच या कालावधीत ०.९० रुपयांची म्हणजेच ०.७१ टक्के वाढ झाली आहे.

जून महिन्यात मूग डाळीच्या सरासरी दरात किंचित वाढ झाली आहे. ३१ मे रोजी त्याची किंमत ११८.३२ रुपये होती, जी १९ मे पर्यंत ११९.०४ रुपये प्रति किलो झाली. म्हणजेच या कालावधीत किंमतीत ०.७२ रुपयांची म्हणजेच ०.६० टक्के वाढ झाली आहे.

देशात मसूरच्या सरासरी किमतीत ०.२२ रुपयांनी म्हणजेच ०.२३ टक्के वाढ झाली आहे. त्यामुळं ३१ मे रोजी ९३.९ रुपये असलेली किंमत वाढून ९४.१२ रुपये झाली आहे.

खरीप बाजारीसाठी लागवड तंत्रज्ञान

✔ सोलापूर/प्रतिनिधी

महाराष्ट्रातील बाजरी लागवडीचे क्षेत्र ६.४७ लक्ष हेक्टर असले, तरी धान्य उत्पादन ४.२२ लक्ष मेट्रिक टन आणि सरासरी उत्पादकता ६५२ किलो इतकी होती. २०१४-१५ देशाच्या तुलनेत राज्याची कमी उत्पादकतेची कारणमीमांसा केल्यास हे पीक प्रामुख्याने हलक्या व भरड जमिनीत घेणे, पावसाची अनिश्चितता, कोड व रोग नियंत्रणाचा अभाव हे होय. त्यामुळे सुधारित तंत्राचा खालीलप्रमाणे वापर केल्यास या पिकाचे भरघोस उत्पादन मिळू शकते.

हवामान व जमीन

बाजरी पिकास उष्ण व कोरडे हवामान मानवते. या पिकात पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता असल्याने ते कोरडवाहुतही चांगले येते.

बाजरी पिकासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी हलकी ते मध्यम जमीन निवडावी. जमिनीचा सामु हा ६.२ ते ७.७ असावा. हलक्या जमिनीत बाजरी हे पीक घ्यावयाचे असल्यास सरी - वरंबा पद्धत फायदेशीर ठरते.

या पद्धतीत मृगाचा पाऊस पडण्यापूर्वी जमिनीच्या खोलीप्रमाणे ४ ते ६ इंच (१ ते १५ सें.मी.) खोलीच्या ४५ सें.मी. अंतरावर उताराच्या आडव्या दिशेने सऱ्या तयार करुन ठेवाव्यात. त्यामुळे पावसाचा प्रत्येक थेंब न थेंब स-यामध्ये संचित करता येतो.

पूर्वमशागत

जमिनीची लोखंडी नांगराने १५ सें.मी. पर्यंत खोल नांगरट करावी व जमीन उन्हाळ्यात तापू द्यावी. जमीन चांगली तापल्यानंतर, कुळवाच्या दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. शेवटच्या कुळवणी अगोदर हेक्टरी ५ टन शेणखत किंवा २.५ टन गांडूळ खत शेतात पसरवून टाकावे, म्हणजे कुळवणी बरोबर ते जमिनीत समप्रमाणात मिसळले जाते.

पेरणीची वेळ

बाजरीची पेरणी १५ जून ते १५ जुलै या दरम्यान केल्यास उत्पादन अधिक मिळते. खरीप हंगामात पर्जन्यवृष्टी उशिरा झाल्यास पेरणी ३० जुलैपर्यंत करण्यास हरकत नाही. बाजरी पिकाची पेरणी साधारणत: ३० जुलैपर्यंत केल्यास उत्पादनात सरासरी १० टक्के घट येण्याची शक्यता असते.

सुधारीत व संकरित जाती

बाजरीच्या सुधारित व संकरित वाणांची जमिनीच्या मगदुराप्रमाणे, नैसर्गिक हवामान व पाऊस यांचा एकत्रित विचार करुन निवड करावी. हलक्या जमिनीत व कमी आणि अनियमित पावसाच्या क्षेत्रात सुधारित वाणांची लागवड करावी. मध्यम जमिनीत व समाधानकारक पर्जन्यमान विभागात संकरित वाण जास्त उत्पादन देऊ शकतात.

बियाणे आणि बीजप्रक्रिया

पेरणीसाठी हेक्टरी ३ ते ४ किलो चांगले निरोगी बियाणे वापरावे. अरगट आणि गोसावी रोगाच्या नियंत्रणासाठी बीजप्रक्रिया केलेले प्रमाणित बियाणे वापरावे.

अ) २० टक्के मिठाच्या द्रावणाची बीजप्रक्रिया (अरगट रोगासाठी) करावी. बीजप्रक्रिया केलेले प्रमाणित बियाणे उपलब्ध नसल्यास पेरणीपूर्वी बियाण्यास २० टक्के मिठाच्या द्रावणाची प्रक्रिया करावी. त्यासाठी १ लिटर पाण्यात २ किलो मिठ विरघळावे. पाण्यावर तरंगणारे बुरशीयुक्त हलके बियाणे बाजूला काढून त्याचा नाश करावा व तळाला असलेले निरोगी आणि वजनाने जड असलेले बियाणे वेगळे करुन पाण्याने २ ते ३

ब) मेटॅलॅक्झील ३५ एसडी याची बीजप्रक्रिया (गोसावी रोगासाठी) पेरणीपूर्वी बियाण्यास ६ गॅम मेटॅलॅक्झील ३५ एसडी प्रति किलो बियाण्यास चोळून नंतर पेरणी करावी.

क) अझोस्पिरीलम व स्फुरद विरघळविणारे जिवाणू संवर्धनाची बीजप्रक्रिया २५ ग्रॅम अझोस्पिरीलम प्रति किलो बियाण्यास चोळून पेरणी करावी. त्यामुळे २० ते २५ टक्के नत्र खताची बचत होऊन उत्पादनात १० टक्के वाढ होते. तसेच स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणूची २५ गॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी.

पेरणीची पध्दत

पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने करावी व दोन ओळीत ४५ सें.मी. आणि दोन रोपामध्ये १५ सें.मी. अंतर ठेवावे (हेक्टरी सुमारे १.५० लाख प्रोपे). पेरणी ३ ते ४ सें.मी. पेक्षा जास्त खोलीवर करु नये.

शेतमालाच्या उत्पादन खर्चात ७० टक्क्यांची वाढ; एमएसपी'तील वाढ काय कामाची

✔ **नागपूर** : केंद्र सरकारने सन २०२४-२५ च्या खरीप विपणन हंगामासाठी १४ पिकांची एमएसपी जाहीर केली. मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी ५ ते १० टक्क्यांची वाढ केली असली तरी उत्पादन खर्च किमान ७० टक्क्यांनी वाढला आहे. ही एमएसपी उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा जोडून दिल्याचे सरकारने स्पष्ट केले. कृषी निविष्ठांचे आकाशाला भिडलेले दर, वर्षागणिक घटत असलेले उत्पादन, सरकारी धोरणांमुळे दबावात राहणारे शेतमालाचे दर, शेतमाल खरेदीची कुचकामी ठरलेली सरकारी यंत्रणा विचारात घेता ही वाढ अत्यल्प ठरली आहे.

ए-टू-एफएल' या सूत्रानुसार काढलेल्या उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा जोडून ही एमएसपी जाहीर केल्याचा दावा सरकारने केला आहे. या सूत्रात शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांच्या मजुरीसह इतर महत्त्वाचे खर्च ग्राह्य धरले जात नाही. शिवाय, सर्व राज्यांमधील पिकांच्या उत्पादन खर्चाची सरासरी काढून विशिष्ट खर्च काढला जातो. ही एमएसपी सी-टू अधिक ५० टक्के नफा जोडून जाहीर करायला हवी होती. जैवविविधता विचारात घेता, प्रत्येक पिकाचा राज्य व जिल्हानिहाय उत्पादन खर्च व उत्पादकता वेगवेगळी आहे. त्यामुळे उत्पादन खर्च काढण्याची सरासरी पद्धती व त्याआधारे जाहीर केलेली एमएसपी शेतकऱ्यांच्या जिवावर उठली आहे.

सरकारी उत्पादन खर्च कमी

कापसाचा उत्पादन खर्च प्रतिक्विंटल किमान ११ हजार रुपये असला तरी केंद्र सरकारने ४,७४७ रुपये जाहीर केला आहे. सोयाबीनचा खर्च ५ हजार रुपयांच्या वर असताना सरकारने ३,२६१ रुपये, धानाचा खर्च किमान २,१०० रुपये असताना सरकारने १,५३३ रुपये जाहीर केला आहे. ही स्थिती इतर ११ शेतमालांची आहे.

जीएसटी, इंधन दरवाढीमुळे वाढलेला वाहतूक खर्च यासह अन्य बाबींमुळे कृषी निविष्ठांच्या दरात मागील १० वर्षांत सरासरी ७० टक्क्यांनी वाढ झाली. यावर्षी कापसाच्या एमएसपीत प्रतिक्विंटल ५०१ रुपये, सोयाबीन २९२, धान ११७, ज्वारी १९१ (हायब्रीड) व १९६ (मालदांडी), मका १३५, तुरीच्या एमएसपीत ५५० रुपयांची किरकोळ वाढ केली. इतर पिकांच्या एमएसपीतील वाढ अशीच आहे.

हवामानातील बदलांमुळे पर्जन्यमान व शेतमालाच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम झाला व होत आहे. रोग व किडींची प्रतिकारशक्ती वाढत असल्याने शेतमालाच्या नुकसानीची तीव्रता व उत्पादन खर्चही वाढत आहे. याकडे केंद्र सरकार दुर्लक्ष करीत आहे.

संक्षिप्त वृत्त

अपघातास निमंत्रण देणारा खड्डा बुजविला

उत्तर सोलापूर : उत्तर तालुक्यातील मार्डी ते बानेगाव रस्त्यात असणारा खड्डा मार्डी येथील लहुजी शक्ती सेनेच्या कार्यकर्त्यानी श्रमदानातून बुजविला आहे. मार्डी ते बाणेगाव रोड एका खासगी शाळे समोर खड्डा होता.या मुळे या - जा करणारे वाहन,शेतकरी, विद्यार्थी व ग्रामस्थांना त्रास होत होता.अनेक वेळा या खड्डयामुळे लहान अपघात झाला होता.गावाच्या विकासासाठी सामाजिक कर्तव्य म्हणून मार्डी येथील लहुजी शक्ती सेनेच्या वतीने श्रमदानातून अध्यक्ष सुरज देवकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल देवकुळे,रामेश्वर बोराडे, विकास बनसोडे,सेवालाल नगर मधील सहकारी यांनी खड्डा बुजविला आहे.

पिकविमा योजनेअंतर्गत एक रुपयात भरण्याचे कृषी विभागाचे आवाहन

पिलीव : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने खरीप हंगामातील पिकांसाठी प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत सर्व समावेशक पिक विमा योजना या योजनेअंतर्गत अतिवृष्टी, वादळ,पुर,पावसातील खंड,काढणीपशचात नुकसान या नैसर्गिक संकटापासून पिकांना संरक्षण यामध्ये फक्त एक रुपयात बाज री,मका,तुर,कापुस,उडीद,मुग,कांदा या पिकांसाठी ही विमा योजना आहे. यासाठी ओरिएंटल इस्नसुरन्स,या कंपनीच्या वतीने सदरचा विमा उतरविणयात येणार आहे. यासाठी ७,१२,८ अ,उतारा,आधार कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स, पिक पेरा स्वय घोषणापत्र ही कागदपत्रे आवश्यक आहेत. हा विमा जन सुविधा केंद्र व आपले सरकार केंद्र याठिकाणी भरणयाची सोय आहे. हा पिक विमा भरणयाचा अंतीम तारीख १५ जुलै आहे. याविषयी अधिक माहितीसाठी कृषी सहहयाक, कृषी पर्यवेक्षक, मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या पिक विमा योजनेत सहभागी होणयाचे आवाहन कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना करणयात आले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा रविवारी कामती येते युवा संवाद मेळावा

विरवडे(बु) : शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचा युवा संवाद मेळावा रविवारी दी २३ रोजी कामती बु ता मोहोळ येते होणार असल्याची माहिती आयोजक अड पवनकुमार गायकवाड (प्रदेश सरचिटणीस लिगल सेल) यांनी दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रर पवार या पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा युवा संवाद मेळावा रविवारी सायंकाळी ५वाजता कटरे मंगल कार्यालय कामती येते होणार आहे.युवकचे प्रदेशाध्यक्ष महबूब शेख ,जिल्हा अध्यक्ष बळीराम काका साठे,मोहोळ तालुका अध्यक्ष विनय पाटील,यांच्या प्रमुख उपस्तीतीत होणार आहे तर या मेळाव्याला महेश माने (सरचिटणीस सोलापूर जिल्हा),प्रमोद बाबर (युवा प्रदेश उपअध्यक्ष),गणेश पाटील (युवा जिल्हा अध्यक्ष),विशाल पाटोडा (जिल्हा अध्यक्ष लिगल सेल),योगेश दांडेकर बाबा जगाताप,हिंदुराव देशमुख,यांच्या विशेष उपस्तितीत हा मेळावा पार पडणार आहे अशी माहिती आयोजक ऍड पवनकुमार गायकवाड व विठोबा पुजारी यांनी दिली.

स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्टचे शिक्षणासाठी मोठे योगदान

वेळापूर : स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्टचे विधवा महिलांसाठी व गरीब होतकरू मुला मुलींच्या शिक्षणासाठी मोठे योगदान आहे, असे प्रतिपादन माळशिरस गट विकास अधिकारी मनोज राऊत यांनी व्यक्त केले. ते वेळापूर येथील इंद्रनील मंगल कार्यालय येथे स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने माळशिरस तालुक्यातील इयत्ता पाचवी ते बारावी मधील १०१६ गरीब विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माळशिरस गट विकास अधिकारी मनोज राऊत, कथा कथनकार जयवंत आवटे,स्व. रमेश बनकर चारिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा साधना बनकर, महिला व बालविकास अधिकारी आसमा आतार, बालाजी अल्लडवाड, नूतन विस्तार अधिकारी महामुनी मॅडम, डॉ. क्रांती देशमुख, मराठवाडा मित्र मंडळ पुण्याचे रमेश पंडित, प्रो सुनिता उपासने, निवृत्ती बनकर, कृष्णा माळी, नदाफ मॅडम व माळशिरस तालुक्यातून विद्यार्थी, शिक्षक, पालक आदी. प्रारंभी सावित्रीबाई फुले, स्व. रमेश बनकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच यावेळी स्व. रमेश बनकर चॅरिटेबल ट्रस्ट च्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा कृष्णा माळी, निवृत्ती बनकर, साधना बनकर, नदाफ मॅडम यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

मतांच्या राजकारणात काँग्रेस अन् भाजपने 'फायली'त दडवले सोलापूरचे उड्डाणपूल

- राजकारण्यांना केवळ विस्थापितांची काळजी
- मात्र वाहतूक समस्येसह शहराची डेव्हलमेंटचे वाटेना सोयरसूतक
- सत्तेच्या राजकारणात ८०० कोटींच्या उड्डाणपुलाची नऊ वर्षात साधी वीट चढेना

सोलापूर/प्रतिनिधी

शहरातील दोन्ही उड्डाणपुलाचे उद्घाटन झाले मात्र तो प्रकल्प अद्याप सुरूही झाला नाही. याला भाजप आणि काँग्रेसने केलेल्या सत्ताकारणाने या ८०० कोटींच्या पुलाच्या कोनशिलेचा शुभारंभ झाला मात्र ९ वर्षात साधी एक वीट सुद्धा रचली गेली नाही. श्रेयवाद आणि मतांचे राजकारण यामुळे सोलापूर सारख्या शहराचा विकासमात्र रखडलेलाच राहिला.

दरम्यान, उड्डाण पूलांच्या उभारणीदरम्यान शहरातील संबंधित मिळकतदारांच्या जागा भूसंपादित होणार आहेत. काहीजण विस्थापित होणार आहेत. या संबंधितांची काळजी मतांवर आणि महापालिकेतील सत्तेवर डोळा असणाऱ्या काँग्रेस आणि भाजप यांना आहे.

मात्र, उड्डाण पुलांमुळे शहरातील वाहतुकीचा प्रश्न कायमचा निकालात नियण्यासह शहरातील जी डेव्हलमेंट होणार आहे, त्याचे कसलेच सोयरसुतक काँग्रेस आणि भाजप यांना नाही हेच उड्डाण पूल उभारले जात नसल्याबद्दलचे खरेखुरे सत्य आहे. मतांच्या गोळाबेरजेचे राजकारण करण्याबरोबरच महापालिकेतील सत्ता जाऊ नये, यासाठी खुद्द भाजप आणि काँग्रेस या दोन्हींनी तब्बल ८०० कोटींचे उड्डाणपूलांचे दोन महत्त्वाकांक्षी प्रकल्प 'फायली'तच ठेवले आहेत.

केंद्रात २०१४ मध्ये भाजपची सत्ता आली. त्यानंतर भाजपाने स्मार्टसिटीची संकल्पना आणली. त्यात सोलापूरचा समावेश झाला. केंद्रीय रस्ते वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी जून २०१५ मध्ये सोलापूरसाठी जुना पुना नाका ते पत्रकार भवन आणि जुना बोरामणी नाका ते पत्रकार भवन असे दोन ८०० कोटींचे उड्डाणपूल मंजूर केले. यामुळे शहराचे सौंदर्य वाढेल, शहराच्या विकासाला गती येईल असा समाज सोलापूरकरांचा झाला. मात्र शहरवासियांचा पुरता भ्रमनिरास झाला.

२०१७ मध्ये महापालिका निवडणुका होणार होत्या. पुलाचे काम सुरू झाले तर या प्रकल्पाचे श्रेय भाजपला जाईल आणि आपल्याला फटका बसेल सुरूवातीला उड्डाणपुलाला काँग्रेसने विरोध केला. दुसरीकडे या पुलामुळे भागवत टॉकीजपासून ते पत्रकार भवनपर्यंतच्या अनेक मिळकती बाधित होणार होत्या. त्याला मिळकतदारांनी विरोध केला होता.

ऐन महापालिका निवडणुकीत त्यांची नाराजी ओढावून घेऊ नये म्हणून भाजपाने महापालिका निवडणुका होईपर्यंत याच्या पाठपुराव्यासाठी काही खास प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे पुलाचे काम रखडले गेले.

निवडुकीनंतर बाधित घरापोटी होणाऱ्या भूसंपादनासाठी आवश्यक असलेले २२९ कोटी त्यावेळच्या भाजप सरकारने मंजूर केले. त्यातील ४१ कोटी रुपये महापालिकेला प्राप्तही झाले. मात्र उर्वरित रक्कम महापालिकेला स्वत:च्या हिश्शातून भरावयाची होती. मात्र महापालिकेकडे पैसे नसल्याने भूसंपादन रखडले. या उड्डाणपुलासाठी आणि त्याच्या निधीसाठी बैठकावर बैठकाच झाल्या, ठोस निर्णय मात्र काहीच झाला नाही.

२०१९ मध्ये राज्यातील सत्तेत बदल झाला. महाआघाडी सरकारने भाजपाच्या सर्व योजनांना ब्रेक लावण्यास सुरूवात केली. त्याचा फटका सोलापूरलाही बसला. उड्डाणपुलासाठी प्रस्तावित केलेल्या एक हजार कोटी रुपयांपैकी १५ टक्के रक्कम खर्च केली तरी शहरात रिंगरुट तयार होतील, असा दावा करत काँग्रेसने पुन्हा या उड्डाणपुलाला विरोध करत शहराच्या बाहेरून रिंगरूट मार्ग करावा, असा आग्रह धरला. त्यामुळे उड्डाणपुलाचा विषय बाजुला पडला.

२०२२ मध्ये महाआघाडी सरकार जाऊन पुन्हा भाजप आणि सेनेचे सरकार सत्तेत आल्यावर या उड्डाणपुलाच्या कामाला सुरूवात होईल असे वाटत होते. मात्र तेथेही शहरवासियांचा भ्रमनिरास झाला. केंद्रीय वाहतूक मंत्री गडकरी यांनी हा पूल होणारच असे ठामपणे सांगितले. मात्र त्यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करण्यास शहरातील आमदार आणि खासदार कमी पडले.

अनेक नामवंत उद्योजकाही विरोध

या दोन उड्डाणपुलांच्या कामात जवळपास ५०० हून अधिक मिळकती बाधित होणार आहेत. यात नामवंत उद्योजकांच्या मिळकतींचा समावेश आहे. त्याची मोजणीही झाली आहे. काहींनी त्याला थेट विरोधच केला. त्याशिवाय शहरातील इतर उद्योजक आणि व्यापाऱ्यांमध्ये मतभेद पाहायला आहेत. महापालिका आणि नगर भूमापन कार्यालयाने मोजणी केल्यानंतर बऱ्याच जणांनी त्यावर हरकती नोंदविल्या आहेत. या हरकतींवर सुनावणी तर होईलच, पण त्याशिवाय उड्डाणपूल नको म्हणून दबाव गटही तयार केला जात आहे.

पडद्यामागचे राजकारण

सोलापुरात विमानसेवा तातडीने हवी, यावर सर्व उद्योजकांचे एकमत आहे. उड्डाणपुलाबद्दल बोलताना उद्योजक बोलताना दिसत नाहीत ✻ उड्डाणपूल नको म्हणणारे व्यापारी हे काँग्रेस नेत्यांच्या जवळचे असल्याचा आरोप भाजपचे नेते करतात ✻ काँग्रेस नेत्यांकडून या आरोपाचे खंडन केले जाते ✻ उड्डाणपुलाच्या भूसंपादन विरोधात उद्योजक न्यायालयात गेले तर हा प्रकल्प रखडू शकतो. त्यातून या प्रकल्पाची किंमत वाढू शकते ✻ न्यायालयात जाण्यासाठी एक गट तयार केला जात आहे.

'श्री मार्कंडेय'च्या उपाध्यक्षपदी विडप यांची निवड

सोलापूर : मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाचे उपाध्यक्षपदी हमेश श्रीहरी विडप यांची निवड करण्यात आले. यावेळी उमेश पतार- सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखताली निवड झाली.

सोलापूर/प्रतिनिधी

येथील श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाचे उपाध्यक्ष पदी हमेश श्रीहरी विडप यांची निवड करण्यात आले. यावेळी उमेश पतार - सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सोलापूर यांव्या अध्यक्षतेखताली निवड झाली.

रुगणालयाचे नूतन उपाध्यक्ष पदी यांची निवडीबद्दल प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली, डॉ. विजयकुमार अलवसर्वसंचालक मंडळाचे आभार मानले.

रुग्णालयचे चेअरमन डॉ. विजयकुमार अरकाल, माजी व्हा. चेअरमन श्रीनिवास कुमटम्यांनी उपाध्यक्ष पदी निवडीबहल शुभेच्छा देऊन अभिनंदनपर भाषण केले तसेत उमेश पवार-सहारयक निबंधक, सहकारी संस्था, यांचे आभार मानले.

याप्रसंगी रुग्णालयाते डॉ. माणिक गुरम, विनायक कोंड्याल, अशोक आडम, मनोहर अन्नलदास, पार्वतव्या श्रीराम, राजेशम् येमूल, इरेशम् कोंपेल्ली, सुरेश फतमारी, सुधाकर गुंडेली,आनंद चंदनशिवे, श्रीधर बोल्ली, माधवी चिटयाल तसेव प्रशासकीय अधिकारी स्वामी आकेनि इ.उपस्थित होते.

अकलूज : नूतन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचा सत्कार करताना नामदेव वाघमारे, दत्तात्रय पवार, अण्णा कुलकर्णी व इतर शिवसैनिक दिसत आहेत.

अकलूजला धैर्यशील मोहिते-पाटलांचा सत्कार

नातेपुते/प्रतिनिधी

अकलूज शहर व परिसरातील राजकीय, सामाजिक सलोख्याचे वातावरण कायम राहील. विकासासाठी आपण सर्वजण एकच आहोत. अशी कृतज्ञतेची भावना नूतन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केली. शिवसेना माळशिरस तालुका यांच्यावतीने अकलूज येथील शिवसेना कार्यालयात नूतन खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांचा सत्कार जिल्हा उपप्रमुख नामदेव वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते दत्तात्रय पवार ,अण्णासाहेब कुलकर्णी ,तालुकाप्रमुख संतोष, ॲड .वीरेंद्र वाघमारे ,इंगळे व इतर शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत मोहिते पाटील कुटुंबाने भाजपचा त्याग करून राष्ट्रवादी (शरद पवार) गटातर्फे लोकसभेची निवडणूक लढवली होती.

'आषाढी'त भाविकांच्या सुविधेला प्राधान्य द्यावे : जेवळीकर

पंढरपूर/प्रतिनिधी

आषाढी यात्रा कालावधी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी पालखी सोहळ्यासोबत राज्यातील विविध जिल्ह्यातून तसेच इतर राज्यांतून लाखो वारकरी भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या वारकरी भाविकांच्या आरोग्य सुविधेसह स्वच्छतेला प्राधान्य देवून आवश्यक उपाययोजना कराव्यात तसेच अत्यावश्यक सुविधांची कामे ३० जून पर्यंत पुर्ण करावीत अशा सुचना नगर विकास विभागाचे उपसचिव तथा समन्वय अधिकारी अनिरुध्द जेवळीकर यांनी दिल्या.

आषाढी यात्रा पुर्वतयारी नियोजन व सुविधांबाबत श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्त निवास पंढरपूर येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बैठकीस नगर विकास विभागाचे कार्यासन अधिकारी तथा समन्वय अधिकारी वी.ना. धाईंजे, प्रांताधिकारी सचिन इतापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले,

महापालिकेचे उपायुक्त आशिष लोकरे,तहसीलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, महावितरणचे कार्यकारी अभियंता विजय पाटील, सां.बा. विभागाचे कार्यकारी अभियंता अमित जिंबकर यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी नगर विकास विभागाचे उपसचिव तथा समन्वय अधिकारी जेवळीकर म्हणाले, आषाढी वारी सोहळा यशस्वी होण्यासाठी संबंधित शासकीय यंत्रणांनी परस्परात योग्य समन्वय ठेवून दिलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. नगरपालिकेने भक्ती सागर (६५ एकर) येथील मुरमीकरण करणे काटेरी झाडे झुडपे काढणे, टॉयलेट स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची मुबलक व्यवस्था आदी करावित यावी तसेच ६५ एकर येथील वाहन तळावर चिखल होऊ नये यासाठी तात्काळ मुरमीकरण करावे. शहरातील अतिक्रमणे धोकादायक इमारतीबाबत तात्काळ कार्यवाही करावी मोकाट जनावरे भटके कुत्रे यांचा बंदोबस्त करावा.शहरातील असणाऱ्या सुलभ शौचालय येथे वारकरी भाविकांना विनामूल्य सुविधा द्यावी. सुलभ शौचालय भाविकांसाठी मोफत राहील याची दक्षता घ्यावी. ६५ एकर पासून शेगाव दुमाला कडे जाणारा रस्ता तात्काळ दुरुस्त करावा.

आषाढी पूर्वीची कामे ३० जून पर्यंत करण्याची डेटलाईन

निधन वृत्त

शांताबाई हचडे

अक्कलकोट : तालुक्यातील हंजगी येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन आदरणीय गुरुबसप्पा आनंदप्पा हचडे यांची धर्मपत्नी कै शांताबाई गुरुबसप्पा हचडे (वय ६२) अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना व नातवंडे असा परिवार आहे.त्यांच्या पार्थिवावर आज दुपारी हंजगी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

अजय मोरे

सोलापूर : महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे सेवानिवृत्त कर्मचारी व मनोरमा बँक विजापूर रोड शाखेचे शाखाधिकारी अजय रमेश मोरे यांचे वडिल श्री रमेश सुखदेव मोरे यांचे वृद्धपकाळाने शुक्रवार रोजी निधन झाले, मृत्यू समयी त्यांचे वय ७८ वर्ष होते, त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

आतुरता बाप्पाच्या आगमनाची... लगबग मूर्तीकारांची..!

मूर्ती बनविण्याच्या खर्चात ३० टक्के वाढ तर मूर्तीला देण्यात येणाऱ्या रंगांमध्येसुद्धा २५-३० टक्के वाढ

सोलापूर/प्रतिनिधी

गणेशोत्सव जवळ येत आहे, तसतशी मूर्तिकारांची लगबग वाढली आहे. सोलापूर येथे अनेक कुटुंब पिढ्यानपिढ्या गणेशमूर्ती बनविण्याचा व्यवसाय करतात. त्यांची उत्सवाच्या अगोदर चार ते पाच महिन्यांपासून तयारी चालू असते. त्यासाठी त्यांनी प्लास्टर ऑफ पॅरिस व शाडुच्या मातीच्या कच्च्या मूर्ती घरच्या कारखान्यात बनवल्या आहेत. तर काही गणेशमूर्ती इतर या ठिकाणावरून आणल्या.

कोरोना काळात सण-उत्सव साजरे करण्यास निर्बंध असल्याने मूर्तींना मागणी नव्हती. मात्र यंदा सण समारंभ मोठ्या उत्साहाने धुमधडाक्यात साजरे होणार असल्याने साहजिकच मूर्तींची मागणी वाढलेली आहे. १५० रुपयांपासून ते १५ हजार रुपयांपर्यंतच्या येथे मूर्ती विकत मिळतात. मूर्ती बनविण्याच्या खर्चात ३० टक्के वाढ झाली असून मूर्तीला देण्यात येणाऱ्या रंगांमध्येसुद्धा २५-३० टक्के वाढ झाली असल्याचे गणपती बनवणारे कारागीर आकाश कुंभार यांनी सांगितले. कुंभार हे जवळच असणाऱ्या त्यांच्या शेतामध्ये काम करतात व आपल्या कामाच्या व्यतिरिक्त उरलेल्या वेळात हा व्यवसाय करतात. व्यवसायात त्यांना त्यांची पत्नी व मुली मदत करतात. तालुक्यातील व जिल्ह्यातील अनेक गणेश मंडळाच्या मूर्तींची मागणी त्यांच्याकडे असते. सहा इंच ते सहा फुटांपर्यंतच्या मूर्ती ते बनवतात. त्यामध्ये मुख्यतः दगडूशेठ हलवाई, लालबागचा राजा, मयुरेश्वर असे विविध प्रकार असतात. गणेश चतुर्थी अवघ्या काही दिवसांवर आली असल्याने मूर्तींवर शेवटचा हात फिरवण्यासाठी मूर्तीकारांची लगबग सुरू आहे.

> गणरायाचे आगमन जवळ येत असल्याने गणेशमूर्ती बनवण्याची लगबग सुरू आहे. मूर्तींवर शेवटचा हात फिरवण्याचे काम चालू आहे. गणपतींना आम्ही जास्तीत जास्त पर्यावरण पूरक रंग देण्याचा प्रयत्न करतो.
>
> -आकाश कुंभार,
> गणेश मूर्तिकार, सोलापूर

कांद्याच्या गाड्यांमुळे बाजार समितीमधील वाहतुकीची कोंडी फुटणे अशक्यच

- वाहतूक समस्येचे यंदा कांद्याच्या सिझनमध्ये पुन्हा वांदेच
- वाहतुकीची कोंडी फोडता फोडता पुश्नच होणार दमछाक
- कांदा लिलाव दोड्डीला हलविण्याच्या निर्णयाचे भिजत घोंगडे कायमच

सोलापूर/प्रतिनिधी

संग्रहित छायाचित्र

महाराष्ट्रात नाशिक जिल्ह्यातील लासलगावनंतर सोलापूरच्या बाजार समितीचा कांद्याच्या लिलावाबाबत नंबर लागतो. या बाजार समितीत कांद्याच्या सिझनला प्रचंड कांदा विक्रीसाठी येतो. साधारण ४ हजाराहून अधिक वाहनं कांद्यांची येतात. बाजार समितीत जिकडं बघेल तिकडं कांदा आणि वाहनं हीच परिस्थिती दिसते. त्यामुळे बाजार समितीत वाहतुकीची प्रचंड कोंडी होते. लिलाव होण्याला दोन-तीन दिवस लागतात असेच चित्र गेल्या वर्षी कांदा शिजनवेळी दिसले. यामध्ये अडतदार, सुरक्षारक्षक, व्यापारी, शेतकरी या सगळ्यांचीच दमछाक झाली. यंदाच्या शिजनला हे चित्र बदलण्यासाठी हालचाली झाल्या होत्या.

दरम्यान, या हालचालीतून प्रत्यक्ष परिणाम शुन्य झाला असाच सध्या तरी अन्वयार्थ काढता येईल. कारण सोलापूर बाजार समितीच्या दोड्डी इथल्या जागेत कांद्याचे लिलाल नेण्याची प्रत्यक्ष कार्यवाही होईल अशी स्थिती नाही. कांद्यांच्या गाड्यांमुळे बाजार समितीमधील वाहतुकीची कोंडी फुटणे अशक्यच दिसत आहे. वाहातूक समस्येचे यंदा कांद्याच्या शिजणमध्ये पुन्हा वांदेच राहणार आहे. वाहतुकीची कोंडी फोडता फोडता पुन्हा तीच हादमछाक होईल. कांदा लिलाव दोड्डीला हलविण्याच्या निर्णयाचे भिजत घोंगडे कायमच राहणार असे दिसते.

कांदाच्या हंगामात कांदा लिलावासाठी जागा कमी पडत असून कमीत कमी ५० एकर जागा हवी आहे, असा प्रस्ताव शासनाला पाठवून वर्ष होत आले अजूनही उत्तर न आल्याने पुन्हा कांदा उत्पादक शेतकरी, आडतदार व व्यापारी यांची जागे अभावी पंचाईत होणार आहे.

सन २००३ ते २००५ दरम्यान वायणारी प्रकल्पासाठी दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोड्डी येथे सात एकर जागा बाजार समितीतर्फे घेण्यात आली होती. दोन एकर मधून रस्ता गेला आणि पाच एकर शिल्लक जागा राहिली. या जागेचा वापर नसल्याने ती पडून आहे. कांद्याच्या हंगामात सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रासह शेजारच्या आंध्रप्रदेश आणि कर्नाटकातून मोठ्या प्रमाणात कांद्याची आवक होते. लिलाव व साठवणूक करण्यासाठी मोठी अडचण होते म्हणून कांद्याच्या लिलावासाठी कमीत कमी २५ ते ५० एकर जागा हवी आहे.

या बाजार समितीची कोट्यवधी रुपयांची वार्षिक उलाढाल होत असताना जागा उपलब्ध करुन देण्याबद्दल शासन शांत का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वार्षिक करोडो रूपाची उलाढाल होत आहे.आर्थिक स्थिती मजबूत असताना केवळ संचालक मंडळाची दुटप्पी भूमिका,पाठपुरावा करण्यास कमी पडत असंल्याने येणाऱ्या हंगामात तरी आडते,व्यापारी, कांदा उत्पादक शेतकऱ्याचा प्रश्न अनुत्तरीतच राहणार आहे. पाच गोदामे असून दयनीय अवस्था आहे. ११५०० मेट्रिक टन साठवणूक क्षमता असली तरी देखील बाहेरच माल ठेवल्याने चोरीचे प्रमाणात वाढ होत आहे.

> एप्रिल २३ मध्ये घेण्यात आलेल्या बैठकीत २५ ते ५० एकर जागा शासनाच्या वतीने मिळावी म्हणून राज्यस्तरीय कार्यालयास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.निवडणूक व इतर कारणास्तव प्रस्तावास विलंब होत आहे
>
> – **दत्तात्रय सुरवसे,** सचिव, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

लिलाव अन्यत्र हलविण्यामागील ठळक नोंदी

- मुळ संचालक मंडळाची दुटप्पी भूमिका
- संचालक मंडळाचा राज्याच्या पणन विभागाकडे कमी पडलेला पाठपुरावा
- काही अडतदार आणि व्यापाऱ्यांचा बाजार समिती सोडून कांद्याच्या खरेदी–विक्रीला इतरत्र जाण्याला विरोध
- सोलापूर बाजार समिती प्रशासनाचीदेखील अनस्था

जिल्ह्यात अबाल वृद्धांकडून प्राणायाम; योगासनांचा अभ्यास

शरीर, मनाच्या आरोग्यासाठी योगच उपयोगी

सोलापूर/प्रतिनिधी

दहाव्या जागतिक योग दिनानिमित्त केलेल्या प्रचारामुळे यंदा सोलापूर शहरासह जिल्ह्यात विविध ठिकाणी योगासनांचा अभ्यास करण्यात आला. अबालवृद्धांनी सहभाग घेत कपालभातीसह वज्रासनही केली. शरीर व मनाच्या आरोग्यासाठी योगच उपयोगी असल्याचे अधोरेखित करण्यात आले.

अक्कलकोट : जागतिक योग दिनानिमित्त अक्कलकोटमध्ये आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी योगशिबिरात सहभाग नोंदविला.

सेवासदन प्रशाला

सोलापूर : बालवर्ग, प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी योग प्रात्यक्षिके केली. प्रमुख पाहुण्या हर्षदा दाते, सेवासदन संस्थेच्या सचिवा वीणा पतकी, धनश्री कुलकर्णी यांच्या हस्ते सरस्वती पूजन झाले. योगसाधना मंडळातर्फे विविध योग प्रकार करण्यात आले. मंडळाच्या अध्यक्षा रोहिणी उपळाईकर, कार्याध्यक्ष नागनाथ पाटील, मुख्य कार्यकारी सदस्य रमेश सोनी, सचिवा धनश्री कुलकर्णी, खजिनदार उमा झिंगाडे, अनिता मोहिते, सविता देशमुख, उषा दस्तूरकर, भाग्यश्री चेळेकर, धनश्री मोरे, मनीषा औरंगाबादकर, शहनाझ चामडीया, सुवर्णा चौगुले यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व शिक्षक, विद्यार्थिनी यांनी प्रात्यक्षिके केली. कार्यक्रमासाठी ज्ञानेश्वर काळे यांनी परिश्रम घेतले. सेवासदनच्या सचिव वीणा पतकी, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य सतीश कुलकर्णी, माध्यमिक विभागप्रमुख राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापक नंदिनी बारभाई, पर्यवेक्षक स्वाती पोतदार, प्राथमिक विभाग विभाग प्रमुख संजीवनी नगरकर, बालवर्ग विभागप्रमुख संगीता आपटे उपस्थित होते. सूत्रसंचालन दीपाली बोरसे यांनी केले.

समता मराठी विद्यालय

सोलापूर : मागास समाजसेवा मंडळ संचलित समता मराठी विद्यालयात जागतिक योग दिनानिमित्त बाल योगसन शिबीर पार पडले. पहिली ते चौथीमधील विद्यार्थ्यांकडून योगासने करून घेण्यात आली. मुख्याध्यापक जयवंत हाक्के यांच्या मार्गदर्शनाखाली योगाचे प्रात्यक्षिक मिनाक्षी राठोड, सुनिता पवार आणि चारूशिला म्हमाणे यांनी करून घेतले.

प्रास्तविक ज्योती रणसिंग यांनी तर सुत्रसंचालन समिना मुजावर यांनी केले. आभार गीता पवार यांनी मानले. कार्यक्रमात संतोष रजपूत, मिनाक्षी राठोड, कल्पना वायमारे, सुजाता डोंगरे, लता क्षीरसागर, रामराव चव्हाण, अनिल चव्हाण यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्कलकोटमध्ये योगदिनानिमित्त होम हवन

अक्कलकोट : विवेकानंद प्रतिष्ठान व पतंजली योग समिती यांच्या संयुक्त विद्यमानाने विठ्ठल मंदिर प्रांगण येथे होम हवन, भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन भाजपाचे ज्येष्ठ नेते मल्लिनाथ स्वामी यांच्याहस्ते झाले. यावेळी परमेश्वर जकापुरे, प्रभाकर मजगे, तालुकाध्यक्ष मोतीराम राठोड, शहराध्यक्ष शिवशरण जोजन, महेश हिंडोळे, रजाक सय्यद, अमर पाटील, मल्लिकार्जुन मसूती, राजशेखर हिप्परगी, सुरेश शटगार व योगशिक्षक कस्तुरी गुरव व परमेश्वर गुरव उपस्थित होते. विवेकानंद प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ.सचिन कल्याणशेट्टी यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमीत्त सर्वांना सुदृढ व उत्तम आरोग्य राखण्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिबिरास विलास कोरे, राजशेखर उबराणीकर, विजयकुमार पाटील, दयानंद बिडवे, डॉ. सतीश बिराजदार, मलकप्पा भरमशेट्टी, शिवानंद बिंदगे, विरेंद्र पाटील, राजेंद्र सुरवसे, विश्वनाथ देवरमनी, अंदूअण्णा कळके, संजय हारकुड, गुरूपादप्पा आळगी, नगरसेवक अंबण्णा चौगुले, कांतु धनशेट्टी, ऋतुराज उर्फ बंटी राठोड, नागराज कुंभार, अतिश पवार, सिद्धू माळी, अंकुश चौगुले, प्रकाश पाटील, निंगराज कोटनुर व प्रतिष्ठानचे पदाधिकारी व योगप्रेमी उपस्थित होते.जेष्ठ नागरिक, विद्यार्थी व महिला वर्ग यांनी शिबिराचा लाभ येतला. सूत्रसंचालन विद्याधर गुरव तर आभार चंद्रकांत दसले यांनी मानले.

कर्मयोगी माध्यमिक तारापूर

पंढरपूर : कर्मयोगी माध्यमिक विद्यालय तारापूर येथे जागतिक योग दिवस साजरा करण्यात आला. क्रीडा शिक्षक सत्यवान नकाते व मार्गदर्शक अभिमन्यु वाघ यांनी योगांची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करून येतली. विद्यार्थ्यांनीही उत्साहात ताडासन, वज्रासन, सर्वांगासन, त्रिकोणासन, धनुरासन आदी योगासने करुन दाखवली. भस्त्रिका प्राणायाम,भ्रामरी प्राणायाम, वज्रासन प्राणायाम, अनुलोम विलोम या प्राणायामांची प्रात्यक्षिके प्रात्यक्षिके वाघ यांनी करुन दाखवली. शिक्षकांनीही योगांची प्रात्यक्षिके केली.प्रशालेचे मुख्याध्यापक भानवसे, बिटकर, कदम, मोटे, वाघ, कुचेकर यांनी योगासने करुन घेण्यास मदत केली. आभारप्रदर्शन मोटे यांनी केले.

सोलापूर : योग शिक्षकाचा सत्कार करताना आमदार सुभाष देशमुख.

नियमित योगासन करावे : आ. देशमुख

सोलापूर/प्रतिनिधी

शारिरीक व मानसिक आरोग्यासाठी नियमितपणे प्राणायाम, योगानस करावे, असे आवाहन आ. सुभाष देशमुख यांनी केले.

आंतरराष्ट्रीय योगदिनानिमित्त लोकमंगल फाऊंडेशन व पतंजली योग समितीच्या संयुक्त विद्यमाने शहरातील एक महाविद्यालय व ६ शाळांमध्ये योगदिन साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज माध्यमिक महाविद्यालय येथील कार्यक्रमात आ. देशमुख यांनी विद्यार्थ्यांसमवेत योगासन केले. वसंतराव नाईक हायस्कूल, ज्ञानसंपदा हायस्कूल, जागृती विद्यामंदिर, दत्त प्रशाला, न.फु. कोठारी खमितकर प्रशाला, जय जवान जय किसान मुलांची सैनिकी शाळा व तुकडोजी महाराज माध्यमिक महाविद्यालयामध्ये योगदिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात २३०० विद्यार्थी, विद्यार्थीनींनी प्रात्यक्षिक केले.

नर्मदा डांगे, अनुराधा खारे, श्रध्दा पाटील, शितल डांबरे, सविता गुडद, शांता बागलकोटी, सुशीला नाळे, नर्मदा डिग्गे, शामल घोंगडे, सविता हावगोळ, संगीता उमरजीकर या योग शिक्षिकांनी विद्यार्थ्यांकडून योगासन प्रात्यक्षिक करून येतली.

कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

पंढरपूर सिंहगड

पंढरपूर : कोर्टी (ता. पंढरपूर) येथील एस.के.एन सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये प्राचार्य डॉ. कैलाश करांडे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम झाला. योग शिक्षक दत्तात्रय राजभोज यांनी योगाचे महत्त्व व प्रकार समजावून सांगितले. कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक शिक्षक प्रा. चंद्रकांत देशमुख यांच्या नियोजनाखाली पार पडला. दत्तात्रय राजभोज यांचे उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी यांचे हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. उपप्राचार्य डॉ. स्वानंद कुलकर्णी, डॉ. चेतन पिसे, डॉ. श्रीगणेश कदम, डॉ. दिपक गानमोटे आदींसह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिकेत्तर कर्मचारीवर्ग सहभागी झाले होते.

न्यू हायस्कुल सलगरवाडी

उत्तर सोलापूर : सलगर वाडी (ता. उत्तर सोलापूर) डोणगाव रोड येथील न्यू हायस्कूल सलगरवाडी, सौ ऊज्वलाताई सुशीलकुमार शिंदे प्राथमिक शाळा सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशालेत कार्यक्रम झाला. महेश तांबुळकर यांनी योग प्रात्यक्षिके करून दाखवली. विद्यार्थ्यांकडून व शिक्षकाकडून योग प्रात्यक्षिक करून येतले. मुख्याध्यापक कार्तिक चव्हाण, राहुल पोटफोडे, गोपाळ नंदनगी, प्रकाश पवार,नंदकुमार व्हनमोरे, मिराकोर, वडते, जीतेश चव्हाण यांच्यसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

न्यू हायस्कूल कनिष्ठ महाविद्यालय, वडाळा

उत्तर सोलापूर : वडाळा (ता. उत्तर सोलापूर) येथील न्यू हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात प्राचार्या वैशाली साठे ,पर्यवेक्षक प्रा.पी.आर. पाटील, संदीप सोनटक्के यांनी योगासान आणि प्राणायामचे फायदे पटवून दिले. दहावीतील विद्यार्थिनी तृष्णा फंड,आर्या साठे, अदिती दराडे, विशाखा भोसले यांनी योगासने आणि प्राणायामाची विविध प्रात्यक्षिक करून दाखवत विद्यार्थ्यांकडून करून येतली. शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही प्राणायाम, योगासने केली.

१,२३६ जणांचे नशिब फळाला; खाकी वर्दी चढणार अंगावर

सोलापूर/प्रतिनिधी

सोलापुरात सुरु असलेल्या शहर पोलिस आयुक्तालकडील पोलीस भरतीत १,२३६ जणांचे नशीब फळाला आले. या संबंधितांच्या अंगावर 'खाकी वर्दी'चा साज चढणार आहे. भरतीदरम्यान २०३ जणांना अपयश आले.

पोलीस आयुक्तालय कार्यालय सोलापूर शहर चे अस्थापनावर पोलीस शिपाईसाठी ३२ पद व पोलीस चालक पदासाठी १६ पद असे एकूण ४८ पदासाठी भरतीकरीता २३३० ऐवढे उमेदवाराचे अर्ज प्राप्त झाले होते. पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ च्या अनुषंगाने पुरूष, महिला, माजी सैनिक यांची शारीरीक चाचणीची प्रकिया दि.१९ ते २१ जून पर्यंत झाली. घेण्यात आली. सदर शारीरीक चाचणी बोलवण्यात आलेले एकूण उमेदवार १८२६, प्रत्यक्षात हजर ११०२, एकूण पात्र उमेदवार ९७७ व तर अपात्र १२५ होते. ४७४ महिला उमेदवारांना बोलावले होते. प्रत्यक्षात ३१७ आले तर २४१ जण पात्र ठरले. माजी सैनिक ३० पैकी होते. २० जण आले तर पात्र १७ ठरले होते.

सोलापूर : उमेदवारांची शारिरीक तपासणी करताना पोलिस अधिकारी.

ही पोलीस भरती संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी वेगवेगळ्या पदासाठी घेण्यात आली. एखादा उमेदवार यांना दि. १९ जून ते दि २१ जून रोजी दरम्यान पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर येथे घेण्यात आलेल्या शारीरीक चाचणी च्या प्रकियेस हजर राहू शकला नाही. अशा उमेदवारास पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर यांचे वतीने दि. २५ जून रोजी सकाळी ०६.०० वाजल्यापासुन शारीरीक चाचणी प्रक्रियेची संधी उमेदवारास देण्यात आली आहे.

दि. १९ जून ते दि २१ जून रोजी दरम्यान उमेदवार शासकीय नोकरी प्रक्रियेकरीता इतर घटकांमध्ये हजर राहिला असेल तेथील हजेरी नोंदीचा पुरावा सादर करुन दि. २५ जून रोजी सकाळी ०६.०० वाजता पोलीस मुख्यालय सोलापूर शहर, येथे शारिरीक चाचणी प्रक्रियेस हजर राहु शकतात, असे आवाहन मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांनी केले आहे.

गर्दभ सजली अन् झिंगाट पळाली...!

सोलापूर/प्रतिनिधी

कारहुणवीनिमित्त सोलापूर शहरात मोची समाजाकडून गर्दभांना रंगवून त्यांची मिरवणुक काढण्यात आली.

पाठीवर विटांचे मातीचे ओझे वाहून नेणारा गर्दभ वर्षभर न थकता काम करत असतो. शुक्रवारी (दि.२१) कारहुणवीनिमित्त सर्व गर्दभांना आंघोळ घालण्यात आली. मोची समाजाकडून गर्दभांना त्यांच्या पाठीवर नक्षीकाम केलेले ठिपके, शिंगांना बेगड, बाशिंग, गळ्यात कवड्या आणि घुंगरांच्या माळा आदींनी सजवण्यात आले. त्यानंतर आरती करून करुन पुरण पोळी आणि भात आदींचा गोड-धोड नैवेद्य दाखवण्यात आला. सायंकाळी मिरवणुक काढण्यात आली.

आता गर्दभांना चार महिने आराम

सध्या पावसाळा सुरू झालेला आहे. पावसात बांधकामे बंद असल्याने गर्दभांना चार महिने आराम दिला जातो. गर्दभांना बांधकाम व वीटभट्टीचे काम लावले जात नाही. त्यामुळे त्यांना मोकळे सोडले जाते, असे मोची समाजाच्या वतीने सांगण्यात आले.

सोलापूर : कारहुणवी निमित्त रंगवण्यात आलेले गर्दभ.

शिंदे पिता-कन्येचा 'हात' ज्याच्या पाठीशी 'तो' दक्षिण काँग्रेसच्या उमेदवारीचा सिंकदर

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

सोलापूर लोकसभेच्या निवडणुकीत प्रणिती शिंदे यांच्या रुपाने विजयाचा गुलाल उधळण्याचं ऐतिहासिक अहोभाग्य काँग्रेसेजणांच्या नशिबी आलं. दोन निवडणुका पराभवाची धूळ चाखतानाच नामुष्कीजनक पराभवाला सामोरे जातानाच मस्तवाल , अहंकारी भाजपचा त्रास सोसलेल्या काँग्रेसवाल्यांनी या खेपेच्या निवडणुकीत पराभवाचा वचपा काढला. आपल्या पक्षाच्या उमेदवाराचा विजय झाल्यानं वेगळा हुरुप आलेल्या काँग्रेसवाल्यांचा आत्मविश्वास वाढला. याच आत्मविश्वासाच्या जोरावर सोलापूर दक्षिणच्या विधानसभेच्या आखाड्यात काँग्रेसचा 'हात' ऊर्जावान आणि विजयी ठरण्यासाठी काँग्रेसवाले सज्ज होताहेत. तथापि, पक्षाचे गॉडफादर सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे यांचा 'हात' ज्या इच्छुकाच्या पाठिशी असेल तोच काँग्रेसच्या उमदेवारीचा सिंकदर असणार हे निश्चित आहे.


सुशीलकुमार शिंदे

प्रणिती शिंदे

दिलीप माने

सुरेश हसापुरे

महादेव कोगनुरे

- हसापुरे अन् कोगनुरेंना वळसा घालून माने कसे मिळविणार आमदारकीचे सिंहासन
- उमदेवारीसंबंधी कोणाची समजूत कशी निघणार?
- विधानसभेला कोणाला रोखताना कोणाला पुनर्वसनाचा कोणता मिळणार शब्द?

दरम्यान निवडणूक लढविण्याच्या सर्वच आघाड्यांवरील कसोटीत माजी आमदार दिलीप माने यांचे इतर इच्छुकांच्या तुलनेत पारडे जड आहे, असं मानलं जातं. त्यातून माने हे अन्य इच्छुकांच्या तुलनेत उमेदवारी देण्याच्या पातळीवर उजवे ठरताहेत अशीही चर्चा आहे.

वास्तविक काँग्रेसमध्ये प्रवेश करताना दक्षिण सोलापूर विधानसभेची उमेदवारी देण्याबद्दल माने यांना शब्द दिला आहे का? यासंदर्भात कोणतीच माहिती किंवा तडजोड पुढे आलेली नाही. शिवाय माने यांनी काँग्रेसच्या श्रेष्ठींकडून त्या वेळी दक्षिणच्या उमेदवारीचा शब्द घेतला आहे का, हेदेखील त्यांच्याकडून गुपित ठेवण्यात आलंय. त्याहूनही महत्त्वाचं म्हणजे शिंदे पिता-कन्येकडूनदेखील माने यांना आमदारकीचं तिकीट देण्याबद्दल कोणतेच सुतोवाच अद्याप तरी मिळालेले नाहीत. त्यामुळे माने यांनाच काँग्रेसकडून विधानसभेचं तिकीट मिळणार हे ठासून कोण सांगणार, हा मुद्दा महत्त्वाचा आहे.

मात्र आमदारकीसह महत्त्वाच्या पदांपासून दूर राहावे लागलेल्या दिलीप माने यांना कोणत्याही परिस्थितीत दक्षिणच्या आमदारकीचं सिंहासन मिळवायचं असावं. कारण त्यासाठी या मतदार संघात त्यांचं काम सुरु आहे.लोकसभा निवडणुकीवेळी त्यांची या मतदार संघात रंगीत तालीम झाली. या निवडणुकीत त्यांच्या विधानसभा लढण्याचा गृहपाठ झाला असंही मानलं जातंय.

निवडणून येण्याची सर्वच आघाड्यांवरची दिलीप माने यांची क्षमता लक्षात येता, काँग्रेसची उमेदवारी त्यांनाच देण्याच्या निर्णयापर्यंत श्रेष्ठी आल्यास या मतदार संघातून लढण्यासाठी गुडघ्याला बाशिंग बांधलेले काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे आणि सामाजिक कार्यकर्ते महादेव कोगनुरे यांचं काय? हा अत्यंत 'कळी' चा मुद्दा आहे. माने यांनी उमेदवारी द्यायचं नक्की करताना आणि दक्षिणच्या मतदार संघात विधानसभेच्या निवडणुकीसाठी हसापुरे अन् कोगनुरेंना क्रियाशील करताना काँग्रेसच्या श्रेष्ठींकडून त्यांची कशी समजूत काढली जाणार? या दोघांना कोणता शब्द दिला जाणार? दोघांचंही सन्मानाची पदं देऊन कसं पुनर्वसन केलं जाणार? याबद्दल खुद्द काँग्रेसमधील भल्याभल्यांना अंदाज लागेना झालाय.

...तर मानेंच्याबाबतीत श्रेष्ठींच्या मनात काय?

ऐन उमेदवारी देण्याच्या वेळी खूपच काही वेगळी परिस्थिती निर्माण झाली. दिलीप मानेंना उमेदवारी देताना अडचणी येऊ लागल्या तर मानेंच्यासंदर्भात काँग्रेस पक्ष पर्यायानं श्रेष्ठी काय तडजोडी करणार? काँग्रेस पक्षामधील बडं प्रस्थ असलेल्या या ऊर्जावान नेत्याचं पुनर्वसन तरी कसं करणार? आमदारकीच्या तोलामोलाचं अन्य पद तरी कोणतं देणार? याचं मोठं कोडं या श्रेष्ठींपुढं असणार आहे. मानेंना विधानसभेची उमेदवारी नाकारुन काँग्रेसला पर्यायानं शिंदे पिता-कन्येला परवाडणारं नाही. काँग्रेसाठी त्याहून प्रणिती शिंदे यांच्या भविष्यातील राजकीय वाटचालीसाठी मानेंची मदत ही लागणाच आहे. सोलापूर शहरमध्य विधानसभेचा सोलापूर शहरात असलेला भाग, दक्षिण सोलापूर आणि उत्तर सोलापूर अशा तिन्ही ठिकाणी मानेंचे वलय मोठे आहे. त्याचा विचार त्यांच्या विधानसभेच्या उमेदवारीवेळी काँग्रेसला, त्यापेक्षाही शिंदे पिता-कन्येला अधिक करावा लागणार आहे.

कोंगनुरेंबद्दलच्या प्रणितींच्या 'त्या' वक्तव्याचा अर्थ काय?

सामाजिक कार्यकर्ते महादेव कोगनुरे यांनी लोकसभा निवडणुकीच्या धामधूमीत सुशीलकुमार आणि प्रणिती शिंदेंच्या नेतृत्वाखाली काँग्रेसमध्ये प्रवेश केला. प्रणितींचं लोकसभेला त्यांनी कामही प्रामाणिकपणे आणि निष्ठेनं केलं. प्रणितींच्या विजयात त्यांचं योगदानही राहिलं. याच टप्यावर कोगनुरेंनी शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम घेतला यावेळी प्रणितींनी ' तुम्ही मला सहकार्य केलं, मी तुम्हाला सहकार्य करीन' असं अभिवचन दिलं महादेव कोगनुरे हे दक्षिणमधून लढण्यासाठी तयारीत आहेत. त्यांना या मतदार संघाची विधानसभेची उमेदवारी देण्यासाठी प्रणितींचं सहकार्य होणार का? असाच त्यांच्या त्या वक्तव्याचा अर्थ घ्यायचा का? अशी चर्चा रंगली आहे.

हसापुरेंना मिनी मंत्रालयाचा कारभारी व्हायचंय की आमदार?

सुरेश हसापुरे हे सोलापूर शहर दक्षिण मतदार संघातून आमदारकी लढण्याच्या तयारीत आहेत, त्यासाठी त्यांनी मागच्या अनेक दिवसांपासून कामही चालू केल्याचं सांगितलं जातं. पण वस्तुस्थिती वेगळी आहे, अशी चर्चा या मतदार संघात आहे. दक्षिणची आमदारकी लढविण्याऐवजी त्यांना जिल्हा परिषद अध्यक्ष होण्यात अधिक स्वारस्य आहे, आमदारकीचं तिकीट इतर चेहऱ्यास देताना श्रेष्ठींकडून ते जिल्हा परिषद अध्यक्षपदाचा शब्द घेतील, अशी चर्चा खुद्द काँग्रेसमधील नेतेमंडळी, पुढारी यांच्यामध्ये आहे. असं असलं तरी काँग्रेसच्या पडत्या काळामधील हसापुरेंचे योगदान , प्रणिती शिंदेंच्या विजयामधील योगदान याचा विचार शिंदे पिता-कन्येकडून होणार हे निश्चित मानलं जातंय.

मला आमदार झाल्यासारखं वाटतंय!

शहर 'मध्य' आमदारकीच्या सिंहासहनावर 'भाईजान'?

✔ सोलापूर : सोलापूर लोकसभा दणदणीत विजय मिळवल्यानंतर काँग्रेसने आता लक्ष्य विधानसभा निवडणुकीवर केंद्रीत केले आहे. महाआडीत त्यांच्या वाटेला येणारे शहर मध्य आणि दक्षिण मतदार संघावर विजय मिळवण्याचा इरादा काँग्रेस पक्षाकडून व्यक्त होत आहे. शहर मध्य मतदारसंघात लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला मुस्लिम समाजाने मोठी मदत केली, त्यामुळे काँग्रेसकडून येथे मुस्लिम समाज उमेदवार देण्याचे नियोजन सुरू आहे. दुसरीकडे या मतदारसंघातून एमआयएमनेही तयारी सुरू केली आहे. तर शरद पवार गटाकडूनही या मतदारसंघातून मुस्लिम उमेदवाराचेच नाव प्रदेशकडे सादर केले आहे. त्यामुळे शहर मध्य मधून यंदा मुस्लिम समाजाचा आमदार होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

- ✔ मुस्लिम समाज बांधवांच्या वाढल्या अपेक्षा
- ✔ समाजाच्या मताधिक्याच्या पाठिंब्यावर आमदार होण्यासाठी इच्छुक सज्ज
- ✔ उमेदवार देताना काँग्रेसची वाढणार डोकेदुखी
- ✔ फारुक शाब्दी यांच्या उमेदवारीवारीनं काँग्रेस अन् शरद पवार राष्ट्रवादी गटात वाढल्या हालचाली

तौफिक शेख

फारूक शाब्दी

बाबा मिस्त्री

दरम्यान फारुक शाब्दी यांची उमेदवारी एमआयएमकडून निश्चित मानली जात आहे. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार (तुतारी) गटाकडून माजी नगरसेवक तौफिक शेख हे इच्छुक आहेत. तर मागील विधानसभा निवडणुकीत लक्ष्यवेधी फाईट दिलेले माजी नगरसेवक तथा सामाजिक कार्यकर्ते बाबा मिस्त्री यांच्या नाव काँग्रेसकडून लढण्याच्या पार्श्वभूमीवर पुढे येत आहे.

शहर मतदारसंघाचे प्रतिनिधित्व गेल्या तीन निवडणुकांपासून आमदार प्रणिती शिंदे करत होत्या. आता त्या खासदार म्हणून निवडून गेल्या आहेत. त्यामुळे शहर मध्य मतदारसंघ रिकामा झाला आहे. आता या मतदारसंघातून काँग्रेसकडून अनेकजण इच्छुक आहेत. या मतदारसंघात मुस्लिम समाजाची सुमारे १ लाख १० हजार मते आहेत. त्यामुळे आता प्रणिती शिंदे नसल्यामुळे या मतदारसंघातून मुस्लिम समाजाला उमेदवारी द्यावी, अशी मागणी होत आहे.

काँग्रेसकडून सध्या या मतदारसंघात माजी नगरसेवक बाबा मिस्त्री आणि माजी महापौर आरिफ शेख यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. दुसरीकडे एमआयएमनेही शहर मध्य मतदारसंघावर आपले लक्ष्य केंद्रीत केले आहे. गेल्या दोन निवडणुकीत एमआयएमला विजयाने हुलकावणी दिली होती. त्यामुळे एमआयएमने पूर्ण तयारीनिशी उतरण्याचे ठरवले आहे.

शहराध्यक्ष फारूक शाब्दी गेल्या पाचवर्षांपासून या मतदारसंघात मोर्चेबांधणी करत आहेत. गेल्या दोन निवडणुकांमध्ये प्रणिती शिंदे या उमेदवार असल्यामुळे एमआयएमचा पराभव झाला, अन्य कोणी उमेदवार असता तर एमआयएमचा विजय झाला असता, असे त्यांचे पदाधिकारी उघडपणे बोलत आहेत. आता शिंदे उमेदवारच नसल्यामुळे एमआयएमचा विश्वास वाढला आहे. दुसरीकडे शरद पवार गटाने शहरातील तिन्ही मतदारसंघाचा अहवाल प्रदेशकडे पाठवला आहे. यात शहर मध्यसाठी तौफिक शेख यांचे नाव सुचवले आहे.

काँग्रेस, एमआयएम आणि शरद पवार गटाकडे मुस्लिम उमेदवार तगडे आहेत. महाआघाडी जर विधानसभेपर्यंत टिकली तर या मतदारसंघातून पवार गटाला माघार घ्यावी लागणार आहे. त्यामुळे काँग्रेस आणि एमआयएमच्या उमेदवारांमध्ये रंगतदार लढत होऊ शकते.

मुस्लिम समाजाचा आग्रह वाढतोय

गेल्या अनेकवर्षांपासून शहर मध्य मतदारसंघ मुस्लिम समाजाला सोडावा अशी मागणी होत होती. मात्र प्रणिती शिंदे येथून लढत असल्यामुळे या मागणीला जास्त जोर येत नव्हता. मात्र आता मुस्लिम समाजाने या जागेसाठी जास्त आग्रही होतान दिसत आहे.

...तर मुस्लिम समाज वेगळी भूमिका घेणार?

विधानसभा निवडणुकीत आपला आमदार या मतदारसंघातून निवडून येईल या अपेक्षाने मुस्लिम समाज काँग्रेसच्या पाठीमागे उभे राहिला होता. त्यामुळे आता काँग्रेस पक्षाला या निवडणुकीत मुस्लिम चेहराच द्यावा लागणार आहे. काँग्रेसने जर इतर समाजाला प्राधान्य दिले तर मुस्लिम समाज वेगळी भूमिका घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

माजी नगरसेवकांना आमदारकीचं स्वप्नं; खरोखर उतरणार आखाड्यात याचे औत्सुक्य

✔ सोलापूर/प्रतिनिधी

राज्यातील महापालिकांसह इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकात सुमारे दोन वर्षांपासून रखडल्या आहेत. लोकसभेपूर्वीच या निवडणुका होतील, असे बोलले जात होते. मात्र या निवडणुकीनंतर विधानसभेचीही चर्चा सुरू झाली. त्यानंतर महानगरपालिकेच्या निवडणुका होतील, असा अंदाज आहे. त्यामुळे आता सोलापुरातील अनेक माजी नगरसेवकांना आमदारकीचीच स्वप्ने पडू लागली आहे. परिणामी शहरातील तिन्ही विधानसभा मतदारसंघात इच्छुकांमध्ये मोठी चुरस वाढणार आहे.

- ▶▶ फक्त हवा निर्माण करुन एखादं पद पदरात पाडून घ्यायचं ही रणनिती का?
- ▶▶ पक्षांचे पर्याय वाढले तसं गुडघ्याला बाशिंग बांधणारेही वाढले

दरम्यान माजी महापौरांसह काही माजी नगरसेवकांना खरोखरच आमदारकीच्या आखाड्यात उतरायचं आहे की फक्त हवा करायची, हे पाहणं त्यांच्याबाबतीत औत्सुक्याचं राहणार आहे.

सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीला उशीर होत आहे. निवडणुका कधी होतील हे निश्चितपणे कोणीही सांगू शकत नाही. त्यामुळे माजी नगरसेवकांच्या राजकीय भवितव्य धोक्यात येण्याची भीती वाटत आहे. त्यामुहे शहरातील सर्वच राजकीय पक्षांतील आजी-माजी नगरसेवकांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी सुरू केल्याचे दिसून येत आहे. काहींनी तर मतदारसंघावर दावा सांगण्यास सुरूवात केली आहे.

सोलापुरात सध्या १५ ते २० माजी नगरसेवक आमदारकी लढवण्यासाठी इच्छुक आहेत. विधानसभत्त निवडणुकीत जर महायुती आणि महाआघाडीत फाटाफूट झाल्यास ही संख्या दुपटीवर जाण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी आणि शिवसेना फुटल्याने आमदारकीच्या इच्छुकांना राजकीय पक्षांचे पर्याय वाढलेले आहेत. परिणामी विधानसभा निवडणुकीत पक्षापक्षांतील उमेदवारांची तिकिट मिळवतानाच कसोटी लागणार आहे.

महेश कोठे

चेतन नरोटे

देवेंद्र कोठे

यू.एन. बेरिया

आरिफ शेख

पांडूरंग दिड्डी

शहर 'मध्य'मध्यसाठी इच्छुक जादा

शहर विधानसभा मतदारसंघातून सर्वात जास्त माजी नगरसेवक इच्छुक असल्याचे दिसत आहे. काँग्रेसकडून माजी नगरसेवक बाबा मिस्त्री, आरिफ शेख यांच्यासह माजी नगरसेवक तथा काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे यांचे नावही आहे. शरद पवार गटाकडून माजी नगरसेवक ॲड. यु.एन.बेरिया आणि तौफीक शेख यांची नावे आहेत. तर भाजपकडून माजी नगरसेवक देवेंद्र कोठे, पांडुरंग दिड्डी यांचे नाव चर्चेला येत आहे. यापैकी कोणाचे नशिब चमकणार आणि कोणाच्या पदरी निराशा येणार हे आगामी काळात समजणार आहे.

शहर उत्तरमध्ये माजी महापौरांचीच फिल्डींग

शहर उत्तरमध्ये भाजपचे विजयकुमार देशमुख यांचे एकहाती वर्चस्व असले तरी माजी महापौर शोभा बनशेट्टी यांनी गतवेळी उमेदवारीसाठी प्रयत्न केले होते. यंदाही त्या इच्छुक आहेत. पवार गटाकडून माजी महापौर महेश कोठे इच्छुक आहेत. याशिवाय मनोहर सपाटे यांचे नावही प्रदेशकडे पाठवण्यात आले आहे. सध्या बीआरएसमध्ये असलेले माजी नगरसेवक नागेश वल्याळही येथून इच्छुक आहेत.

शहर दक्षिण इच्छुकांची संख्या कमी

शहर दक्षिण मतदारसंघात गतवेळी माजी नगरसेवक बाबा मिस्त्री यांनी निवडणूक लढवली होती. यंदा ते मध्यसह दक्षिणमधूनही इच्छुक आहेत. याशिवाय ठाकरे गटाचे गणेश वानकरही या मतदारसंघातून उमेदवारीसाठी प्रयत्न करत आहेत. या मतदारसंघातील निम्मा भाग ग्रामीण भागात मोडत असल्याने येथून माजी नगरसेवक जास्त इच्छुक नाहीत.

संभ्रमाचे दाटलेले ढग बाजूला सरणार! सोलापूर बाजार समितीची निवडणूक लागणार!!

✔ **सोलापूर** : उच्च व सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेल्या तसेच निवडणुकीच्या टप्प्यावरील असलेल्या सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात, असे शुद्धिपत्रक राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणतर्फे काढण्यात आले आहे. त्यामुळे सोलापूर बाजार समितीची निवडणूक होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे. त्यामुळे आता आगामी काळात विधानसभेपूर्वी पुन्हा बाजार समिती निवडणुकीच्या निमित्ताने दक्षिण, उत्तर आणि अक्कलकोट तालुक्यात राजकारण तापणार आहे.

सहकारी संस्थांच्या घोषित केलेल्या निवडणुका पावसाळ्यामुळे पुढे ढकलण्यात आल्याचे परिपत्रक यापूर्वी काढण्यात आले होते. त्यामुळे अनेक सहकारी संस्थांची निवडणूक सुरू असलेली हालचाल मंदावली होती. त्यामुळे सोलापूर बाजार समिती निवडणूक होणार की नाही याबाबत संभ्रम होता. बाजार समितीला मुदतवाढ मिळणार की प्रशासक येणार याबाबत चर्चा सुरू होत्या. मात्र उच्च व सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेल्या तसेच निवडणुकीच्या टप्प्यावरील असलेल्या सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका घ्याव्यात, असे शुद्धिपत्रक राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणतर्फे काढल्याने आता हा संभ्रम दूर झाला आहे. निवडणुकीच्या टप्पा व न्यायालयाच्या आदेशानुसार सुरू करण्याच्या प्रक्रिया सुरूच राहतील असे या शुद्धी पत्रकात नमूद केल्यामुळे निवडणुकीच्या टप्प्यावर असलेल्या सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुका वेळापत्रकानुसार होणार आहेत. त्यामुळे सोलापूर बाजार समिती निवडणूक होणार हे आता निश्चित झाले आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाची मुदत संपून एक वर्ष झाले. दोन वेळा सहा सहा माहिन्याची मुदत वाढ मिळाल्याने सहा वर्षाचा कालावधी १५ जुलैला संपणार आहे. त्यानुसार निवडणूक प्रक्रियेस सुरुवात केली असून याद्याही प्रसिद्ध झाल्या आहेत.

को-ऑपरेटीव्ह ॲक्टमध्ये ज्या संस्था आहेत त्याला स्थगिती देण्यात आली आहे. बाजार समिती को-ऑपरेटीव्ह ॲक्टमध्ये येत नाही. त्यामुळे बाजार समितीची निवडणूक होणार आहे. तशी प्रक्रियाही सुरू आहे.

-किरण गायकवाड, जिल्हा उपनिबंधक